TEXT PROBLEM
WITHIN THE
BOOK ONLY

UNIVERSAL LIBRARY
OU_192287
UNIVERSAL LIBRARY

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M85/D53J Accession No. M4304

Author ढोले, एन्. आर.

Title जे. कृष्णमूर्ति दर्शन

This book should be returned on or before the date last marked below.

अध्यात्ममाला : १

# ' जे. कृष्णमूर्ति-दर्शन '

[ पुणें येथें झालेलीं कृष्णजींचीं प्रवचनें ]

लेखक:

एन्. आर. ढोले, बी. ए., एलएल्. बी., वकील, पुणें.

( पतितोद्धार, उघडा लपंडाव इत्यादिकांचे कर्ते )

मूल्य १॥ रुपया

प्रकाशक
**पां. रा. ढमढेरे,**
३२२/३ सदाशिव, पुणें २.

( सर्व हक्क स्वाधीन )

मुद्रक :
**न. वि. सरदेशपांडे,**
आदर्श मुद्रणालय,
३९५/५ सदाशिव, पुणें २.

# अर्पण

( Dedication )

जिथें अनेक मार्ग – तिथेंच रस्ता चुकतो. सत्यदर्शनाला मार्ग नाहीं. ( Truth is pathless. ) या असल्या रस्ता नसलेल्या वाटेनें जायला जे निघाले, त्या सर्वांना ही कृति अर्पण केली आहे.

# निवेदन

ज्यांचा गौरव अनेक देशांत होऊन राहिला आहे त्या जे. कृष्णमूर्तींचीं प्रवचनें पुणेंकर श्रोत्यांना ता. ११९१४८ ते २२।१०।४८ पर्यंत ऐकायला मिळालीं. इंग्रजी भाषा न जाणणारांना व यथातथाच जाणणारांना या प्रवचनांची व्हावी तशी ओळख होणें शक्य नव्हतें. तेव्हां कृष्णजींचें वैशिष्ट्य, त्यांची अभिनव विचारसरणी, प्रश्नोत्तरांच्या सभा चालविण्याची त्यांची हातोटी व त्यांनीं सांगितलें तरी काय ? पुणेंकर श्रोत्यांना – या सर्वांचा मराठी वाचकांना सारांशरूपानें परिचय करून देण्याकरितां, आम्हीं 'जे. कृष्णमूर्तीदर्शन' लिहिलें व तें आज प्रसिद्ध होत आहे.

जसजशीं प्रवचनें होत गेलीं तसतशीं वेळोवेळीं त्यांचीं वैचारिक टिपणें करून घेतल्यानें सारांशाचें स्वरूप मूळ प्रवचनांना धरून आहे. प्रवचनें चालू असतांना आम्हीं एकहि टिपण घेतलें नाहीं. फ़क्त लक्षपूर्वक त्या त्या प्रवचनाचें श्रवण करून, मोकळ्या मनानें त्याचें ग्रहण करून दुसऱ्या दिवशीं आम्हीं तें 'मराठीं'त आणलें. आणि आमच्यासमोर कृष्णजींच्या व्याख्यानाचें टेक्स्ट नसल्यानें, भाषांतराचा बिनचूकपणा या सारांशांत नाहीं हें नमूद करणें जरूर आहे. त्याचप्रमाणें एका सूत्रांत सारीं प्रवचनें गोवून, त्यांतून स्वतःचा निष्कर्ष काढून तोहि आम्हीं वाचकांच्यापुढें ठेवलेला नाहीं. मूळ मूर्तीचें दर्शन आम्ही घडवीत आहोंत.

या कामांत पुढाकार घेऊन आमचे मित्र रा. दत्तात्रेय श्रीधर दर्शने यांनीं निरपेक्ष बुद्धीनें आम्हांला जी हरएक प्रकारची मदत केली त्याबद्दल नुसते शब्दानें आभार मानून थोडेंच त्यांचें 'ऋण' फिटणार आहे ? मैत्रीचें मोल देऊनच मी त्यांच्यापासून या असल्या देव-घेवीची ( Divine receipt ) अपेक्षा करीन. तसेंच कृष्णदर्शन तयार होत असतांना, त्याला मूर्तस्वरूप आलें नव्हतें तेव्हां, कृष्णजींचीं प्रवचनें

पुण्यास चालू असतांना, आमचे मित्र रा. वाय. एन्. आठवले, कॅ. बेलसरे व इंटर नॅशनल बुक–डेपोचे मालक रा. दीक्षित इत्यादि मंडळींनीं आपलेपणाच्या भावनेनें मला प्रोत्साहन दिलें व कांहीं उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

तसेंच रा. दादासाहेब वर्तक यांनीं स्टार बुलेटिनसारखीं कांहीं दुर्मीळ पुस्तकें आम्हांला देऊन मदत केली त्यांचाहि गौरवपूर्ण उल्लेख करणें हें आमचें कर्तव्य आहे

कृष्णजींचीं प्रवचनें श्रवण करण्याची सवड झाली नसतांनाहि केवळ स्वतःच्या सुविद्यतेनें ज्यांनीं पुढें सरसावून व प्रकाशनप्रांतांतलें एक धाडस स्वीकारून कृष्णजींचे विचार मराठी वाचकांच्यापुढें ठेवले व पुस्तक उत्कृष्ट रीतीनें सजविलें त्याबद्दल आमचे प्रकाशक, रा. तात्यासाहेब ढमढेरे, एम्. ए. यांचा गौरव केल्याशिवाय हें निवेदन मी पुरें कसें करणार? आदर्श मुद्रणालयाचे व्यवस्थापक व इतर नोकरवर्ग यांनीं छपाईचें काम अत्यंत तत्परतेनें करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मनःपूर्वक मानणें हें माझें महत्त्वाचें कर्तव्य आहे.

मुखपृष्ठावरील डिझाईन श्री. व्यं. ना. कुलकर्णी (आर्ट अलोन) यांनीं अतिशय थोडया वेळांत उत्तम करून दिल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

ता. १ । ५ । ४९<br>
अक्षय्य तृतीया वैशाख शु. ३,<br>
शके १८७१<br>
शारदासदन — देशमुखवाडी, पुणें.

— न. रा. ढोले.

# जे. कृष्णमूर्तींचें जीवनदर्शन.

मद्रास प्रांतांत मदनपल्ली गांवीं कृष्णमूर्तींचा जन्म इ. स. १८९७ सालीं झाला. जिद्दू त्यांचें आडनांव. आपल्या आईबापांचें तें आठवें मूल म्हणून **श्रीकृष्ण** नांव ठेवलें.

नारायण जिद्दू–कृष्णमूर्तींचे वडील–रेव्हेन्यू खात्यांत सरकारी नोकर होते. ते थिऑसॉफिस्ट पंथाचे अनुयायी होते. पेन्शन घेतल्यावर ते डॉ. बेझंट यांच्या निमंत्रणानुसार अडचारला राहूं लागले. बरोबर त्यांचीं दोन मुलें-कृष्णमूर्ति व नित्यानंद होतीं. हीं मुलें–विशेषतः कृष्णजी, डॉ. बेझंट यांच्या संशोधक नजरेंत भरलीं. कृष्णजींचा नीट आत्म-विकास केला तर ते पारमार्थिक प्रांतांत श्रेष्ठ गुरुपदीं पोहोंचतील असें बाईच्या ( डॉ. बेझंड यांच्या ) मनानें घेतलें. सी. डब्ल्यु. लेडबीटर हे डॉ. बेझंट यांचे सहकारी, त्यांनाहि पण कृष्णजी आवडले. नारायण-स्वामींची गरिबी; तेव्हां उच्च शिक्षणाकरतां, त्यांनीं हीं आपलीं दोन्हीं मुलें–कृष्णजी व नित्यानंद डॉ. बेझंट व लेडबीटर यांच्या हवालीं केलीं.

इ. स. १९११ सालीं डॉ. बेझंट यांनीं कृष्णजी व नित्यानंद यांना आपल्याबरोबर युरोपला नेलें आणि कृष्णजींच्या ठायीं सुप्तपणें वसत असलेल्या पारमार्थिक श्रेष्ठतेला त्यांनीं जाहीरपणें वाचा फोडली. बेझंटबाईंचें हें जाहीर निवेदन जगभर पसरलेल्या त्यांच्या अनुयायांनीं शिरसावंद्य मानलें आणि त्यांनीं ‘प्राच्य तारक संघ’ (order of the Star in the East) नांवाची एक उपसंस्था बनविली. कृष्णजींच्या आगामी अवतार कार्याकरितां ही सारी तयारी अगोदरच करण्यांत आली होती.

## प्रीव्ही कौन्सिल केस

इ. स. १९११ नंतर कृष्णजी युरोपांत असतांना त्यांचे वडील नारायणस्वामी हे कांहीं सनातनी मित्रांच्या चिथावणीला बळी पडले.

मुलांची काळजी डॉ. बेझंट बरोबर घेत नाहींत, ब्राह्मणत्व व जात झुगारून द्यायला शिकवतात वगैरें कारणें देऊन नारायणस्वामींनीं, आपलीं मुलें परत मिळावींत म्हणून डॉ. बेझंट यांचेविरुद्ध मद्रास हायकोर्टात एक अर्ज गुदरला. तिथें नारायणस्वामींच्या बाजूनें निर्णय मिळाला, तरी हीं मुलें कोर्टाचे वार्ड म्हणून ठरविण्यांत आलीं. या निर्णयावर डॉ. बेझंटबाईनीं प्रीव्ही कौन्सिलकडे अपील केलें व त्यांत त्यांना यश येऊन, मद्रास हायकोर्टाचा निर्णय फिरवण्यांत आला. अशा रीतीनें कृष्णजी डॉ. बेझंट यांच्याच देखरेखीखालीं राहूं शकले.

कृष्णजींचें शिक्षण इंग्लंडमध्यें खाजगी रीतीनें झालें. ते कुठल्याहि विश्वविद्यालयांत ( university ) दाखल झाले नाहींत.

१९२२ सालीं नित्यानंदांच्या प्रकृतीस आराम वाटावा म्हणून ते कॅलिफोर्नियांत गेले. तेथें संपूर्ण एकांतवासाचा अनुभव त्यांस मिळाला. सत्याचा शोध करावयाचा असेल तर कांहीं काल जगापासून हें असें दूर – दूरच रहायला पाहिजे ' असें कृष्णजी म्हणत.

बॅरन फिलिप या त्यांच्या हॉलंडमधील अनुयायानें इ. स. १९२४ सालीं आपल्या मालकीची मिळकत – पांच हजार एकर जमीन व सुंदर व भव्य असा " एरडी कॅसल " – Erde castle – कृष्णजींना व्यक्तिशः बक्षीस दिली पण तिचा स्वीकार करण्याचें कृष्णजींनीं साफ नाकारलें ! तसेंच भगवान् बुद्धाच्या चरित्रावर लिहिलेल्या बोलपटांत नट म्हणून काम करण्याकरतां एका अमेरिकन सिनेमा कंपनीनें त्यांना दर आठवड्याला पांच हजार डॉलर्स – याप्रमाणें वेतन द्यावयाचें कबूल केलें. पण काय ? कृष्णजी कृष्णजीच राहिले. बुद्धाच्या भूमिकेंत न नटतां पैशाकडे त्यांनीं पाठ फिरविली. त्यांचेजवळ हल्लीं घरदार, जमीनजुमला, पैसा–अडका वगैरे कांहींएक नाहीं. ते खरेखुरे त्यागी व निष्कांचन असे आहेत. ते प्रवचनें देत फिरतात व त्यांची मित्रमंडळी त्यांचा खर्च भागवितात !

इ. स. १९२५ सालीं कृष्णजींचे बंधु नित्यानंद मरण पावले, त्यामुळें त्यांना अत्यंत दुःख झालें. या दुःखांतूनच कृष्णजींचा पार-

मार्थिक जन्म झाला. स्वतःच्या भावाच्या मरणांतून निजानंदाचें–स्वानंदाचें तोरण उभारलें व प्रचारकंकण हातीं बांधून मानवजातीला निभळ सौख्याचा मार्ग दाखविण्याकरतां त्यांनी जगभर संचार आरंभिला.

ते स्वतःला जगद्‌गुरु समजत नाहींत. " मला कोणी शिष्य नाहींत व मी कुणाचा गुरु नाहीं " असेंच ते प्रतिपादन करतात. संघाच्या जगभर शाखा, हजारों अनुयायी व त्यांचें भरगच्च वर्गणीचें उत्पन्न असतांना, साऱ्या मानमरातबाकडे पाठ फिरवून कृष्णजींनीं प्राच्य-तारक संघ इ. स. १९२९ सालीं विसर्जन करून टाकला. थिऑ-सॉफिकल संघांतूनहि ते बाहेर पडले.

'कँप गॅदरिंग' भरवून प्रवचनें देणें हें कृष्णजींच्या प्रचाराचें एक वैशिष्टय आहे.

मानवी उत्क्रांतीची परिसीमा मी गांठली आहे असें कृष्णजी म्हणतात. बाह्यसृष्टीच्या बुडाशीं असलेल्या जीवनतत्त्वाशीं पूर्ण जाणिवेनें ( Choiceless awareness ) एकरूप होणें हीच ती उत्क्रांतीची परमावस्था होय. तिलाच ते सत्यतत्त्व म्हणतात. आणि प्रत्येक व्यक्तीनें तें स्वतःच शोधलें पाहिजे. संप्रदाय, धर्म, पंथ – कांहीं कांहीं एक उपयोगी पडत नाहींत. आपण होऊनच आपलें स्वतंत्र तंत्र निर्माण केलें पाहिजे तरच सत्यसाक्षात्कार होईल.

'तूं' व 'मी' हा भेद मावळला कीं व्यक्तिवैशिष्टय कोलमडून पडतें. आणि चित्‌संवित् ( Consciousness ) विश्वव्यापी बनून एकाकार होतो. बुद्धि आणि प्रेम समतोल होतात. हेंच तें आत्म्याचें अमरत्व (Immortality) होय.

मर्यादा, संकुचितपणा, भेदभाव म्हणजेच दुःख. तें सोडून दिलें कीं मग सुखाला काय सीमा ? असा संदेश कृष्णजी व्यक्तीला देत आहेत. कारण व्यक्ति म्हणजेच जग, व व्यक्तीचा प्रश्न तोच जगाचा प्रश्न असें त्यांचें सांगणें आहे.

कृष्णजींची शिकवण व्यावहारिक आहे. जगापासून भिऊन पळून जायला ते सांगत नाहींत. जगाशीं दृढ संबंध जोडायला ते सांगतात आणि जग म्हणजे व्यक्तीच्या आवाक्यांतलें जग – आकाशाला गवसणी घालणारें – भौतिक मर्यादेंतील संपूर्ण जगत् नव्हे.

कृष्णजी जसे प्रचारक, तसे कवीहि पण आहेत आणि कलावंतहि आहेत. पूर्व – पश्चिमेचा संगम म्हणजेच कृष्णजी. अत्यंत साधी रहाणी व मधुर वाणी हें त्यांचें प्रगट स्वरूप आहे. जीवन एक (One) आहे असें ते मानतात व जीवनावर प्रेम करतात. ते टेनिसपटु आहेत चांगले व गोल्फहि एके काळीं खेळत असत. पण हल्लीं कुठें आहे त्यांना खेळायला वेळ ?

प्रश्नोत्तर रूपानें ते त्यांचीं प्रवचनें थाटतात. कोणता का प्रश्न असेना त्याची गुरुकिल्ली सदैव कृष्णजींच्या हातांतच रहाते.

**कृष्णजींचें वैशिष्ट्यः**–त्यांच्या संदेशावर बायबलचा ठसा उमटलेला दिसतो. तरीपण, बायबल, कुराण, पुराण, उपनिषदें, गीता, वेद इत्यादिकांचा आधार ते मुळींच घेत नाहींत, श्रोत्यांना नसता धीर देत नाहींत आणि इतरांचे गोठलेले ठाम विचार (Frozen thoughts) बोलबोलून (By repeating adnausem) ऐकणाऱ्यांना कृष्णजी बधिर करीत नाहींत. कृष्णजींच्या विचारप्रणालीमध्यें संत, महंत, महात्मे, गुरुदेव याचे देव्हारे माजविलेले नाहींत. त्यांना जात नाहीं आणि धर्महि पण नाहीं. विशिष्ट देशाभिमान तर नाहींच नाहीं. जेथें दिशा (पूर्व–पश्चिम वगैरे) आहेत, चंद्रसूर्यांचे उदयास्त आहेत, डोंगर–पर्वतांची स्वयंभू बैठक आहेत, पशु–पक्षी आहे, नदीनाले वहाताहेत, प्रफुल्लित वनराजी आहे, धीर–गंभीर सागर आहेत— सारांश, जेथें वसुंधरा चित्सौंदर्यानें नटलेली आहे – तो तो कृष्णजींचा देश. मानवतेला हातीं धरून, हे आधुनिक कृष्णदेव अखंड प्रवासाला बाहेर पडले आहेत. अशा वेळीं आपण घरांत कां बसून रहावयाचें ?

**कृष्णजींचें दर्शनः**—पूर्ण प्रज्ञता, सम्यक शांतता व काव्यमय कारुण्य – यांचा त्रिवेणी संगम म्हणजेच कृष्णजींची ती हांसरी मूर्ती.

पुणें येथील टिळक स्मारक मंदिरांत जमणाऱ्या जनसंमर्दांत प्रत्येक प्रवचनापूर्वी कृष्णजी हे निःशब्द एकांत निर्माण करीत असत. श्रोत्यांचें तें त्यांचें क्षणिक निरीक्षण, मुखमंडलावर उदय पावणारें तें त्यांचें स्मित-हास्यत्या तसल्या रम्य शब्दशून्यतेंत ( Beautiful Silence ) त्यांचा सारा बोध ( message ) जणूं साठून राहिला होता. नंतर ते अस्खलित शब्दांचा पूल बांधीत आणि या सुरम्य पुलावरून श्रोत्यांचा प्रवास होत असे. या अमोघ वाणीच्या ( Verbal ) पुलावरून खालीं वहाणाऱ्या जीवनाच्या नदींत उडी टाकायला कृष्णजी रोज सांगत—घडोघडीला सांगत. 'स्वतः पोहून गेल्याशिवाय परतीर गाठतां येणार नाहीं, दुसऱ्याच्या नावेंतून हा असला प्रवास करतां येणार नाहीं–' कृष्णजींचें हें आग्रहाचें सांगणें असे. 'आधीं केलें आणि मग सांगितलें–' अशांपैकींच कृष्णजी आहेत.

**कृष्णजींचा संदेश** ( Message ):– निर्मळ मन, विशाल हृदय आणि प्रेम – हाच कृष्णजींचा संदेश आहे. या साध्या शिकवणीचा त्यांचा मार्ग नवा आहे ( New approach ). जें कांहीं आहे (What is ) त्याचें पुनर्मूल्यमापन ( Revaluation ) करून नवमानव व नव-संस्कृति कृष्णजी उभारीत आहेत.

इच्छा म्हणजेच एक प्रकारें जीवन होय. मनांत इच्छा उद्‌भवते, तिचा धिक्कार न करतां ( no condemnation ) अथवा तिचें समर्थन न करतां ( no justification ) तिला नामबद्ध न करतां ( no naming or terming ) जर व्यक्ति निर्विकारी बनेल तर मन निर्मळ आणि विचारविहीन होऊन तिला प्रशांत अवस्था प्राप्त होईल.

मनाच्या या प्रशांत ( Calm ) जागरूक ( Alert ) व चलाख–गतिनिष्ठ ( Dynamic ) अवस्थेंत, त्या चित्सत्याची ( What is ) संपूर्ण जाणीव (Total awareness ) होते—ती क्षणाक्षणाला ( From moment to moment ) नवोनव

( anew ) अशी असते. हाच तो सत्याचा साक्षात्कार होय. तो स्वतः अनुभवावा लागतो, परंतु तो फक्त अनुभविण्यांतच— प्रत्यक्ष भोगावस्थेंतच ( only while experiencing ) टिकतो; त्याचा अनुभवाचा गोळा ( experience lump ) बनला कीं तो स्मृति ( memory ) होतो. पण तीच मृती ( Dead thing ) होय.

मानवी जीवनाची प्रेम ही एक अवस्था ( State ) आहे व त्या अवस्थेचा अनुभव कोणीहि इतराला देऊं शकत नाहीं. ज्याचा त्यानेंच तो घ्यावयाचा असतो.

प्रेम दिक्कालातीत ( Timeless and Spaceless ) शाश्वत (eternal) चिरंतन असें आहे. तें सत्य आहे. ( It is the truth. ) व्यक्तीची संपूर्णता (perfection) हेंच प्रेमाचें स्वरूप होय. प्रेम हेंच स्वतःचें अनंतत्त्व होय— ( Love is its own eternity. ) कृष्णजींच्या तत्त्वज्ञानाचें हें मूलग्राही दिग्दर्शन आहे.

———

# जगद्गुरु श्रीकृष्णमूर्ति यांचीं प्रवचनें व प्रश्नोत्तरें

( ता. १-९-४८ ते १०-९-४८ )

लढाया थांबवावयाच्या असतील, शांतता हवी असेल, तर अखिल जगतांत माणसा-माणसांना दूर ठेवण्यासाठीं उभारलेल्या धर्मांच्या, गुरूंच्या, देशभक्तीच्या, राष्ट्रवादाच्या, आर्थिक, राजकीय व भौगोलिक भिंती पाडून त्या जमिनदोस्त केल्या पाहिजेत. शांतताप्रस्थापनेसाठीं देखील सत्ता व संघटना यांचा आधार घेतां कामा नये. कारण ती एक शांततावाद्यांची आघाडी बनून लढाईचें कारणच बनतें. हें सर्व व्यक्तींनीं—तुम्हीं व मीं व्यक्तिशः केलें पाहिजे. स्वतंत्र बुद्धीनें विचार करावयास लागलें पाहिजे.

'व्यक्ति' ही सर्वांत महत्त्वाची आहे. व्यक्ती अनेक झाल्या कीं, त्यांचा समाज होतो. नंतर राष्ट्र व अखेर अनेक राष्ट्रांचें जग बनतें. तेव्हां जगाचा प्रश्न हा मूलतः व्यक्तीचाच प्रश्न होय. संहार कसा टाळतां येईल, लढाया कशा टाळतां येतील, शांतता कशी प्रस्थापित करतां येईल, उपासमार व अन्नटंचाई कशी थांबेल इत्यादि प्रश्न जगापुढें प्रामुख्यानें 'आ' पसरून उभे आहेत. त्यांच्या तोंडांत शतकानुशतकांची संस्कृति नामशेष होण्याची वेळ आली आहे !

## बुद्धीवरील झांपड काढा

तुम्ही व मी व्यक्ती या नात्यानें या चाललेल्या विघटनेच्या प्रकाराला जबाबदार आहोंत. स्वतः खोल विचार करा म्हणजे हें समजून येईल. योग्य विचार करण्यासाठीं कोणत्याहि बाह्य साधनांचा आधार घेऊं नका. मग तें बाह्य साधन गुरू, धर्म, शास्त्रवचन अगर दुसरें कोणतेंहि असो! त्यापैकीं कशाचाहि उपयोग होणार नाहीं. जी कांहीं वस्तुस्थिति आहे ती तुम्हीं स्वतंत्र बुद्धीनें तपासा, म्हणजे तुम्हांलाच सत्याचा शोध लागेल.

## जागतिक कलहाचीं कारणें

सत्ताभिलाष व संकुचितपणा हीं माणसामाणसांत व राष्ट्राराष्ट्रांत नेहमीं सुरू असलेल्या कलहांचीं प्रमुख कारणें आहेत. राष्ट्रवाद (nationalism)—देशभक्ति व संघटना यांच्याद्वारें रणदेवतांचीच पूजा मानव करीत असतो.

## राष्ट्रवाद विषरूप कसा?

धर्म, गुरु, देश, शासनसंस्था व समाज या अनेक बाह्य चिन्हांमुळें, लेबलामुळें मानवतेचें विभक्तीकरण झालें, दूरीकरण बनलें, भेद निर्माण झाले. या साऱ्या तटबंदी जेव्हां जमीनदोस्त केल्या जातील तेव्हांच माणसांना शांतता लाभेल व लढाया थांबतील.

राष्ट्रवाद हें विष आहे. तें सर्वांच्या अंगीं भिनलेलें आहे. तें व्यापक विचारानें काढून टाकावयास पाहिजे. निरनिराळे स्वतंत्र देश व त्या परस्परविरोधी राज्यसत्ता शांततेच्या आड येत आहेत. ह्या सीमा जर काढून टाकण्यांत आल्या तर शतकानुशतकें चालत असलेली संस्कृति व सुधारणा जिवंत राहतील, नाहीं तर नाहीं.

## जगाचा मध्यबिंदू म्हणजे व्यक्ति

परंपरा, धर्म, गुरु, सांप्रदाय व देशाभिमान वगैरेंनीं आपलें मन भारावलेलें असतें. आपला आचार एकाच विशिष्ट चाकोरींत फिरत असतो. हें जें आपलें एकमेकांशीं, समाजाशीं व जगाशीं नातें आहे तें भेदात्मक, दुजाभावाचें, तुसडेपणाचें असल्यामुळें त्याच्याच पोटीं कलह, दुःख व लढाया उत्पन्न होत आहेत.

## आप्तवाक्यांचा आधार घेऊं नका

हा जागतिक व व्यक्तिगत कलह थांबवायाचा असेल, शांतता हवी असेल तर व्यक्तीनें स्वतःपासूनच सुरुवात करायला पाहिजे. स्वतःबद्दलचें ज्ञान करून घ्यावयास पाहिजे. कारण जगाचा प्रश्न म्हणजेच व्यक्तीचा प्रश्न. तेव्हां हें स्वतःबद्दलचें ज्ञान प्राप्त करून घेण्याकरतां आपण स्वतंत्रपणें विचार केला पाहिजे. दुसऱ्याचे विचार आपल्या काय उपयोगी ? जुनीं शास्त्रवचनें व संतवचनें कितीहि थोर असलीं तरी क्षणोक्षणीं उद्भवणारे प्रश्न सोडविण्यास तीं उपयोगी पडत नाहींत. व्यक्तीचीं दुःखें काय आहेत हें त्या व्यक्तीनेंच स्वतःच्या विचारानें समजून घेतलें पाहिजे. गिता, बायबल, कुराण, पुराण या ग्रंथांचे किंवा बुद्ध, ख्रिस्त, शंकर, महंमद वगैरे व्यक्तींचे 'तयार आधार' घेऊन स्वयंविचाराचे कष्ट टाळतां उपयोगी नाहीं.

## स्वतःचीं दुःखें स्वतः तपास ।

आपल्या व्यक्तिगत दुःखापासून असें आपल्याला दूर पळून जातां येणार नाहीं. गतकालच्या कोणत्याहि अनुभवांचें स्मरण करून आज होणाऱ्या दुःखांचें मरण आपण टाळूं शकत नाहीं. विस्मरणाच्या बोळ्यानें मनाची पाटी पुसून ती स्वच्छ व निर्मल करा. क्षणोक्षणीं

मनांत उत्पन्न होणाऱ्या अनेक उडाणटप्पू विचारांचा समाचार घ्या व त्यांची वासलात लावा. असले भटके विचार घालविण्यावरच मन शांत होतें व दुःखाची कारणें सांपडून योग्य आचार आपल्या-कडून घडतो. जें कांहीं आज आहे—या क्षणीं आहे त्याची नवोनव भेट आपल्याला होते, दुःखाची जाणीव होते व त्या स्थितींत सत्तत्त्वांचा शोध लागूं शकतो.

## प्रश्नोत्तरें

To be is to be related जगणें म्हणजे नातें जोडणें.

तुम्ही व मी जे एकत्र जमलों आहोंत ते दोघे मिळून मनमोकळे-पणानें सत्याचा शोध करायला निघालों आहोंत. जे तुमच्या माझ्या दरम्यान नातें, संबंध, दुवा आहे तेंच नातें, संबंध व दुवा समाजाशीं व जगाशीं आहे. तुम्हीं व मी म्हणजेच जग. आपल्या वेगळें जग नाहीं, जगावेगळें आपण असूं शकत नाहीं. **कारण जीवन म्हणजेच दुसऱ्याशीं नातें जोडणें होय.**

## आपल्यापुढील प्रश्न

आपल्यापुढें हा प्रश्न आहे कीं, मला दुःख कां होतें ? जगांत दुःख कां दिसतें ?

## नदीच्या दोन तीरावरील मानव

एका नदीच्या दोन तीरावर वसती केलेलीं माणसें राष्ट्रवादाचें विष पिऊन परस्परांबरोबर प्राणघातक युद्धें शतकानुशतकें लढवीत आहेत. पूर्वीं धर्मांच्या नांवाखालीं लढाया झाल्या व आतां आर्थिक स्वास्थ्यासाठीं कापाकापी चालूं आहे. ठोकळेबाज कल्पनांवर अंध विश्वास ठेवल्यानें भेदभाव उत्पन्न होतो. त्याचा आपण निरास केला पाहिजे.

## पार्श्वभूमीचे पाश तोडा

श्रद्धा अथवा विश्वास याचा अर्थ काय ? असा प्रश्न विचारला असतां श्री. कृष्णमूर्ति म्हणाले, " स्वतःचें दुःख नाहींसें व्हावें म्हणून मनुष्य कुठें तरी श्रद्धा ठेवायला जातो. देवाधर्मावर, मूर्तिपूजेवर, गुरूवर, मंत्रतंत्रावर, स्नानसंध्या, यज्ञयाग, वगैरे प्रयोगांवरहि त्याची श्रद्धा पूर्वग्रहनिष्ठ असते. (conditioned)

या श्रद्धेला एक प्रकारची पार्श्वभूमि असते. त्या पार्श्वभूमीच्या रंगाचा ठसा त्या माणसाच्या श्रद्धेवर पडत असतो. विशेष धर्म, परंपरा, गतकालचा इतिहास, देश, समाज व सभोंवतालची परिस्थिति इत्यादि गोष्टींपासून पार्श्वभूमि तयार होते. श्रद्धा ठेवायला जाणें, गुरूवर विश्वास टाकणें. मूर्तिपूजा करणें व देवाची प्रार्थना करणें, या तंत्रांत स्वतःच्या दुःखाचें कारण स्वतःच शोधून काढण्याचा व तें समजून घेण्याचा भाग अजिबात नसतो.

## दुसऱ्याची नाव टाकून द्या

(ता. १०-९-४८ रोजीं सकाळीं सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीच्या जागेंत झालेल्या चर्चेचा सारांश.)

जीवनाच्या प्रवाहांत आचाराची उडी घेऊन सत्याचा शोध तुमचा तुम्हींच केला पाहिजे. मूर्तिपूजा, धर्म, गुरू, देश वगैरे नानाप्रकारच्या नावांमधून तुम्ही दुबळ्याप्रमाणें प्रवास करीत आहांत. ती नाव सोडून तुम्ही केवळ तुमच्या स्वतःचाच आश्रय घेतला पाहिजे. अहो ! लोकांच्या नावेंतून किती दिवस प्रवास करणार ! ते तसले नावाडी आजवर उराशीं बाळगून काय कुणाचा लाभ झाला आहे !

## ता. ११-९-४८ शनिवार सायंकाळच्या प्रवचनाचा सारांश

आपण जगतों—सुखासमाधानानें जगावयाचें आहे आपणां सर्वांना. जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, इत्यादि (on all levels) विविध पातळीवर आपणांस आयुष्य कंठावयाचें आहे. हें बहुव्यापी जीवन आपणांस प्रत्यहीं व्यतीत करावयाचें आहे. आज धार्मिक जीवन, उद्यां आर्थिक व परवां राजकीय अशी आपल्या जीवनाची सरसनिरस वांटणी होऊं शकत नाहीं. आपल्या दैनंदिन गरजा भागविण्याकरतां आपला इतरांशीं—समाजाशीं, शासनसंस्थेशीं, धार्मिक परंपरेशीं संबंध येतो. व्यक्तिगत् आयुष्यांत आपल्या कुटुंबांतील माणसांशीं व जवळच्या इष्ट-मित्रांशीं आपला संबंध येत असतो. किंबहुना, हे असले संबंध—नातें उत्पन्न होणें म्हणजेच जगणें—जीवन व्यतीत करणें होय. To be is to be related तत्त्व ठसवून घेण्यासाठीं पुनरुक्ति नको का ?

कशासाठीं जगायचें ? जीवनाचा हेतू काय ? तो साध्य करण्याचा मार्ग कोणता ? या महत्त्वाच्या गोष्टींचा आपण स्वतः—तुम्ही व मी विचार करूं या.

आंत (हृदयांत) व बाहेर (समाजांत) शांतता नाहीं व ती मिळावी म्हणून आपण आजवर प्रयत्न करीत आलों, पण त्यांचा उपयोग झाला नाहीं. आपण कल्पनेनें ध्येयें निर्माण केलीं व दृढविश्वास ठेऊन आपण त्या ध्येयांच्या मार्गे लागलों.

हिंसा आहे म्हणून ती घालविण्याकरतां आपण प्रतिस्पर्धी (opposite) कल्पना स्वीकारली व त्या मार्गानें जाऊं लागलों—अहिंसेची जपमाळ आपण हातांत घेतली. गेली का हिंसा त्यामुळें ? कमी तरी झाली का ? हिंसेच्या दुखण्यावर अहिंसेचा तोडगा निरुपयोगी नाहीं का ठरला ?

हिंसा ही वस्तुस्थिति आहे ती आहे. (that is) तिचें स्वरूप अगोदर नीट समजून घ्यावयास पाहिजे. हिंसा कां उत्पन्न होते ? कशा-मुळें होते ? याचीं कारणें आपण शोधूं या. हा शोध करण्याऐवजीं दूर पळून जाऊन अहिंसेच्या ध्येयाच्या मार्गे लागणें म्हणजे हिंसेची खरीखुरी

जाणीव करून घेण्याचें टाळणें होय. (avoidance) हा शोध टाळून–ओलांडून जाणें उपयोगी नाहीं. भीतीमुळें हा शोध आपण करीत नाहीं व कल्पनेमागें धांवण्याचा सोपा मार्ग आपण पत्करतों आणि त्यामुळेंच आपली धांवपळ उडाली आहे, गोंधळ माजून राहिला आहे. तेव्हां आपण सर्वांनीं जीं निरनिराळीं धार्मिक व राजकीय व इतर गुणचिन्हें (Labels) स्वतःच्या कपाळीं चिकटवलीं आहेत, त्यामुळेंच परस्परांत व देशादेशांत कलह चालूं आहे. हीं गुणचिन्हें जर आपणांस काढून टाकतां आलीं, केवळ मानव या नात्यानें आपण परस्परांशीं वागलों, देवपूजेच्या, गुरूच्या, देशाच्या देशाभिमानाच्या साऱ्या संकुचित कल्पना जर आपण सोडून दिल्या, तर खरा बंधुभाव प्रत्यक्ष अमलांत येईल. विश्वबंधुत्वाचें ध्येय ठेवावें लागणार नाहीं, व त्याच्यामागें आपण निरर्थक धांवणार नाहीं.

परकेपणा, दुजाभाव, ‘ मी व तूं ’ पणा, माझा देश व तुझा देश, माझा धर्म व तुझा धर्म, माझें पवित्र शास्त्र व तुझें पवित्र शास्त्र, माझे गुरुदेव व तुझे महात्मे, माझा सोशॅलिझम् व तुझा कम्युनिझम् व इतरांचे अनेकविध वाद ( ’ Isms ) हें सारें बाजूला ठेवून स्वतःच मन निर्मळ करून जर तुम्ही व मी या क्षणापासून वागण्याचा निश्चय केला, तर हिंसेची वर दिलेली कारणपरंपरा आपणांस पूर्णपणें समजून येईल. ( Comprehensive understanding ) आणि मग अहिंसेची प्रतिस्पर्धी कल्पना करून तिच्या मागें धांवण्याची आपणांस गरज उरणार नाहीं. हिंसेचें प्रत्यक्ष रूप स्पष्ट समजून घेण्याऐवजीं त्याच्या उलट म्हणून एखादें काल्पनिक अहिंसेचें ध्येय कल्पून त्याच्यामागें धांवणें हा निव्वळ वेडेपणा (Idiocy) होय. सारीं ध्येयें या अशाच पळवाटा होत. (Grand escapes from Reality.) हिंसेची प्रतिस्पर्धी हिंसाच; अहिंसा नव्हे. अहिंसा म्हणजे प्रेम. होय ना? आणि तेवढेंच नाहीं.

## ता. १२-९-४८ रविवारीं सायंकाळीं झालेलें कृष्णजींचें व्याख्यान

आपली रोजची वागणूक फार महत्त्वाची आहे. त्यावर आपलीं सुखदुःखें अवलंबून असतात. तेव्हां हा वागणुकीचा अथवा आचाराचा जिव्हाळ्याचा प्रश्न आपण विचाराकरितां घेऊं या व तुम्ही व मी मिळून त्यावर विचार करूं या. कारण आपल्याला सुखानें जगावयाचें आहे व त्याकरतां कसें वागावयास पाहिजे हें आपण समजून घेतलें पाहिजे. आपल्या मनामध्यें व बाहेर-कुटुंबांत, समाजांत, देशांत शांतता-समाधान पाहिजे. तसें नसेल तर आपल्याला सुख मिळणार नाहीं.

आचार अगर वागणूक ही विविध व निरनिराळ्या कृतींची मोट होय; अनेक फुलांचा तो गुच्छ होय. फूल म्हणजे हार नव्हे, तसेंच कृति म्हणजे वागणूक नव्हे. वेगवेगळ्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक इत्यादि पातळीवर कृति चढते. त्या विभिन्न कृतींना एकसूत्रांत गोवल्याशिवाय आपली वागणूक सुसंबद्ध असूं शकत नाहीं. तेव्हां आपल्या अनेक-वेगवेगळ्या कृतींना एका ठिकाणीं गोवणारें सूत्र कोणतें? त्यांना जोडणारा दुवा कोणता? आचार संपूर्ण व एकजिनसी होण्याकरतां व विस्कळितपणा टाळण्याकरतां आपलें जें इतरांशीं नातें आहे तें बदललें पाहिजे; नुसती बाहेरची आर्थिक घडी एकाच्या ऐवजीं दुसरी घालून कांहीं एक साधणार नाहीं. आपली कृति भेदभावावर अधिष्ठित असते. आणि भेद उत्पन्न होतात ते आपण ठेवीत असलेल्या श्रद्धेमुळें. ही श्रद्धा कांहीं कल्पनांवर उभारलेली असते. याच त्या देवाधर्मांच्या, शास्त्रवचनांच्या, गुरूंच्या व आर्थिक योजनांच्या कल्पना होत. व त्यामुळें एका कल्पनेच्या अनुयायांचा इतरांशीं कलह उत्पन्न होऊन शांतता नाहींशी होते व वर्गकलह सुरू होतो. या कल्पना सदैव स्थिर (static) असतात व मानवी जीवन सारखें पुढें पुढें चाललें

आहे. तें प्रवाही व गतिमान (dynamic) आहे. सारखें बदलतें आहे व या बदलण्यांतच सत्य भरलें आहे. तें कुठल्याहि कल्पनेंत अथवा ध्येयांत नाहीं. ध्येयें ह्या पळवाटा आहेत, तेव्हां आपलें परस्परांतील भेदभावात्मक नातें बदलून तें सहानुभूतीचें व प्रेमाचें असें आपण बनविलें तर दुःखाचें मूळच नाहींसें होईल. भेद उत्पन्न करणाऱ्या धर्मकल्पना जातील, आर्थिक विषमता नाहींशी करतां येईल, भौगोलिक देशाभिमान कोलमडून पडेल, राष्ट्रवादाच्या विषाचें अमृत होईल आणि केवळ मानव या नात्यानें आपले परस्परांचें संबंध—नातें सलोख्याचें, सहकार्याचें व सौजन्याचें होऊन अभिनव संस्कृतीचा नवोनव समाज जन्माला येईल.

( यानंतर कृष्णजींनीं कांहीं लेखी प्रश्नांचीं उत्तरें दिलीं. )

**प्रश्न** :—पत्नी या नात्यानें स्त्रीचीं कर्तव्यें कोणतीं ?

**उत्तर** :—हा प्रश्न स्त्रीनें विचारला आहे कीं पुरुषानें हें समजण्यास मार्ग नाहीं. कारण हा कोणीं विचारला ह्यावर त्याचें उत्तर अवलंबून राहील. पति-पत्नीचें नातें या देशांत मोठें विलक्षण आहे. नवरा हा प्राणी नेहमीं वरचढ व अरेराव असतो व त्याची आज्ञापालन करणें हेंच पत्नीचें प्रमुख कर्तव्य ठरतें. होय ना ! पती-पत्नींत जर खरें जिव्हाळ्याचें प्रेम असेल तर कर्तव्याचा व हक्काचा प्रश्न उद्भवतच नाहीं. **प्रेमी जीवाला कर्तव्यें नसतात**, हक्क नसतात. आपल्या प्रिय वस्तूशीं समरस व्हायचें एवढेंच त्याला कळतें. रिकाम्या व दरिद्री हृदयांना हक्क व कर्तव्यें सुचतात. पतीनें पत्नीच्या व पत्नीनें पतीच्या समपातळीवर येऊन—श्रेष्ठत्वाची पोकळ कल्पना सोडून—परस्परांशीं सहकार्य करावयाचं आहे. सहकार्यांतच आत्मविकास होत असतो.

एखाद्या वस्तूचें अगर प्रश्नाचें समग्र दर्शन कसें घडेल—(whole perception) या प्रश्नाला उत्तर देतांना कृष्णजी म्हणाले कीं,

मानवी मनांत अहोरात्र चाललेल्या भल्याबुऱ्या विचारांची कुतरओढ थांबून, मन सरोवराप्रमाणें प्रशांत व निर्मल झाल्याविना वस्तूचें संपूर्ण दर्शन होऊं शकत नाहीं. हेलकावे खाणाऱ्या लहरीलहरींवर सत्यतेचें प्रतिबिंब कसें पडायचें ?

देहाची निद्रा ती मनाची निद्रा असते का ? याचें उत्तर देतांना कृष्णजींनीं सांगितलें कीं, झोंपेंत मनाचे व्यापार चालूंच असतात. ते बंद पडत नाहींत. जागेपणीं देखील दुर्लक्ष केल्यामुळें एखादी वस्तु भानांतून जाते व चटकन् ध्यानांत येत नाहीं व आपण म्हणतों कीं, 'मी ही अमुक महत्त्वाची गोष्ट विसरलों कशी ! झोंपलों तर नव्हतों ना ?' तेव्हां जागेपणीं सुद्धां झोंपाळूपणा असतो. मनाची ही जाणीव (Consciousness) ही वरची–बाहेरची पातळी (plane) आहे. त्याखालीं जाणिवेंत प्रवेश न केलेला (the unconscious) गंभीर व खोल प्रवाह एकसारखा वहात आहे. व तोच न जाणतेपणा (the great unconscious) विचार करकरून थकलेल्या व प्रश्नाचें समर्पक उत्तर न मिळाल्यामुळें हताश झालेल्या निद्रिस्त मनावर जाऊन आदळतें व **या अज्ञात जाणिवेच्या अचानक आघातांत** ( projection of the unconscious on the superficial mind ) गूढ प्रश्नांचीं उत्तरें आपल्याला मिळतात व सत्यतेचें समग्र दर्शन घडतें.

एकाग्रता–(Concentration) एकाच कल्पनेच्या मार्गें लागणें, नाक धरून बसणें, ध्यानाचा आव आणणें म्हणजे इतर साऱ्या विचारांची हकालपट्टी करणें होय. ते विचार टाळणें होय व आपण ठरविलेल्या–स्पष्टपणें बोलायचें तर आपल्या मनावर ठसविलेल्या विशिष्ट, तुसड्या व भेदमूलक कल्पनेभोंवतींच पिंगा घालणें होय. त्यांतूनच विचारांचीं वादळें निर्माण होतात. एकाग्रता म्हणजे कलहांचीं पिलें प्रसवणारा पिंगा होय. समग्रतेचें संकलन–संपूर्ण जाणीव–अभेद-

भावाचें भान–अणुरेणूपुढें लोटांगण घालणारी जीवाची जातिवंत नम्रता–ही, हीच खरीखुरी एकाग्रता. उत्पत्ति-स्थिति विलयाचें जें एक अग्र, ज्यांत साऱ्या वस्तुजातीचा समावेश होतो आहे त्या तसल्या सर्वव्यापी सत्-तत्त्वाचें ध्यान लागणें हें आत्मचिंतनच (meditation) महत्त्वाचें आहे.

**( ता. १३–९–४८ रोजीं सर्व्हन्टस् ऑफ इंडिया सोसायटी-मध्यें सकाळीं ८ वाजतां झालेल्या प्रवचनाचा सारांश. )**

तुम्ही व मी कशाकरतां जमावयाचें? येथें घटकाभर गंमत करण्यासाठीं नव्हे ना? सार्वजनिक ठिकाणीं आपण जमतों, चर्चा करतों व माझीं प्रवचनें तुम्ही ऐकतां. तुमच्यापैकीं कांहीं जणांनीं माझीं प्रवचनें मद्रास, मुंबई, बंगलोर इत्यादि ठिकाणीं ऐकलीं आहेत. कांहीं झाला आहे का फरक तुमच्यांत? तुम्हीं तो घडवून आणला आहे काय? तसें नसेल तर रिकामी श्रवणभक्ति करून तुम्हांला लाभ नाहीं व तोंडाची टकळी ठिक-ठिकाणीं चालवून, तुम्ही आहांत त्या ठिकाणावरून तुम्हांला हलविण्याची मला शक्ति नाहीं. हा तुमच्या श्रवणाचा व माझ्या वाणीचा दुरुपयोग होत आहे. असली तुमची माझी वांझोटी गांठभेट होण्यापेक्षां, आपण या ठिकाणीं न जमलेलेंच बरें. तेव्हां तुम्हांला बदलावयाचें नसेल, तुमची श्रीमंती व बडेजाव सोडायचे नसतील, सुखाचा जीव ऐषआरा-माच्या गुंगींत असेल, दुसऱ्याचें दुःख पाहून तुमच्या डोळयाला पाणी येत नसेल, गोर–गरीब, दीन–दुबळे, अनाथ–अपंग यांचे हाल पाहून तुमच्या अंतःकरणाची कालवाकालव होत नसेल.

With tears for nought but other's ills,
And then they flowed like mountain sills.

व कारुण्याच्या पुरांत–दयेच्या सागरांत बुडून जाऊन स्वतःची संपत्ती परदुःखनिवारणीं तुम्हीं खर्च करीत नसाल—तर, तर, मित्रमंडळींनो, ही निरर्थक श्रवणभक्ति कशाला?

त्या तुमच्या देवपूजा, स्नानसंध्या, गीतापुराणें, या नाहीं तर त्या गुरूच्या मागें धांवणें–हाच जर क्रम, तुमची माझी गांठ पडल्यावरहि, माझीं प्रवचनें वाचून, ऐकूनहि, तुम्ही पुढें चालूं ठेवणार असाल, तर यापुढें येथें येण्याचे श्रम तरी कशाला घेतां ? शब्दांचा कांठ सोडून, आचरणाच्या डोहांत तुम्हांला उडी घ्यायची नसेल, व स्वतः पोहून, मीपणाचा तळ गांठून, तें मी–तूं पण तळीं बुडवून नवीन अवतारांत प्रकट व्हावयाचें नसेल, आणि त्यानंतर सत्य साक्षात्कार क्षणाक्षणाला अनुभवावयाचा नसेल, तर तुमच्या हृदयांतच असलेल्या परमसत्तेच्या राज्यांत तुम्हांला प्रवेश मिळणार नाहीं. सुईच्या अग्रांतून एक वेळ उंट जाईल, पण देवाच्या राज्यांत श्रीमंत मनुष्य केव्हांहि जाऊं शकणार नाहीं. तुम्ही व मी मिळूनच ती देवनगरी येथें निर्माण करीत आहोंत. त्या निर्मितीला किंमत द्यावी लागते. पैशाची नव्हे– सत्याचरणाची. ती जर तुम्हांला द्यावयाची नसेल तर मित्रहो, पाय शिणवून तुम्ही येथें येऊं नका व मला माझी वाणी शिणवायला लावूं नका. तुमच्या माझ्या दरम्यानची देवाणघेवाण (Exchange and Communication) आचारविहीन होणार असेल तर या खटपटींचा उपयोग काय ? तेव्हां तें तसलें अभद्र व अमंगल असें स्वयं-मुंडन (Self-shaving) टाळण्याकरितां आपणां श्रोत्या-वक्त्यांच्या स्वरसंगीतातून अल्पस्वल्प आचारांची रागदारी आपण निर्माण करूं या. ह्या आनंदगर्भ नाटकाकरतां आपण घेणार ना एक तिकीट विकत ! हें माझं प्रचारकार्य आहे–आग्रह नव्हे हो ! या प्रयोगांत केवळ प्रेक्षक राहून भागणार नाहीं–प्रत्येकानें नटहि पण बनले पाहिजे. आणि येथें या प्रयोगामध्यें (Experimentation) नटांना देखील तिकीट काढावें लागतें– मूल्य द्यावें लागतें !

## ता. १६-९-४८ गुरुवार : चर्चासभेचा सारांश

विचारांच्या तंद्रींत प्रत्यहीं भ्रमण करणारा मनुष्य आपल्या सभोंवतीं, वर-खालीं सौंदर्याची कशी खैरात चालली आहे हें पाहण्यासदेखील विसरतो. सृष्टिदेवता नवोनव वस्त्रांचें प्रदर्शन करीत असते. ती ढगांची इतस्ततः धांवपळ व कालचें शुभ्र चांदणें आपल्यापैकीं कितीजणांनीं बरें याकडे लक्ष दिलें असेल ? बाहेर काय चाललें आहे हें जर आपण पाहिलें नाहीं, त्याच्याशीं समरस झालों नाहीं, त्यापासून मिळणारा आनंद घेतला नाहीं, तर स्वतःच्या आंत–हृदयाच्या आंत कसला व्यापार चालला आहे हें आपल्याला समजणार तरी कसें !

मनुष्य हा अनेकविध गुणविकारयुक्त प्राणी आहे. ( man is a composite being. ) रागालोभांचें, सुखदुःखांचें व प्रेम–द्वेष–त्वेषांचें विपुल भांडार गरिबांतल्या गरिबाजवळ असतें. असला संचय सहजसिद्ध असतो. व्यक्तीमध्येंच हीं सारीं द्वंद्वें समाविष्ट झालेलीं आहेत. रागावणाराहि मी व लोभावणाराहि मीच. हा 'मी'च सारें कांहीं अनुभवतो. या मीचें यथार्थ ज्ञान करून घेणें हें प्रत्येकाचें काम आहे. हें आत्मज्ञान (self knowledge) झाल्याशिवाय, इतर सारें व्यर्थ होय.

## विरोधी–प्रतिस्पर्धी कल्पनेकडे धांव–

(Running towards the opposite)

माझ्यामध्यें हिंसा आहे. ती वाईट आहे व तिच्यापासून मला मुक्त व्हावयाचें आहे आणि मग मला शांतता मिळेल. म्हणून अहिंसेचें एक ध्येय कल्पून मी त्या मागें धांवतों. अहिंसा साधण्याचा प्रयत्न करतों. हिंसेपासून दूर दूर सरकतो व याचा परिणाम माझ्यांत हिंसा कां उत्पन्न झाली हें शोधून काढण्याऐवजीं, जी अवस्था माझी नाहीं, त्या अहिंसेचा छंद मला लागतो. पण अशा छंदांना एक नवा बंध निर्माण

होतो व जुना हिंसेचा पाश जागच्या जागींच राहतो ! असा अधिकच घोटाळा उडतो. हिंसा बाजूला सारून, मी 'अहिंसा' हें नवें नांव निर्माण करतों. पण 'अहिंसा' हें हिंसेचें 'नवस्वरूप' बनतें. नाण्याची खालची–वरची बाजू अहिंसा–हिंसा बनतात. (obverse and reverse of a coin.)

ध्येयें बनविणें म्हणजे नवीं नवीं नांवें निर्माण करणें होय. पण हा खटाटोप करणें म्हणजे आहे ती वस्तुस्थिति समजावून घेण्याची एक प्रकारची टाळाटाळ करण्यासारखें होतें. हिंसा टाळण्याकरितां, अहिंसेची पळवाट कशाला शोधतां ? हिंसेचें वास्तविक स्वरूप न्याहाळून पाहूं या. उदाहरणादाखल आपण 'राग' हा विकार घेऊं या. आपण प्रत्येकजण रागावतों. राग आपल्या नाकावर बसला आहे. पावलो-पावलीं आपण रागावतों. व तो राग आपल्याला सोडावयाचा आहे. राग नाहीं अशा प्रसन्न अवस्थेंत आपणांस प्रवेश करावयाचा आहे. आपल्या मनालाच राग येतो; होय ना ? राग दडपून उपयोगी नाहीं; तो पुन्हां उमळतो. तो नियमबद्ध केला तरी नाहींसा होत नाहीं, संयम राखून रागाचें निर्मूलन होत नाहीं. ध्येयामागें धांवून, बैरागी बनून राग नाहींसा होत नाहीं. कफनीखालीं झांकलेले अंगार चांगले जळजळीत असतात. राग आपणां सर्वांना जाळीत असतो.

वस्तुस्थितीचा आपणांवर होणारा आघात तिचें आव्हान (Challenge) आणि आपलें त्याला प्रत्युत्तर (response) म्हणजेच अनुभव बनतो. अपूर्ण अनुभवच स्मृतिपटल व्यापून राहतो आणि त्याच्या स्मरणामुळेंच विकार आणि विचार उद्भवतात. स्मरण थांबलें तर विकार व विचार बंद पडून आहे त्या वस्तुस्थितीचें पूर्णज्ञान (pure awareness) प्राप्त होतें. क्रोधावस्थेंत, तो आपण अनुभवीत असतांना, त्याची जाणीव (Consciousness) नसते. जाणीव झाली कीं, अनुभव संपतो ! स्मरणव्यापाराला सुरवात होते; व स्मरणचक्र सुरूं झालें कीं, विचारविकारांची धांदल सुरूं होते !

तेव्हां राग येणारा 'मी' व मला रागविन्मुक्त व्हावयाचें आहे असें म्हणणारा 'मी' हे एकाच व्यक्तीचे निरनिराळे विभाग असल्यानें, या दोहोंच्याहि पलीकडे जाऊन ज्या वेळीं मी शोध करीन त्याच क्षणीं परस्परविरोधी सर्व विचार थांबून, स्मरण नाहींसें होऊन निर्मळ व शुद्ध मनाला जाणीव स्फुरेल आणि त्या ज्ञानांतच सत्याचा साक्षात्कार होत असतो. हें सारें क्षणाक्षणाला, नवोनव घडत असतें. यालाच जीवन म्हणतात.

आलेल्या रागाची आपण निर्भर्त्सना केली नाहीं. (no condemnation) आणि समर्थनहि केलें नाहीं. (no justification) तर रागाच्या कारणाचें यथार्थ दर्शन होऊन (perception) राग आपोआप नाहींसा होईल. जी गोष्ट रागाची, तीच लोभाची, हिंसेची. तेव्हां मुख्यतः आपणांस हिंसा घालवावयाची असेल तर, हिंसेचे समर्थन अथवा निर्भर्त्सना, अथवा निंदा न करतां, हिंसेचें कारण जें विभेदन exclusion) त्याचें दर्शन झाल्याबरोबर (immediately it is perceivéd) व्यक्ती-व्यक्तींत अभेदात्मक प्रेमभाव निर्माण होईल, ताबडतोब उदयाला येईल, कलहाचें बीज भाजून निघेल, लढे माजणार नाहींत, जागतिक संहार होणार नाहीं.

When a feeling like anger arises, we term it name it as anger or violence or whatever might be and then remember it. If we do not name a feeling, it exhausts itself and the problem disappears at once.

## ता. १७-९-४८ भारत सेवक समाजांतील सकाळच्या चर्चासभेचा सारांश

देव भेटेना आणि पूजा सुटेना-निदान पूजा सोडून पहाना कांहीं दिवस! भेटायचाही फट्दिशीं देव! नाहीं म्हणून कोण सांगणार? कारण ढोंगधत्तुऱ्यांत तो तुमचा देवच काय, कांहीं एक नसतें.

आणि माझीं प्रवचनें ऐकायला येतां रिकामीं-तें हो कां? आजवर तुम्ही काय थोडीं प्रवचनें ऐकलींत! बायबल, गीता, कुराण, पुराण, गाथा, इत्यादि ग्रंथांतील वचनांचा वर्षाव तुमच्यावर झाला. माझ्या प्रवचनाचे चार थेंब आणखी त्यांत पडले तरी तुमचीं रिकामीं हृदयें भरून कां येणार आहेत परस्परांच्या प्रेमानें! निकामी जीवनतरूला नवाचारांची पालवी कां फुटणार आहे?

माझ्या शब्दाशब्दांच्या धारा गंगेंतल्या गोट्यावर पडतील तरी ते कोरडेच राहणार-पाण्याबाहेर काय किंवा आंत काय, दोन्ही सारखेंच. तुम्ही शेवाळ्यासारखे मृदु बनलांत तर शब्दांचा ओलावा तुमच्या जिव्हाळीं पोंचून तुमची जिवनलता आचारांच्या फलपुष्पांनीं डंवरून जाईल! जिवजाताशीं जमलेल्या तुमच्या जीवाभावाचा सुगंध वाऱ्यावर वहात जाऊन अखिल विश्वांत संचार करील आणि अवघ्या मानव-जातीला शांततेच्या सिंहासनावर सम्राटपदाचा अभिषेक करील.

We were discussing about the importance of immediate transformation and about the things that prevent us from radical regeneration. We were discussing the importance of the individual and his relationship with the world; how when there is a contradiction, there cannot be honest thinking and how real understanding brings about transformation; also that love is not a sentiment or an emotion.

We must find out for ourselves the truth about the individual and his relation to the world,

how the transformation of the individual immediately affects the world in which he lives. The world we live in, is the world of our immediate relationship, with our family, our boss, our cook etc. and not with the geographical world. If you can transform intrinsically, then there is sure to be an immediate transformation, not superficially but deeply in the relationship with your world. Will not this effect produce a revolution in your relationship? Is it not important to understand the necessity of individual transformation which will affect the world in which you live? Is that not a practical way of affecting the world you live in?

## ता. १८-९-४८ शनिवार सायंकाळीं ६-८
## चर्चा-सभेचा सारांश
### हिंसा-अहिंसा

काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, या विकारांपैकीं राग हा एक मानवी मनाचा विकार आहे (a feeling). विकार उत्पन्न झाला कीं आपण त्याला 'राग', 'लोभ' यासारखें नांव देतों (we name it or term it.) नंतर त्याचें ग्रहण (storing), व जतन (fixing) आणि शेवटीं त्याची स्मृति (Remembering). स्थिर होते. विकार निवेदनासाठीं उपयोगांत आणला जातो-(for communication.) अशा रीतीनें नांव दिल्यापासून निवेदनापर्यंत घटना होते (Things and events happen thus).

राग आल्यावर हिंसावृत्ति उत्पन्न होते. रागच आला नाहीं तर मग कुठली आली आहे हिंसावृत्ति? मन रागावतें. वास्तविक राग आपल्याला नको असतो. त्याच्यापासून आपल्याला मुक्त व्हावयाचें आहे. तें कसें याचा आपण विचार करूं या. मनानेंच विचार करायचा. तेंच आपलें साधन-उपकरण. ज्या मनानें विचार करावयाचा तें स्वच्छ पाहिजे. त्यावरील पूर्वग्रह पुसले पाहिजेत. धर्म, संस्कृति, शिक्षण वगैरे सर्व संस्कारांची पार्श्वभूमि बाजूला काढली पाहिजे आणि अशा निर्मळ आणि मोकळ्या मनानें माणसाला राग कां येतो याचा शोध केला पाहिजे. तो स्वतःच ज्याचा त्यानें करावयास हवा. आपणांस राग कां येतो? कांहींतरी मनाविरुद्ध घडतें व आपण चटदिशीं रागावतों. राग हें आघाताचें प्रत्युत्तर असतें. ( It is a response to a challenge. ) हा आलेला राग समजून घेण्याकरतां, तो न दडपतां, ( no suppression ) त्याची निर्भर्त्सना न करतां ( without condemnation ) अगर त्याचें समर्थनहि (no justification) न करतां-त्याच्याबद्दल दुसरी कोणतीहि काल्पनिक वस्तु न निर्माण करतां ( without any substitution अगर त्याचें **उच्चीकरण** न करतां (no sublimation) आपण तटस्थ-शांत राहिलों तरच आपल्याला राग कां आला याचें कारण प्रत्यक्ष कळेल-स्पष्ट उमजेल. (awareness will arise).

राग मला येतो व तो घालविण्याची खटपटहि मीच करतों. या 'मी' लाच सारें कांहीं होतें. **रागावणारा** ( angry ) व राग (anger) ही एकच वस्तु आहे. राग हा विकारच उत्पन्न झाला नाहीं तर रागवणारा 'मी' अस्तित्वांत येत नाहीं. (The angry and his anger are the same and not different.) विचार आणि विचार करणारा हे एकच असतात. (Thinker and the thought are the same.) विचारच उद्भवला नाहीं तर विचार करणार कोण असणार?

तेव्हां जर आपण रागासारख्या एखाद्या विकाराला नांव दिलें नाहीं तर काय होईल ? नांव शब्दानें घ्यावचें असतें. शब्द म्हणजे राग नव्हे. (word is not the thing.) मनाची कार्यकक्षा शाब्दिक स्मृति-करणापुरतीच. जर रागाला शब्दरूप दिलें नाहीं तर **मनाचा व्यापार नाहीं**. (if there is no naming, there is no operative mind.) मन शिल्लक उरत नाहीं, विचार रहात नाहीं. रिकामा अवकाश (void) निर्माण होतो. या अवस्थेत विकार-विचार नसतात. ही पोकळी (void) शब्दानें आपण भरून काढीत नाहीं. भीति हा एक शब्दच असल्यानें, ती नाहींशी होते व त्या निःशब्द स्थितीला असीम शांतता (absolute stillness) अवस्थेला पोहोंचणें आहे–तो मुक्कामाचा शेवट नसून बंधनांची ' तूट ' होय.

मानवी मन अशा रीतीनें पूर्ण प्रशांत झालें (absolutely quiet) तर त्या प्रशांततेंत, दुसरें कांहीं एक नसतें. ही प्रशांतता सहजसिद्ध होते; मुद्दाम आणलेली नसते. (not induced.) त्या प्रशांततेंत जें कांहीं आहे तेवढेंच असतें. या स्थितीला कारण नसतें. (causeless) व ती कालातीत (timeless) असते व म्हणूनच ती अनंत होते. त्या अनादि अनंत (without cause and without end) प्रशांत अवस्थेंत जें कांहीं आहे (what is) त्या सत्याचा साक्षात्कार होत असतो, तोच आत्मसाक्षात्कार, व तो प्रत्येक व्यक्तीला अनुभवितां येईल. त्याचा अनुभव आपण–प्रत्येक व्यक्तीनें–घेतला पाहिजे. तें जें कांहीं आहे तें स्फुरणशील आहे, नवोनव आहे, प्रत्येक क्षणीं अनुभवावयाचें आहे. तो प्रवासाचा शेवट नाहीं. स्वानंदाचा अक्षय्य वट आहे.

## ता. १९-९-४८ रविवार सायंकाळच्या सभेचा संक्षिप्त वृत्तान्त

घोटाळा, अव्यवस्थितपणा व गोंधळ माजल्यामुळें काय करावें हें कोणास सुचत नाहीं. भ्रमांत पडलों आहोंत तुम्ही आम्ही बहुतेक. या भ्रमानें सारें विश्व अंतर्बाह्य व्यापून टाकलें आहे. काय करावें हें उमजत नसतांना त्या गोंधळांत आपण कांहीं तरी करतों आणि त्यामुळें आपला सगळा व्यवहार अव्यवस्थित-स्वच्छंदी असा चालला आहे. समाजांत व देशांत तोच प्रकार आहे. राजकीय क्षेत्रांत बेबनाव, आर्थिक क्षेत्रांत भीषण विषमता, समाजांत वर्गकलह, धर्माधर्मांत द्वेषभावना व व्यक्ती-व्यक्तींत दुजाभाव हा घोटाळा दिवसेंदिवस वाढत चालल्यानें, त्याला कसा आळा घालावा, तो कसा समूळ उखडावा व सुखसमाधान कसें निर्माण करावें हा आपल्यापुढें प्रश्न आहे व त्याला आपण उपाय शोधूं या.

व्यक्ती म्हणजेच समाज. व्यक्तिनिरपेक्ष समाज नाहीं. समाज म्हणजे व्यक्तीव्यक्तींमधील नातें-संबंध. जीवन म्हणजे नातींच दृढ करावयाचीं. (to be is to be related.) माणसाला एकलकोंडें राहतां येत नाहीं. लोकांशीं सलोख्यानें व सहकार्यानें वागूनच संबंध घनिष्ट करावे लागतात.

तेव्हां हा गोंधळाचा प्रश्न सोडविण्याकरितां माणसामाणसांमधील असलेल्या नातेसंबंधांचा ( relationship ) विचार करायला हवा. कसें आहे तें नातें ? तें मनानें समजून घ्यायला पाहिजे. तेवढ्याकरितां मन गोंधळलेल्या स्थितींत उपयोगी नाहीं. मन शांत केलें पाहिजे व तोंवर मनाच्या बिघडलेल्या स्थितींत आपण जें कांहीं तरी करतों व कसेंतरी अव्यवस्थित वागतों ती वागणूक बंद करावयास पाहिजे. पण कांहीं न करण्याची आपल्याला भीति वाटते; स्वस्थ बसण्याची कला आपण शिकतच नाहीं. गोंधळलेल्या मनानें घडणारी प्रत्येक कृति घाल-मेल व घोटाळा उत्पन्न करणारी अशीच असते. तेव्हां व्यक्तीनें गोंधळाचें कारण हुडकून काढल्याशिवाय कृति करतां उपयोगी नाहीं.

तोंवर आचार बंद केला पाहिजे. ही स्वस्थ बसण्याची कला साधली कीं, भोंवतालचा घोटाळा दूर करण्याचा मार्गहि पण सांपडतो.

नव्या दृष्टीनें, नव्या मोजमापानें परिस्थिति जोखली तर राष्ट्रभावना—सार्वभौम शासनसंस्था (sovereign power states) सत्ता वाढविण्याच्या नादीं लागल्यानें एकमेकांबरोबर लढाया सुरू करीत आहेत व त्यांत लाखों माणसांचा संहार चालला आहे. उपासमार, आर्थिक विषमता, वर्गकलह, व्यक्तिद्वेष हा सारा राष्ट्रकल्पनेचा परिणाम आहे.

तेव्हां प्रत्येक व्यक्तीनें, देशाच्या, धर्माच्या, आर्थिक व्यवस्थेच्या, समाजरचनेच्या, संघस्थापनेच्या नांवाखालीं परस्परांना विभिन्न लेखण्याचा पूर्वापार पडलेला पायंडा जो सुरू ठेवला त्याचें कंबरडें मोडून जर भेदभावाच्या उभारलेल्या भिंती सपाट करून टाकल्या तर एका क्षणांत क्रांति घडून येईल. ही कलहांची उतरंड ढांसळून पडेल. माणसामाणसांत बंधुभाव सहज सिद्ध होईल. घोटाळा, गोंधळ, घालमेल सारें कांहीं थांबेल.

तेव्हां तुम्ही व मी हें **थैमान** घालीत असलेलें (rampant) भाऊबंदकीचे उच्चनीच पातळीवरील (on all levels) भूत संपूर्णपणें समजून घेऊन तें गाडून टाकलें—त्याला कायमची मूठमाती दिली तर काय होईल आहे ठाऊक? समजुतदारपणाचें सूत्र निर्माण होऊन, भ्रातृभावाचें नवबंधन (good will) अखिल मानवांत निर्माण होईल. कोणालाहि 'हार' जावयाचें नाहीं असा अट्टाहास बंद पडून, परस्पर सहकार्याचे पुष्पहार गुंफले जातील व ते आपण परस्परांच्या गळ्यांत घालूं लागूं—एकमेकांचे गळे कापणार नाहीं. या असल्या प्रेमानेंच जग वश होईल. या असल्या रचनात्मक जाणिवेमधून (creative understanding) नवसमाज व अभिनव संस्कृति जन्माला येईल. गोंधळघोटाळ्याची काळोखी रात्र संपून प्रसन्नतेची पहांट उगवेल व विचार—उच्चार—आचारांचें सुरेल संगीत सुरू होऊन जीवनाचें आकाश मंगलमय होऊन जाईल. त्या संपूर्ण जाणिवेचें सिंचन मानवी आचारावर

होऊन, संपूर्ण मानवी आचारवल्ली मधुर भाव पूर्णतेनें डंवरून जाईल, तिला ऐक्यभावाची पुष्पें व शांततेचीं फळें लागतील.

## प्रश्नोत्तरें

( १ ) लग्नसंस्था ही एक व्यापारी बाब होऊन बसली आहे. इज्जत, दर्जा, श्रीमंती वगैरे गोष्टी अजमावून (Calculating) स्त्री–पुरुष जर लग्न करूं लागले तर त्यांच्या दरम्यान निरपेक्ष प्रेमभाव कसा नांदेल ? पत्नी जर आर्थिक व्यवस्थेंत नवऱ्यावर सर्वस्वीं अवलंबून असेल, तर प्रजावर्धनाचें व नवऱ्याच्या सुखसोयींचें एक घरगुती साधन ती स्त्री बनते. तसलें लग्न हा निव्वळ कायदेशीर व्यभिचार होय. नवऱ्याची अगर बायकोची अरेरावी आली कीं प्रेम संपलें. धर्म-कल्पनेनें, संस्कृतीनें व सामाजिक चालीरीतीनें बायको ही नवऱ्याची गुलाम, सैंपाकीण, भोग्यवस्तु झाली आहे.

परस्परांतला परकेपणा, नवराबायको जर मनानें विसरतील–नुसत्या शब्दानें नव्हे–आणि त्याप्रमाणें कृति करतील, तर त्यांच्या दरम्यान प्रेमाचा अखंड झरा वहात राहील व त्या शुद्ध जलांत प्रत्यहीं व प्रत्येक क्षणीं अवगाहन करून स्वतःचें वैवाहिक जीवन आनंदमय करून टाकतील.

( २ ) वैवाहिक जीवनांत प्रेम असेल, तर उच्चनीचत्वाच्या कल्पनेला स्थान नसतें एकमेकांचा मत्सर पेटला तरच अरेरावी करण्याची बुद्धि नवरा अगर बायको यांनीं सुचते. धर्माच्या व संस्कृतीच्या नांवाखालीं बायकांवर लादलेल्या बंधनामुळें परस्परांत खटके (Friction) उडतात, आणि मग सुखाचा संसार मावळतो. संसाराला प्रेम लागतें, परस्पर आदर लागतो, सौजन्याची संपत्ति लागते; नाहींतर मोठा थोरला वाडा, गडगंज संपत्ति आणि नवरा-बायकोची विभक्ति ! कां तर प्रेम नाहीं. ‘ प्रेम ’ हा शब्द म्हणजे प्रेम नव्हे. एकासाठीं दुसऱ्यानें सर्वस्व अर्पण करणें, तें सहजपणें देणें, व त्याच्या पोटीं एकात्मभावाची दशा अथवा

अवस्था येणें तिलाच सामान्यतः 'प्रेम' असें सुटसुटीत नांव आहे. प्रेम ह [illegible] मनोरम भाव आहे. सर्वस्व त्यागाची ती एक सुंदर अवस्था आहे.

( ३ ) पुढारी ही आपलींच प्रतिबिंबें ( Projections ) होत. जसे तुम्ही तसेच तुमचे पुढारी. कोणत्याहि पातळीवर जा,—राजकीय, धार्मिक, आर्थिक, सामाजिक—पुढारी म्हटला कीं, सत्ताप्रिय असावयाचाच. आणि सत्तेच्या पाठोपाठ संहाराचें सुदर्शनचक्र मारखें लागलेलें रहावयचाचें. तेव्हां हवेत कशाला तुम्हांला असले पुढारी ?

( ४ ) पोस्ट खात्यासारख्या तांत्रिक ( Technical ) व निरुपद्रवी संघटना वगळून इतर सार्‍या संघटना ( organisations ) सत्ता काबीज करण्याकरतां असतात आणि त्यांतूनच स्वतंत्र व संपूर्ण सत्ताधारी राष्ट्रें निर्माण होतात. निरनिराळे धर्म, पंथ, आर्थिक योजना—या संघटनाच आहेत. परंतु त्यांतून कलहच निर्माण होऊन महायुद्धें होत आहेत.

## ता. २०–९–४८ सोमवार : भारत सेवक समाजांतील प्रवचनांचा सारांश

**उपजीविकेचीं साधनें :**—उपजीविकेचें योग्य साधन कोणतें ? आपण कोणता धंदा करावा ? कारण जीवनक्रम व्यवस्थितपणें चालला पाहिजेच आणि त्याकरतां उद्योग हा प्रत्येकानें केलाच पाहिजे. स्वतःला व स्वतःच्या कुटुंबाला पुरेसें अन्न, वस्त्र व आच्छादन म्हणजे घर यासाठीं लागणारा पैसा मिळविला पाहिजे. दुसर्‍यानें मिळविलेल्या पैशावर वरील गरजा भागवितां उपयोगी नाहीं.

तेव्हां आपण कोणता धंदा करावा, कोणता मार्ग पत्करावा हा तुमच्या व माझ्यापुढें प्रश्न आहे व तो आपण उभयतांच्या विचार-विनिमयानें सोडवूं या.

(१) **लष्करी पेशा** :—सैन्यांत दाखल होणें हा सगळ्यांत सोपा मार्ग होय. केवळ शरीर कमावलें म्हणजे झालें. वरिष्ठांचे हुकूम अक्षरशः पाळणें एवढेंच शिक्षण मनाला मिळतें. स्वतंत्र विचाराला जागा नाहीं. व्यक्तिजीवन संपूर्णपणें जखडून टाकलेलें असतें. (completely bound and regimented) सैन्य हें राष्ट्राचें भूषण का दूषण? दुसऱ्या राष्ट्राचा संहार करण्याकरतां ज्या सैन्यासारख्या संघटनेचा उपयोग केला जातो, ती व्यवस्था भूषण कशी? मुळीं राष्ट्रीयत्व हाच रोग आहे. सार्वभौम व स्वतंत्र सत्ता टिकविणें व वाढविणें हा त्याचा हेतु आणि त्यामुळेंच लढाया. लष्कर, नाविकदल व वैमानिकदल यांना लागणारा बेसुमार खर्च सारखा वाढत चालला आहे. नागरी जीवनाला लागणारा तो खर्च मग कुठून करावयाचा? परराष्ट्राची आर्थिक नाकेबंदी या खर्चाची तोंड-मिळवणी करण्याकरतांच होते ना? तेव्हां राष्ट्राराष्ट्रांत गटबाजी निर्माण करून, सत्ताविकास साधण्याकरतां सामुदायिक संहार करण्याकरतां (mass murder) उभारलेला सैनिक धंदा—लष्करी पेशा सर्वस्वीं त्याज्य होय.

(२) **पोलीस दल** :—ह्या दलांत व्हावें कां आपण सामील? तुम्ही अगर मी—म्हणजे तुमची मुलें? नागरी संरक्षणाकरतां ही योजना आहे. लष्कराचेंच हें घरगुती भावंड. तुम्ही व मी भांडतों, चोऱ्यामाऱ्या करतों, सार्वजनिक शांततेचा बिघाड करतों, इतर अनैतिक गुन्हे करतों. ते टाळण्यासाठीं (prevention) व झालेले गुन्हे शोधण्यासाठीं (investigation) तसेंच समाज, नागरिक रक्षणासाठीं पोलीस दलें जगभर उभारलेलीं आहेत. समाज आहे त्या स्थितींत राखणें (status quo) हें पोलीस खात्याचें मुख्य काम होय. सत्तेचे सारे दुष्परिणाम याहि खात्यांत आहेत. ज्यांना नवसमाज व नवीनव मूल्यें अस्तित्वांत आणावयाचीं आहेत, त्यांना हाहि धंदा पोट भरण्याकरतां योग्य नाहीं. पोट वाढविणारा (expansive) हा धंदा त्याज्य होय.

**( ३ ) वकिलांचा धंदाः**—समाजाचें आर्थिक रक्त शोषण करून, घष्टपुष्ट बनणारा वकील हा प्राणी समाजकंटक होय. इतरांचें संकट ही वकीलसाहेबांची संधि! हा संधिसाधू प्राणी जितक्या लवकर नाहींसा होईल तितकें बरें. वकिली हें योग्य उपजीविकेचें (right livelihood) साधन असूं शकत नाहीं. शब्दसृष्टीचा हा परमेश्वर शब्दाचें जाळें विणून धनिक मासे पकडण्याच्या उद्योगांत व ते गट्ट करून टाकण्यांत दंग झालेला असतो. सज्जनांनीं या दंगलींत कशाला सामील व्हावें ?

**(४) सरकारी नोकरी :**—भाकरीकरतां राष्ट्रीय सरकारची नोकरी करणें म्हणजे राष्ट्रीयत्व, विभेदन, कलह, लढाया, संहार, आर्थिक संकटें, उपासमार वगैरे प्रकार वाढविणाऱ्या संघटनेंत सामील होणें होय. स्वतःला दिवाळी करतां यावी म्हणून इतरांची होळी करणारी ही परंपरा आहे. सरकारी नोकरांच्या या अमानुषी ( inhuman ) पोलादी चौकटींत उपजीविकेचा योग्य मार्गच असूं शकत नाहीं.

## ता. २१–९–४८ मंगळवार सायंकाळच्या प्रवचनाचा सारांश

व्यक्ति जीवनांत क्रांति कशी घडवून आणायची याबद्दल आपण विचार करूं या. आपण पदोपदीं रागावतों, हिंसा करतों, आपला लोभ व मोह आपल्याला नडतात, मत्सर आपल्यासा जाळीत असतो. या साऱ्या विकारापासून आपल्या स्वतःला सोडवून घ्यावयाचें आहे. हीं बंधनें अंतस्थ ( internal ) व मानसिक ( psychological ) असल्यानें बाहेरचें कुणीतरी येऊन आपली सुटका करणार नाहीं. आपली सुटका आपणच केली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीनें आपली मुक्ती (liberation) साधली पाहिजे.

आपली जाणीव (consciousness) विचार, विकार व कृति (thinking, feeling and action) या तीन पायऱ्यांवर अधिष्ठित असते. आपण विकारापासून विचार करावयास सुरुवात करूं या.

राग आल्याबरोबर, क्रोधपूर्ण स्थितींत ( experiencing ) त्या क्षणापुरतें त्याला नांव नसतें. नुसताच राग असतो; रागावणारा 'मी' नसतो. हा अनुभव–झटका–संपला कीं—अनुभव ( experience ) त्याचा भोक्ता 'मी', त्या विकाराचें राग हें नांव ( terming ), निवेदन ( Communication ), संचय ( Storing ), दडपण (Suppression), त्याच्याबद्दल प्रतिकल्पना (Substitution) व तो राग पराकोटीला पोहोंचविणें (Sublimation) हा सर्व मनाचा चाळा सुरू होतो. तथापि या मनोव्यापारानें क्रोधाला बगल दिली जाते. (escape) व तो उलट प्रतिकारक होतो व राग दुणावतो. या सगळ्या स्थित्यंतरांची (process) जर संपूर्ण समज आपण करून घेतली (total awareness) तर काय होईल ? राग तर आपल्याला समूळ खणून काढायचा आहे. शब्द म्हणजेच मन, विचार व कालाची कक्षा. तेव्हां जर आपण उद्भवणाऱ्या रागासारख्या विकाराला नांव दिलें नाहीं, त्या विकाराकडे, तो अनुभवीत असताना, त्याला मनाच्या व्यापारांचा स्पर्श होऊं दिला नाहीं, नुसतें त्या विकाराकडे, त्या विकारामुळें मिळालेल्या आघाताच्या अवस्थेंत आपण स्वतः तटस्थ–स्तब्ध राहिलों, त्या रागाचा स्वीकार, धिःकार, दडपण वगैरे कांहीं एक केलें नाहीं, तर रागाशीं सामना देण्याचें अभिनव तंत्र आपल्याला मिळेल तो राग आपण नुसता पहातच राहूं ! पहातां पहातां तो नाहींसा होईल–समूळ नाश पावेल. क्षणाक्षणाला हा अभिनव अनुभव घेणें म्हणजेच स्वतःच्या जीवनांत क्रांति घडवून आणणें होय. ही क्रांति (radical transformation) आजच–या क्षणीं–क्षणाक्षणाला सतत घडते.

मनाच्या निर्विकारी अवस्थेंत, शांतता मिळते, विचारांचे काहूर बंद पडतें, व त्या प्रसन्न, तीक्ष्ण–हुशार (ever active) स्थितींत आत्म-साक्षात्कार होत असतो. सत्याचें स्फुरण होतें व त्याचें सातत्य टिकतें.

प्रेम हा विकार वा–विचार नाहीं, तें कालातीत आहे–प्रेम हेंच त्या भावाचें अनंतत्व आहे. (Love is its own eternity.) त्याचा विचार आपण स्वतंत्रपणें करूं.

## ता. २२–९–४८ बुधवार : भा. से. समाजांतील प्रवचनाचा सारांश

स्वतःच्या जीवनक्रमांत काडीचा देखील फरक करावयाचा नसेल, येथें जें कांहीं ऐकतां, त्यांतलें जें कांहीं तुम्हांला पटेल, तें कृतीनें वठवावयाचें नसेल (experiment) तर कृपा करून येथें येऊं नका.

सैन्य, पोलिस, वकिल व सरकार हीं उदरनिर्वाहाचीं अयोग्य (improper or unjust) साधनें आहेत हें आपणां सर्वांना गेल्या चर्चाप्रसंगीं समजून आलें व पटलेंहि.

त्याप्रमाणें वागायला तुम्ही तयार आहांत काय ! स्वतःच्या मुलांना योग्य शिक्षण देण्याची तुम्ही कोणती व्यवस्था करणार ? तुमच्या थोड्याबहुत श्रीमंतीचा विनियोग तुम्ही यापुढें कोणत्या रीतीनें करणार ? स्वतःचें स्वामित्व सोडून, गोरगरीबांसाठीं मिळकतीचा विनियोग करणार आहांत कां तुम्ही ? आहे का तें तसलें विश्वप्रेम अथवा बंधुभाव तुमच्या ठिकाणीं ? बंडखोर बनून जीवनांत क्रांति घडवून आणावयाची नसेल, पैशाचा, विद्वत्तेचा, स्वास्थ्याचा मोह तुम्ही सोडणार नसाल तर नव संस्कृतीचा अभिनव समाज तुम्ही कसा निर्माण करणार ? त्या उपक्रमाचें पितृपद तुमच्याकडे चालून आलें आहे; तें तुम्ही व मी आजच या क्षणीं स्वीकारलें तर माझ्या बोलण्याचें व तुमच्या श्रवणाचें चीज होणार आहे. नाहीं तर काय ! शब्दांचा पूल बांधून त्यावरून फेरफटका मारून जीवनांतलें सत्य का तुम्हांला समजणार आहे ? प्रेमजीवनांत यथेच्छ डुंबावयाचें असल्यास शब्दांच्या झुलत्या पुलावरून निर्भयपणें उडी ठोकली पाहिजे.

## ता. २३-९-४८ गुरुवार सायंकाळ : टिळक स्मारक मंदिरांतील प्रवचनाचा सारांश

प्रेम :—प्रेम हें रागलोभासारखा मनाचा व्यापार आहे काय हा विषय चर्चेसाठीं घेतला. त्यापूर्वीं हिंसा, राग, लोभ वगैरे सर्व विकार कसे सोडून देतां येतील, त्या पासून स्वतःला मुक्त कसें होतां येईल, याबद्दल पूर्वीं झालेल्या चर्चेचा आढावा ( resume ) घेण्यांत आला.

मनाचा व्यापार थांबतो तेव्हां मन कोणत्या अवस्थेंत असतें ? राग अगर हिंसा उत्पन्न झाल्याबरोबर त्याला जर आपण नांव दिलें नाहीं, त्याचा स्वीकार, धिक्कार केला नाहीं, तें दडपलें नाहीं, बदललें नाहीं, किंवा उंचावलें नाहीं, त्यापासून आपण पळून गेलों नाहीं, तर काय होते आपली स्थिति ? हा सारा विधि म्हणजे मनाचा व्यापार होय. ( operation ) तो थांबल्यावर विचारचक्र थांबतें. मनाला आश्चर्याचा धक्का बसतो. मन अनिश्चित होतें व निश्चल स्थिति (passive) विलक्षण जागरूकता प्राप्त होऊन (alertness) मन त्या त्या विकाराकडे पहातें. (is face to face) या संपूर्ण मालिकेच्या जाणिवेमधून (total awareness) रागालोभाचें मूळ कारण सांपडून ते प्रश्न सुटत असतात. हा अनुभव प्रत्येकाला येण्यासारखा आहे. तो प्रत्येक वेळीं नव्यानें घेतला पाहिजे. राग, हिंसा, अनुभवीत असतांना 'मी' पण व मनाचा व्यापार नसतो. अनुभूति संपली कीं, काळ व मनोव्यापार सुरू होतात, स्मृति निर्माण होते.) पूर्वसंस्कार दृढ झालेल्या (conditioned) मनाला राग, हिंसा कायमची दूर करतां येत नाहीं व त्यामुळेंच व्यक्तीव्यक्तींत अभिनव जिव्हाळ्याच्या नात्याची निर्मिति न होतां अनर्थपरंपरा पुढें चालूंच रहात आहे. ती जर थांबवावयाची असेल, नवसंस्कृति निर्माण करावयाची असेल तर प्रशांत मनान, अत्यंत दक्षतेनें आजच्या प्रश्नांची उमलती, नवी, व धांवती भेट घेतली पाहिजे.

रागलोभाला नामबद्ध केलें नाहीं तर किती विलक्षण स्थिति होते हें आपल्याला समजून आलें.

आतां जाणीव अगर ज्ञान झाल्याशिवाय मन स्थिर कसें होणार? एका टोंकाला अनिश्चितीच्या पायावर जीवनाची इच्छा व दुसऱ्या टोंकाला निश्चिततेची धडपड व त्यावर अपूर्ण अनुभव—त्यांची स्मृति—व अखेर रोजच्या व्यवहारांत त्या अपूर्ण स्मृतीचे उलट सुलट पडसाद (responses)—या सर्व घडामोडींची मिळून जाणीव (Consciousness) होत असते. हा सारा मनोव्यापार आहे. कालच्या स्मृती-मधून आजची घटना व त्यांतून उद्यांचा उठाव हें रहाट-गाडगें सारखें चालूं असतें. संपूर्ण अनुभवाचा ठसा स्मृतिपटलावर उमटत नसतो. (leaves no residue) त्याचा किंचित्‌हि अवशेष उरत नसतो. अर्थात त्यापासून कांहीं उगवत नाहीं.

कालाची आणि पूर्वसंस्कृतीची मर्यादा ओलांडून मोकळ्या निर्विकार मनानें (with an empty mind) नव्या विकारांचा नव्यानें क्षण-क्षणाला वरील पद्धतीनें परामर्ष घेतला तर ते विकार मावळून जाऊन व्यक्तींत प्रेमाचें अभिनव नातें निर्माण होईल व कलहजन्य अनर्थ-परंपरा संपून जाईल.

प्रेमाचें हें नवें नातें निर्माण करावयाचें आहे तुम्हाला व मला. आपल्या लहान जगापुरताच विचार करूं या. विश्वाला गवसणी नको. प्रेम हा विकार नाहीं वा विचार नाहीं. तो शब्द नाहीं किंवा स्मृतीहि नाहीं—सारांश प्रेम हा कांहीं मनाचा व्यापार नाहीं. तें एक सत्व आहे. (that is) ती एक अवस्था (state) आहे. दोन व्यक्तींमध्यें तें एक नातें (relation) आहे. त्यामुळें मी–तूं पणाचा अंत होऊन दोघांचा एकांत होतो. प्रेमी जीव भेटले कीं, परस्परांचें भान नाहींसें होऊन स्मरण विरून जातें. आनंदाच्या सरोवरांत दोन जीव पूर्णतया

बुडून जातात. ती बुडी म्हणजे प्रेम. प्रेम म्हणजे विकारांची लुडबूड नव्हे, शब्दांचा बुडबुडा नव्हे.

मन जेव्हां अनिश्चित स्थितींत (uncertain) विशुद्ध (open) निर्मल (pure = unprejudiced) पूर्वसंस्कार रहित (unconditioned by the past) प्रशांत व जागरूक (passive and alert) तेव्हांच त्याला उत्पन्न झालेले प्रश्न सोडविण्याची पात्रता–समर्थता (capacity) येते.

पंडितांची, परंपरेची, गुरूंची, धर्मांची तथाकथित वचनें–उत्तरें (readymade answers) जर आपण घेतलीं तर मग काय? स्वतः प्रश्न सोडविण्याचें कारणच नाहीं. प्रश्नच उरत नाहीं. कारण उत्तर तयारच असतें व त्याचा आधार घ्यायची आपणांस संवयच झाली आहे. ही परतंत्रता होय. आत्मप्रतीती अथवा प्रत्यक्ष स्वानुभव नव्हे. आपले विकार विचार इतरांच्या मनोव्यापारांत गुंफलेले असतात. ही गुंफणी (chain) अथवा नातें विकाररहित अथवा प्रेमाच करतां आलें तर शांततेचा साराच प्रश्न सुटेल. ( the whole peace problem between man and man.)

प्रेम विकार आहे का? विचार आहे का? त्याला नांव दिलें नाहीं तर तो नाहींसा होतो का? तो काल–आज–उद्यां या परिघांत बसतो का? शब्द म्हणजे प्रेम का?

शब्द अगोदर का विकार अगोदर? शब्दापासून विकार, विचार उद्भवतात, का विकार, विचार उद्भवल्यानंतर त्याला नांव देऊन, शब्द लावून आपण ते विकार दुणावतो, बळकट करतो. ( strengthen it.)

विकार अनुभवीत असतांना (experiencing) जाणीव नसते. (no consciousness, no "I" ness) आणि मनाची सारी

भुतावळ गाडलेली रहाते. अनुभवणें थांबलें रे थांबलें कीं बसलीच ती भुतावळ मानगुटीला — होय ना? होतें ना असें? स्वतः प्रयोग करून पहा.

## ता. २४-९-४८ शुक्रवार सकाळ : भारत सेवक समाजांतील प्रवचनाचा सारांश

सारे तत्त्वबद्ध नियम, तऱ्हा, संप्रदाय — ज्यांतून संघ व पक्ष बनविले जातात ते सारे आमूलाग्र, त्याच्या घटनात्मक स्वरूप — विस्तारासह अगोदर नाहींसे करून टाकले पाहिजेत. (there must be no norm for us to follow)

व्यक्तीचें हृदय शून्य, रिकामें, दरिद्री व मोकळें आणि उजाड, वैराण असें असतें. आणि म्हणून प्रत्येकजण तो रितेपणा (void) काढण्याचा प्रयत्न करीत असतो. नांव, दर्जा, विद्वत्ता, संपत्ति, देशाभिमान, धर्माभिमान, जातिभेद, वर्णभेद, आर्थिक विषमता—वगैरे अनेक कल्पना भावनांनीं आपलें विशाल हृदय आपण भरीत असतों. ही मानसिक भरती होय. या प्रकाराला कधीं ओहोटी लागतच नाहीं. आणि म्हणूनच कलह, द्वेष, लोभ व युद्धें कधीं थांबतच नाहींत. मनांत व जनांत शांतता कधीं नांदत नाहीं.

या हृदयाच्या रांजणाला बूड आहे का ? का हा डोंबाघरचा रांजण आहे ? अनिवार आणि अमर्याद आकांक्षांचें पाणी कितीहि भरलें तरी हा बिनबुडाचा रांजण भरायचा कसा ? प्रेमाचें बूड बसविल्याशिवाय जीवनाचें, परस्पर सलोख्याचें व जागतिक सुखासमाधानाचें अमृतजल त्यात टिकणार नाहीं.

प्रेम, औदार्य, दातृत्व, दया, परदुःखनिवारण, परस्पर सहकार्य वगैरे दैवी संपत्तीनें जर आपलीं हृदयें आपण पूर्ण भरून टाकलीं तर जगांत, समाजांत व व्यक्तीव्यक्तींत नवीन नातें निर्माण होऊन शांतता व

सौख्य सर्वांना मिळेल, सारे आनंदाचे वांटेकरी होतील. स्वतंत्र-सार्वभौम सत्तांची वाटमारी थांबेल, भेदांची तटबंदी कोसळून पडेल, आणि अभिनव आचारांच्या सरीवर सरी कोसळून नवसंस्कृतीच्या नवमानवांनीं हें जग गजबजून जाईल. ही सारी घटना, तुम्हीं व मी स्वतःमध्यें आमूलाग्र फरक करून आत्तांच-आजच ( now ) सिद्ध करावयाची आहे. उद्यांवर हवाला नव्हे.

अन्न, वस्त्र व आच्छादनापलीकडे, माणसाच्या मूलभूत गरजा नाहींत. त्यापलीकडे फक्त हव्यास ( greed ), अखंड लोभ आणि स्वास्थ्याची, निष्क्रियतेची धडपड. कोणत्याहि राजकीय, सामाजिक अथवा आर्थिक पद्धतीनें हृदयांतली श्रीमंती उत्पन्न करतां येणार नाहीं.

समाजानें तुम्हांला पोसायचें तें कशाकरतां ? सामाजिक व सामुदायिक संचयामधूनच तुम्हीं स्वतःचे वाटे जमतील तेवढे काढून घेतां. तुम्हांला लोकसेवेच्या रूपानें ती रक्कम वा मोबदला परत करायला पाहिजे. (you must be worth your keep.) प्रत्येक सात वर्षांला प्रत्येक व्यक्तीची परीक्षा करून तिचें सामाजिक मूल्य व उपयुक्तता तपासावी, आणि जर ती व्यक्ति कसाला उतरली नाहीं, तर तिला ठार करावें ! शॉसाहेब गरजले असें पण परीक्षक कोणी कोणास नेमावयाचें ? सारेच विकृत परिस्थितीला बळी पडलेले. (Conditioned.)

तुमच्या श्रीमंतीचें-पैशाअडक्याचें काय करणार तुम्ही ! संचय तसाच का जतन करून ठेवणार तुम्ही स्वतःच्या पोराबाळांसाठीं ?

सैन्य, पोलीस, वकिली व सरकारी नोकरीव्यतिरिक्त उदरनिर्वाहाचा मार्ग लोभी वृत्तीनें तुम्हीं चोखाळला तर चांगलें निर्वाहसाधनसुद्धां तुमच्या आधाशीपणानें गलिच्छ होऊन जाईल. लोभ (greed) सुटल्याशिवाय, कशाचा कांहीं उपयोग नाहीं. म्हणून युक्त साधन निश्चितीचा आपला यत्न (approach) हाच महत्त्वाचा आहे.

तेव्हां लोभ सोडून, आपण प्रत्येकानें उदरनिर्वाहाचें योग्य साधन अंगिकारलें पाहिजे, परस्परांतील नातें सहकार्याचें, प्रेमाचें व पूर्णतेचें केलें पाहिजे व सतीचें वाण हातीं घेऊन संकटाच्या अग्नींत उडी टाकली पाहिजे. तरच आपण शुद्ध होऊन नवमानव, नवीन नातीं, अभिनव समाज व नवसंस्कृति निर्माण करूं शकूं. नाहीं तर निर्माल्यवत् जीवन चाललेंच आहे आपलें! नव्या मूल्यानें आपली प्रत्येक कृती तोलली पाहिजे आपण. ही फेरतपासणी करून स्वतःमध्यें आमूलाग्रबदल करून, व्यक्तीव्यक्तीमधला भेदभाव नष्ट करून टाकला पाहिजे, म्हणजे सामाजिक विषमता, धार्मिक भेद व राष्ट्रीय भावना नाहींशा होऊन नवसंस्कृति निर्माण होईल. हें काम तुम्हीं व मी प्रत्येक व्यक्तीनें आज या क्षणीं करावयाचें व सारखें करीत रहावयाचें. या सातत्यांतच जीवनाचा सुगंध व सहकार्याचा आनंद भरलेला आहे.

## ता. २५–९–४८ शनिवार सायंकाळ

प्रेम म्हणजे काय? वासना आहे कीं वस्तु? लोभ, राग, हिंसा, यांच्यासारखा प्रेम हा मनाचा विकार (feeling) आहे काय? प्रेम म्हणजे विचार आहे काय? व्याख्या करून प्रेमाला मर्यादित करतां येणार नाहीं, शब्दानें सांगतां येणार नाहीं, निर्णय घेऊन निभाव लागणार नाहीं. मन आणि मनाचा व्यापार (mind and its occupation) यांच्या प्रांताबाहेरची प्रेम ही कोटी आहे. त्याचा स्वतः अनुभव घेणें (experiencing) हाच त्याचा साक्षात्कार. दुसऱ्याचें अनुमानी शास्त्र, वचन, वर्णन अगर अनुभव नव्हे. प्रेम म्हणजे व्यक्तिमात्राची विशुद्ध अवस्था होय.

मन ज्या वेळीं मनपणानें नेहमींच्या विकारवशतेंत उरत नाहीं, म्हणजे ज्या वेळीं मनाचा व्यापार बंद पडतो, (it stops working) तें

प्रशांत होतें, (quiet) त्या वेळीं त्याची दशा (state) जागरूक (alert) निवडण्याऱ्या पलीकडची (choiceless) आणि संथ (passive) अशी असते. व त्या अवस्थेंत वस्तुस्थितीचें, सत्याचें क्षणाक्षणाला नवोनव असें अनुभवात्मक दर्शन घडत जातें व तदनुसार स्वतःचें आचरण (action) होत जातें. व्यक्तीचें तें संपूर्ण वर्तन म्हणजे दुसऱ्या व्यक्तीशीं नातें होय. मी–तूं पणा नाहींसा होऊन, दोन व्यक्ति जिवाभावानें समरस होऊन पूर्ण समजुतीनें (total understanding) जेव्हां आचरण (action) करीत जातात, ती आचरणाची संगति (process of action) म्हणजेच प्रेम. प्रेम म्हणजे प्रेम हा शब्द नव्हे.

आपण आपल्या देवावर, देशावर, धर्मावर, समाजावर, जातीजमातीवर प्रेम करतों असें म्हणतों. पण या व्यापक प्रेमाचा शोध लावण्यापूर्वीं आपण आपल्याजवळ अगदीं स्वतःच्या घरापासून सुरवात करूं या – बायकामुलांवर आपण प्रेम करतों म्हणजे काय करतों? बायकोचें नवऱ्यावर व नवऱ्याचें बायकोवर प्रेम असतें—म्हणजे असतें तरी काय? परस्परांचें शारीरिक व मानसिक सुखसमाधान (mutual gratification) यालाच आपण प्रेम समजतों. पण जेथें पतिपत्नीस एकमेकांपासून शारीरिक व मानसिक सुखसमाधान प्राप्त होत नाहीं तेथें काय होतें? तेथें तीं दोघें वास्तविक वेगळींच होतात ना? एका घरांत रहात असलीं, घटस्फोट घेतला नसला, तरी स्वतःच्या सुखसमाधानासाठीं नवरा एका मार्गानें तर बायको दुसऱ्या मार्गानें जाते. हा व्यवहारांतील अनुभव आहे. ही वस्तुस्थिति आहे. या विभक्त अवस्थेला येईल का प्रेम म्हणतां? तसेंच एकमेकांशीं व्यवहारदृष्टीनें कसेंतरी निभावून नेण्याऱ्या वर्तनालाहि (adjustment anyhow) प्रेम हें नांव देतां येणार नाहीं. जेथें नवराबायको एकमेकांना आपलें

सारसर्वस्व ( केवळ शारीरिक नव्हे ) समर्पण करतात, समरस होतात, किंबहुना एकमेकांत मनानें, भावनेनें एकरूप होऊन जातात (complete communion) त्या अवस्थेच्या नात्याला प्रेम म्हणतात. त्याला गरिबी आडवी येत नाहीं, श्रीमंती आवश्यक नाहीं, परिस्थितीचा अडथळा येत नाहीं. ती नित्यानंदाची दशा, ते स्वानंदाचें साम्राज्य—त्यालाच पतिपत्नीचें अविभाज्य ( indivisible ) प्रेम असें म्हणतां येईल. झाला आहे का असल्या प्रेमाचा उदय तुमच्या ठिकाणीं ? आपल्या हृदयाचा खोल ठाव घेऊन पहा ना. आपलें अंतःकरण किती कुरूप (ugly) हिडीस ( hedious ) व क्रूर (cruel ) आहे हें समजून घ्यायला भिऊं नका. अहो, हें समजलें तरच तुम्हांला आपल्या पत्नीवर प्रेम करतां येईल, नुसती भाराभर मुलांची पैदास करून नाहीं तें सिद्ध होणार ! आणि तुम्हांला जर स्वतःच्या बायकोवर सर्वस्वानें प्रेम करता येत नाहीं, तर देशप्रेमाच्या, जनप्रेमाच्या कशाला गप्पा मारतां ? आणि जो देव पाहिला नाहीं, अनुभवला नाहीं, त्या अज्ञात देवावर कसें प्रेम करणार तुम्हीं ? बायबल, कुराण, पुराण, गीता, यांचीं कोरडीं वचनें पाठ करकरून, बडबड करकरून कोणता लाभ होणार तुम्हांला ! द्या ना तें सारें सोडून; करा गंगार्पण. आचारमय जीवनांत टाका स्वतःला बुडवून. प्रेमाच्या प्रवाहांत वहात जा म्हणजेच बुडत्या जगाला तारण्याचें सामर्थ्य तुमच्या अंगीं येईल.

## ता. २६-९-४८ रविवार सायंकाळ

**शिक्षण :**—शिक्षक कसे आहेत ? कसें शिकवावयाचें हें कोठें त्यांना माहीत आहे ? ते ज्या पद्धतीनें तयार झाले आहेत, ज्या धर्मात, ज्या सामाजिक थरांत आहेत त्यांचे सारे गुणदोष त्या शिक्षकांत उतरलेले असतात. शिक्षकांना शिकवल्याशिवाय त्यांना शिकवतां येणार नाहीं. विशिष्ट विभागापुरतें दिलेलें शिक्षण योग्य नव्हे. व्यक्तींचा सर्वांगिण विकास सिद्ध करणारें तेंच खरें शिक्षण होय. जर मुळीं आडांतच नसेल तर तें पोहोऱ्यांत कुठून शिक्षण येणार ? शिक्षणाचे विभाग करण्यांत येऊन (departments) मुलांना शिक्षण मिळतें. पोट भरण्याकरतां लागणारी ती शिदोरी होय. मनांत खिचडी भराविणें व हृदय उपाशीं ठेवणें—असें हल्लींचें शिक्षण आहे. सर्वांगसुंदर व संपूर्ण व्यक्ति निर्माण करून तिच्यांत रचनात्मक कार्य-क्षमता आणण्याचा प्रयत्नच आपण करीत नाहीं.

'कसा' विचार करावयाचा या ऐवजीं 'काय' विचार करावयाचा एवढ्या मर्यादेंतच हल्लीं सर्वत्र शिक्षण दिलें जातें. सरकार व वृत्तपत्रें हाच धंदा करीत आहेत. त्यांना तरी दुसरें काय येतें आहे ? स्वतंत्र, सार्वभौम सरकार, आपल्या देशांत केवळ राष्ट्रीयत्व शिकवूनच छापाच्या गणपतीसारखे नागरिक बनवितें. ठराविक विद्यालयांतील ठरीव सांच्याच्या शिक्षण-क्रमांतून, भट्टींतील भाजक्या विटाप्रमाणें शिक्के मारून काढण्याचें कार्य (regimentation) चाललें आहे आणि त्यामुळेंच जागतिक संहार होत आहे. परस्परांचा द्वेष करावयास आपण शिकतों, मग तो देशाच्या नांवाखालीं असो, नाहीं तर धर्माच्या. जातिभेद, वर्गकलह, वर्णभेद व विभक्तिकरण (Separation), श्रीमंत होण्याची हांव, कीर्ति-पदवी यांचा हव्यास आणि शुष्क अंतःकरण, हीच आहे आपल्या शिक्षणाची फलश्रुति !

या विकृत वस्तुस्थितीवर केवळ निर्भीड टीकेची झोड न उठवितां आपण शिक्षणाची पुनर्घटना केली पाहिजे, व त्यासाठीं स्वत:मध्यें आमूलाग्र सुधारणा करून क्रांति घडविली पाहिजे. भेदभाव व संहार यांची जोपासना करणारें, धर्म, जात, वर्ग, देश, देव वगैरे सर्व प्रदर्शनें उखडून–उधळून टाकलीं पाहिजेत व स्नेह, दया, प्रेम यांच्या हृदयस्थ पायावर शिक्षणाचा इमला उभारला पाहिजे. माणसाचें यंत्र बनवण्या-ऐवजीं, यंत्राचा उपयोग माणुसकीची वाढ करण्याकडे केला पाहिजे. देशादेशांचे नागरिक केवळ राष्ट्रीय छापाचे ठोकळे तयार करण्यापेक्षां, त्यांना लढाईच्या खाईंत लोटण्यापेक्षां, यच्चयावत् मानवजातीचा एकच प्रदेश बनवून, प्रेममय आचाराचा एकच देव घडवून परस्पर सहकार्याचें नवें तंत्र आपण निर्माण केलें पाहिजे. जुने मंत्र म्हणणें पुरे नाहीं का झालें ? अज्ञान, आडमुठेपणा, दारिद्र्य, हेवादावा–यांच्या-विरुद्ध आज लढे पुकारले पाहिजेत. मानवाचें पुनर्मूल्यमापन (reorientation) करून आपण अभिनव समाज निर्माण करावयास पाहिजे. आणि हें सारें–तुम्हीं व मीं–करावयाला पाहिजे. दूर जावयाचें असल्यास जवळून स्वत: – स्वत:पासून सुरवात करायला पाहिजे. (To go far you must begin near.)

नंतर कांहीं शिक्षणविषयक लेखी प्रश्नांचीं उत्तरें कृष्णाजीनीं दिलीं.

स्वतंत्र हिंदुस्थानांतील, आवश्यक व योग्य शिक्षण, शिक्षणावरील सरकारी नियंत्रण, लष्करी शिक्षण, कला आणि धर्म यांचें शिक्षणांतील स्थान, अन्नधान्यांचीं मूल्यें, धंदेशिक्षण, आणि आंतरराष्ट्रीय संस्थांचें यथार्थ स्वरूप इत्यादि महत्त्वाच्या प्रश्नांवर कृष्णजींनीं सडेतोड मूलग्राही आणि क्रांतिकारक उत्तरें दिलीं. व्यक्तिमत्वावर व ऐहिक जीवनक्रमावर विदारक प्रकाश पाडला.

वास्तविक सारे प्रश्न हीं एकाच शिक्षणवृक्षाला लागलेलीं कटु फळें

आहेत. या आम्रवृक्षाला लागलेली परस्परद्वेषभावनेची कीडच जर आपण काढून टाकली नाहीं तर मधुर फळ हातीं लागणार तरी कसें ? आणि शांततेची सांवली तरी कशी मिळेल ?

लहान बालकांना तुम्ही शिक्षणाच्या चरकांत कोंबतां, त्यांचें व्यक्तिमत्व समजून घेत नाहीं, तें समजण्याची तुमची पात्रता नाहीं, तळमळ नाहीं. या ज्ञानदानांत स्नेह–आत्मीयता नाहीं, शिक्षकांच्या आचरणांत जिव्हाळा नाहीं – किंबहुना या बाजारपेठेंत 'प्रेम' नाहीं, – मग सारा समाज व देश बेजार होऊन गेला तर नवल काय बरें त्यांत ?

शिक्षणाला ठरीव साचा, चाकोरी अगर चौकट नको–परंपरेचा पोरकटपणा नको, अभिनव स्नेह व जिव्हाळा यांची संततधार कोंवळ्या बालमनावर धरावयाला पाहिजे. तेव्हांच सौन्याचे, शांतीचे, कारुण्याचे अनंत झरे निर्माण होऊन याच जगांत आजच नवसंस्कृतीचा नौबदडंका झडूं लागेल !

सभोंवतालचें जग भेदकल्पनांनीं कोलमडून पडत आहे आणि आपण हिंदुस्थानांत एकमेकांची जात विचारतों आहोंत. ( the world is crashing around us and we are asking each other's caste ! )

शिक्षणसंस्थांच्या कार्यांत नियमांची जखडबंदी तसेंच यंत्ररूप रेखीव अथवा लष्करी कडक शिस्तीची जरूर नाहीं; जिव्हाळ्याचें, जाणतें व समजुतदारपणाचें मार्गदर्शन हवें. मार्गदर्शक आचारसंपन्न पाहिजेत. हृदयशून्य, अहंमन्य, द्वेष, मत्सर, लोभ वगैरेंनीं लिडबिडलेले पुस्तकी किडे नकोत. हल्लींचे बहुतेक शिक्षक सामान्यतः असेच आढळतात, कारण तेहि याच परंपरेंत वाढलेले असतात.

दयेचा, कारुण्याचा, सुजनतेचा, ऐक्यभावाचा व आचरणाचा एकला एकच धर्म, मार्ग संप्रदाय हवा. इतर सारे गंगार्पण करा.

हिंदुस्थान अजून स्वतंत्र नाहीं. त्याला केवळ नवें निशाण, राष्ट्रगीत व काळें करडें व रंगीत सरकार प्राप्त झालें आहे एवढेंच. होता तोच लष्करी खाक्या, राष्ट्रवादी पोलादी चौकटीचा साचा हिंदसरकारनें मागच्या पानावरून पुढें चालू ठेवला आहे. तेव्हां असलें सरकार संहारशास्त्राचेंच प्रामुख्यानें शिक्षण देणार आणि मग काय ? थे रे माझ्या मागल्या आणि लढाया चांगल्या. असल्या सरकारनें शिक्षण-नियंत्रण करून होणार आहे का कांहीं लाभ ? इंग्रजी कमी करून उद्यां हिंदी आणलें म्हणून राष्ट्र-वादाचें विष कमी होणार नाहीं. आहे त्या राष्ट्रमालिकेंत एका अगडबंब धर्मप्रधान, प्रेमशून्य अशा नव्या राष्ट्राची भर पडणार इतकेंच. कला हें प्रेमाचें अपत्य आहे. आपले शिक्षक फारसबंदी दिलाचे आणि शिक्षण मिळणार लष्करी नाहीं तर व्यापारी. व्यापाराकरतां एके ठिकाणीं शक्य नसेल तर हव्या त्या निमित्तानें परस्परांशीं लढण्याकरतां आपण उत्सुक! अशा शिक्षणांत कसली आली आहे कला ? चार चित्रें रंगवणें, तीं भिंतीवर टांगणें, किंवा चार दगडी पुतळे उभारणें हीच ना आपली कला? ठोकळ्याप्रमाणें शब्दाला शब्द जुळविणें हीं आपलीं काव्यें. हृदय रिकामें मग कलेचा आविष्कार कुठून बरें होणार ? सृष्टिसौंदर्यांत जातां का तुम्ही कधीं रंगून ? संध्यारागाच्या रक्तिमेवर हृदयस्थ प्रसन्नतेचा गुलाल उध-ळला आहे का कधीं तुम्हीं ? झुळुझुळु वाहणाऱ्या ओढ्याच्या तालसुरावर स्वतःचें देहभान विसरून नाचला आहांत का कधीं तुम्ही ? मनोहर सृष्टीच्या या मोहक दीपावलींत सामील होऊन प्रेमाचे दीप तुम्हीं पाज-ळले नसतील तर कसलें आहे तुमचें कलाप्रेम ? तुमच्या कपाळीं सटवीनें कलहच लिहिला आहे. पुसा ना तो अगोदर !

धर्माचें शिक्षण म्हणजे केवळ डोकें फोडण्याचें शिक्षण असें विचित्र भीषण स्वरूप आहे त्याचें. बंद करायला हवेत हे चाळे आतां. शिक्षण म्हणजे धर्म नव्हे; धर्म म्हणजे देव अगर देवदूत नव्हे; आणि देव अगर

देवदूत हा कांहीं शब्द नव्हे. शब्दांच्या पलीकडे जाऊन दुनियेला प्रेमानें आलिंगन द्यावला धर्माचें लचांड अगर थोतांड हो कशाला ?

योग्य अन्न, नियमबद्धता, व धंदेशिक्षण यांचा शिक्षणक्रमांत समावेश हवाच हवा.

सौजन्याचा आंतरराष्ट्रीय सांठा करणें ही हास्यास्पद कल्पना, साठी उलटलेल्या व उलस्या काळजाच्या बुद्रुकबहाद्दरांनीं काढलेली दिसते. फुलांचा वास कोंडण्याचा हा प्रकार. ही असली आंतरराष्ट्रीय संस्था म्हणजे निव्वळ वेड्यांचा बाजार.

## २७–१–४८ सोमवार सकाळ : भारत सेवक समाजांतील चर्चेचा सारांश

**काय करणार आहांत आपण ?** ( What action Sirs ? )

अमर्याद संपत्तीची हांव आणि अवास्तव ध्येय कल्पनांबाबत तुम्ही काय करणार आहांत ? तत्त्व, संप्रदाय, नियम ( norm ) यांचा उपयोग झाला नाहीं. समाजसत्तावद काय अगर जमातसत्तावाद काय, दोन्हीहि राजकीय संप्रदाय सत्तालोलुप संस्था आहेत. बाहेरची बळजोरीची ती सत्ता आहे. हृदयांतली–स्वखुषीची व संतोषाची ती बाब नव्हे. सामुदायिक सामर्थ्य वाढवितांना व्यक्तीचें स्वातंत्र्य ठेंचून काढण्यांत येत आहे. तेव्हां सत्याचा शोध करतांना असल्या घटनांमागें धांवण्यांत राम नाहीं.

प्रत्येकाला श्रीमंत होण्याची हांव; गरीबी कुणालाच नको. किती पैसे मिळवावे व सांठवावे तेवढे थोडेच पडतात. समाधान असें कधीं नसतेंच. आपल्या वाढत्या गरजा भागविण्यासाठीं, सुखासाठीं, चैनीसाठीं, नांव मिळविण्यासाठीं, मोठेपणा मिरविण्यासाठीं, पोराबाळांना पिढ्यान्‌पिढ्या आपल्यासारखेंच सुखांत राहतां यावें म्हणून आपणांपैकीं बहुतेकजण हरतऱ्हेनें पैसे मिळवीत असतात.

केवळ संपत्तीवरच आपलें स्वास्थ्य ( security ) अवलंबून आहे व त्याशिवाय कांहीचीहि किंमत राहाणार नाहीं, अशी सारखी भीति वाटत असते प्रत्येकाला. याचें कारण अंतःकरणाचे आपण दरिद्री असतो. आपलें हृदय शुष्क असतें. त्याला खऱ्या प्रेमाचा ओलावा ठाऊक नसतो. करुणा, दया, दान यांना आपण पारखे झालेले असतों. दुसऱ्याचें दुःख, दारिद्र्य पाहून येतें का कधीं आपल्या डोळ्यांना पाणी! दगडासारखें आपलें हृदय कठीण बनलेलें असतें. करुणेचे पाझर फुटतात का कधीं त्याला ? कुणावर आपण कधीं निरपेक्ष व संपूर्ण प्रेमच केलें नसेल तर आपल्यावर तरी कोण प्रेम करणार ? प्रेमाची देवाण-घेवाण एकतर्फी नसते. तो कांहीं एकेरी मार्ग —(one way traffic) नव्हे. दोन हृदयांना जोडणाऱ्या अदृश्य तारेतून (wire) दिव्य प्रेमाचें चैतन्य वाहत असतें. आपण आपले सारे नाते-संबंध (connections and relations) आपल्या मिळकतीशीं निगडित केले असल्यानें बहुतेक सर्वांचीच हृदयें शून्य ( void) भकास (frightful) आणि वैराण ( waste ) अशा अवस्थेला गेलीं आहेत, आणि म्हणूनच आपण हैराण (worried) झालों आहोंत.

गळक्या हृदयाची ही शून्यता, मनाच्या हव्यासानें (greed) आपण भरून काढीत असतों. त्यांत नांव, गांव, प्रतिष्ठा, विद्वत्ता, समाजसेवा, राजकीय सत्ता (political power) वगैरेंची आपण भर घालतों, तरी देखील आपणांस समाधान प्राप्त होत नाहीं. बूड नसलेला हा डोंबाघरचा रांजण कितीहि त्यांत पाणी ओतलें तरी आपला रिकामाच ! अखेर उतारवयांत आपण देवाच्या मार्गे लागतों आणि देवभक्ति सुद्धां आपण या रिकाम्या घड्यांत ओतीत असतों ! पैशाचा अनिवार हव्यास, तसाच देवाचा अमर्याद व बेताल ध्यास. त्याला भक्ति असें गोंडस नांव दिलें म्हणून काय होणार आहे ? हाव ( greed ) आणि

भाव ( creed ) हा मानवाला सृष्टिदेवतेनें दिलेला शाप आहे. ( it is a curse of nature to man.)

प्रेमाचें बूड बसविल्याशिवाय हृदयाचा रिकामा रांजण भरणार आहे का कधीं ? आणि त्यांत तुम्हीं आम्हीं परस्पर प्रेमभावाचें जीवन ओतलें तर हांव-हव्यासाच्या एका थेंबालाहि तिथें अवकाश उरणार नाहीं ! नितांत प्रेम करा आणि घ्या ना या नवोनव दशेचा अनुभव ! सांगोपांगी का या गोष्टी आहेत ?

तेव्हां आपण आपल्या संपत्तीशीं, स्थिरचर सुखसाधनांशीं इतर व्यक्तींशीं व आपल्या गोड कल्पनांशीं असलेलें हव्यासाचें नातें, निर्मळ मनानें ( pure mind ) समजावून घेऊन तें तपासून पार बदलून टाकलें पाहिजे. संपत्ति आपण ताब्यांत ठेवतों – पण वास्तविक आपणच संपत्तीच्या आहारी गेलेलों असतों. संपत्तीच्या मोहानें आपणांस पछाडलेलें असतें.(We are possessed by our wealth, name, fame and urge to power.) सारें कांहीं सोडल्याशिवाय सत्य सांपडणार नाहीं. स्वास्थ्य व निश्चितपणा झुगारून देऊन, हालअपेष्टांचा स्विकार करून अनिश्चित मार्गावर जेव्हां आपण प्रवासाचें पहिलें पाऊल टाकूं, विचारचक्र थांबवून चालावयास लागूं, टक्के टोणपे खाऊं, टाकीचे घाव सोसूं तेव्हांच आपल्या हृदयाकाशांत प्रसन्नतेचा पूर्णचंद्र उगवेल व तो आपल्या प्रवासाच्या मार्गावर अमृत किरणांचा वर्षाव करील. परस्पर प्रेमभावाचा सागर आनंदलहरींनीं उचंबळूं लागेल आणि मग देहभाव विसरून प्रेमलहरींच्या चंचल गालिच्यावर प्रेमपूर्ण हृदयाचा मानव हळुवारपणें ( delicate ) नाचूं लागेल.

## २८-९-४८ मंगळवार सायंकाळ : टिळक स्मारक मंदिर

**अन्योन्य प्रेमसंबंध** ( relationship ) :— सुरवातीचा हा प्रश्न. यावर सारें अवलंबून. सापेक्ष आत्मभावाशिवाय जीवन नाहीं. एकलकोंडें जिणें म्हणजे स्वतःचा कोंडमारा करणें–जिवंत मरण होय.

इतर माणसांशीं आपल्या असलेल्या नात्याबद्दल शोध लावायचा आहे. नातें म्हणजे हातांतलें कांकण नव्हे. आत्मज्ञानाचा ( self knowledge ) तो एक आरसा आहे. या आरशांत स्वतःचें प्रतिबिंब आपणांस दिसतें. त्याचें स्वरूप आपण आतां निरखून पाहूं या. व्यक्ती-व्यक्तींचा संबंध समजला तर योग्य नातें निर्माण करतां येईल. ( right relation can be created.) व समाजांत शांतता निर्माण होऊन आयुष्य सुखाचें होईल आणि समाजशांतता असली तरच देशांत शांतता; नाहींतर हो कुठली ?

आत्मज्ञान करून घेण्याकरतां नातीं जोडायचीं असतात. तेव्हा अगदीं जवळचें जें पतिपत्नीचें नातें तें आपण तपासूं या. मग इतर नातीं आपल्याला सहज समजतील. पति–पत्नीचें नातें कांहीं जन्म–जात आई-मुलासारखें नसतें. वयांत आल्यावर विवाहाचा सांधा आपण जोडतों. होमहवनाचे साक्षीनें संस्कार करतों, त्याबद्दलचा कागदोपत्रीं करार करतों आपण. पण इतकें करूनहि हें डाक–लागी रिकामें भांडें, जन्मभर उभयतां ठणठणा वाजवीत असतात, कांहींजण तर घटस्फोट घेऊन फोडूनहि टाकतात. मग तो पुरुष व स्त्री वाट फुटेल तिकडे जातात. असेंच आहे ना सर्वसाधारणपणें पतिपत्नीचें नातें ? ही वस्तुस्थिति आहे. तिच्याकडे डोळेझांक करून काय होणार ? आणि याला म्हणायचें नवराबायकोचें प्रेम ? काय ही प्रेम या वस्तूची आपण थट्टा करीत आहोंत ! खरें प्रेम आपण अनुभवीत नाहीं, म्हणून संसार सुखाचे होत नाहींत. आणि म्हणूनच एकमेकांचे दावेदार बनून लग्नाची भागिदारी

आपण घटस्फोटानें विसर्जन करीत असतों. वास्तविक आपण स्त्रीचें-पत्नी या नात्याचें सत्यस्वरूप ओळखीतच नाहीं. बायको ही मुलांची गिरणी व दुधाची बरणीच बनवितों. दागदागिने ( असले तर ) अंगाखांद्यावर घालून, नवरोबांची श्रीमंती चारचौघांत मिरविणारी ही चालती बोलती इंपिरियल बँकच नाहीं का ? आणि म्हणे बायकोवर प्रेम आहे माझें. केवळ संभोगसुखसंबंधच ना हा ? ( mere gratification, bodily and mental.)

हें असलें हिडिस, क्रूर व सौंदर्यशून्य नातें आपल्या पत्नीशीं जोडल्यावर कौटुंबिक कलहरूप आपला संसार बनतो. आणि त्याचीच आवृत्ती वर्गकलह आणि पुनरावृत्ती देशांदेशांतील युद्धें...अशीहि सर्व संहारांची संसारपरंपरा अखंड सुरू आहे.

ही वस्तुस्थिति जर आपण निरभिमान बुद्धीनें, शांत चित्तानें व निर्विकार मनानें समजून घेतली तरच ती बदलून टाकतां येईल आपल्याला. मग बायको व नवरा यांच्यामध्यें उभा असलेला अखंड—अंतरपाट फाटून जाईल. हृदयाला नवी पालवी फुटेल व पति—पत्नींचें जीवन समजुतदारपणें सजून, सुखाचा संसार फुलून जाईल,व जाई-जुईच्या सुवासानें आसमंतातला भाग जसा दरवळून जातो, त्याचप्रमाणें असल्या जोडप्याचें आयुष्य शेजाऱ्यापाजाऱ्यावर प्रेमाची पाखर घालण्याइतकें समर्थ बनेल. लग्न हें कांहीं एकमेकांना दुःखीकष्टी करण्याचा हमालखाना नसून जनसेवेचा, दयेचा, कारुण्याचा, सौंदर्याचा, मांगल्याचा व दिव्यतेचा दिवाणखाना आहे. तेव्हां आपल्या पत्नींचें आपलें काय नातें आहे हें समजण्याकरतां तिच्या सुखदुःखाशीं आशाआकांक्षेशीं, प्रीतीशीं समरूप झालें पाहिजे. ही बौद्धिक पातळीवरील केवळ वजाबाकी—बेरीज ( calculation ) नव्हे अगर चंचल मनाचा उडाणटप्पू चाळा नव्हे. हें दोन जीवांचें हृदयमीलन आहे. तें अखंड दृढ होईल तरच

नातें संबंधाचा रोजचा क्षणाक्षणाला पालटणारा खेळ समजेल आणि या खेळामधूनच जागतिक शांततेचा काळ येणार आहे.

## ता. २९-९-४८ बुधवार : भारत सेवक समाज

**धनलोभ** :—मनाचे पूर्वविकृत संस्कार नष्ट करून शून्यतेच्या दरींत उडी घेऊन नवनव्या सत्याची तुम्हांला क्षणोक्षणीं भेट घ्यायची आहे ना ? मग सोडा ना त्या द्रव्यराशींचा लोभ ! ज्या प्रवासाला तुम्ही निघालांत तेथें ही असली पुंजी काय बरें कामाची ! अगदीं सदोष-संस्कारशून्य ( unconditioned ) असें तेथें जावें लागतें. सत्य अगदीं मत्सरी आहे हो ! त्याला तुम्ही दुसऱ्या कुणा-च्याही सहवासांत असलेलें खपणार नाहीं. मग तुमच्या साऱ्या संचयाचा--वित्तांचा, मालमत्तेचा, गोरगरिबावर अनाथ अपंगांवर दुःखीकष्टी जीवावर उदार मनानें करणार का वर्षाव ? स्वतःच्या पोटाला लागणारी मीठभाकरी मिळविण्यासाठीं खपणार का तुम्ही ? झिजवणार का आपला देह ? सुखाची बैठक, स्वस्थतेची शेज व बेश्रमपणाची ( निरुद्योगाची ) नीज सोडून जागें होऊन ( by being awake-aware) दुसऱ्याचें झेंपेल तेवढें ओझें घेणार का स्वतःच्या डोक्यावर ?

श्रीमंतांना परमेश्वरी राज्यांत प्रवेश नाहीं आणि परमेश्वरी राज्य तुमच्या हृदयात आहे. तिथें प्रवेश करून प्रेमाचें द्वार अलम् दुनियेला खुलें करायचें असेल तर तुमचा स्वतःचा पैशाशीं असलेला संबंध तुम्हीं ताडकन् तोडून टाकला पाहिजे. तशी तयारी नसेल होत तर तुमच्या प्रासादाचा मार्ग तुम्हास मोकळा आहेच. उगीच कां बरें ऐकून कान शिणवीत आहांत स्वतःचे ? माझ्या वाणीचा वर्षाव खडकावर होणार असेल तर पाणी उताराला लागून वहात जाईल, आणि मग मिळेल तिथें मिळेल. वाटेंत मऊ जमीन लागली तर उगवेलहि हिरवळ, आणि

म्हणूनच मी बोलतों. बोलबोलून मला स्वतःला व्यक्तिशः कांहीं एक तुमच्यापासून मिळवायचें नाहीं. मला सत्याचा अनुभव येत आहे, एकसारखा येत आहे. तो माझा स्वानंद तुमच्याबरोबर; ऐकतील त्या सर्वजणांबरोबर चाखण्याकरतां तुम्हीं व मी या भोजन मंदिरांत भारत सेवक समाजाच्या कृपेनें जमत असतों. जमणार का आपली पत्रिका ? तुमच्या वा माझ्या संवादाच्या बोहोल्यावर लागणार का तुमचें माझें लग्न ! का आणखी कुणाशीं—गुरूशीं घरोबा करावयास जाणार आहांत!

## ३०–९–४८ गुरुवार सायंकाळ

**पत्नीचें नातें** :—लग्न झालें कीं नवें नातें निर्माण होतें. तें जीवनांतील अगदीं जवळच नातें होय. तें आपण समजून घेऊं या. तें जर समजलें तर इतर सारे संबंध उलगडतील. आपले इतर व्यक्तीशीं, समाजाशीं, देशाशीं, देवाशीं नातें निरनिराळ्या पातळीवरील असतें. आपले सारे संबंध इतके गोंधळाचे, घोटाळ्याचे झाले आहेत, परस्परांच्या दरम्यान संशय इतका वाढत आहे, झगडे इतके सुरू आहेत, कीं काय करावें आणि काय करूं नये हें आपल्याला मुळीं समजेनासें होऊन गेलें आहे.

तेव्हां या संबंधांचें पुनर्मूल्यमापन आपण करूं या. व्याख्या नको. व्याख्येच्या मर्यादेत हे संबंध अडकविल्यामुळेंच आपले व्यवहार संकुचित होऊन, मोकळेपणाला ( freeness ) पारखे झाले आहेत. आपलें संघटनेचें तंत्र पुन्हां पारखूं या, व पुन्हां बनवूं या व हा बनाव सारखा चालू ठेवण्यांतच अभिजात सत्य व सौंदर्य भरलेलें आहे.

नैसर्गिक, शारीरिक व मानसिक अपेक्षापूर्तीसाठीं ( need ) स्त्री-पुरुष नवराबायकोच्या नात्यानें एका ठिकाणीं येतात व राहतात. अपेक्षा–गरजेच्या पोटीं हें नातें उद्भवतें. प्रयोजनाच्या अभावीं संबंधांचा

बंध राहात नाहीं. व्यक्ति अपूर्ण, एकाकी व सहवासप्रिय असते. ही एकांगी स्थिति उभयतांच्या वैवाहिक मीलनानें पूर्णत्व पावते.

तेव्हां परस्परांची स्वतंत्रपणें गरज भागण्यांत नातें उत्पन्न होत नसतें. गरज भागली नाहीं तर नवरा–बायकोंत कलह तरी निर्माण होतात. नाहींतर परस्परांपासून वेगळीं तरी होतात. बायको आपल्या समाधानाकडे पहाते. व नवरा स्वतःच्या सुखाची परिपूर्ति बायको-च्या द्वारें करीत असतो व अशा रीतीनें नवरा व बायको शरिरानें जवळ असलीं तरी मनानें व हृदयानें एकमेकांपासून दुरावलेलीं असतात. ( They live in isolation, as a matter of fact.) ही रोजची वस्तुस्थिति आहे, कल्पना नव्हे. परस्परांच्या न्यूनपूर्तीच्या अपेक्षेमुळें एकमेकांबद्दल आदर व मृदुता आपण बाळगतों. पण ही आदराची व मृदुतेची जोपासना कृत्रिम असते. परस्परांच्या समाधाना-साठीं आचरणांत येते व पुढें तिची भावशून्य संवय बनते. गरज संपल्यावरहि नवराबायको वयातीत झाल्यावर, आदर व मृदुता राहते पण परिपाठाची संवय म्हणून. या भावनांचा उगम गरजेपोटीं असल्या-मुळें गढूळच असतो.

तेव्हां सूक्ष्म विचार केल्यास आपलें व आपल्या बायकोचें खरेंखुरें **नातें नसतेंच. हृदयांचा मेळ नसतो.** आपण समरस होत नसतो, एकाचें दुःख तें दुसऱ्याचें दुःख नसतें; एकाचें सुख तें दुसऱ्याचें सुख होत नाहीं. परक्यावर प्रेम बसून बायकोला सुख होऊं लागलें कीं, नवऱ्याचा मत्सर जागा होऊन तो संतापानें जळूं लागतो. सवती-मत्सरा-मुळें बायकांची तीच अवस्था होते. तेव्हां **नवराबायकोमध्यें मुळीं खरें प्रेम नसतेंच** आणि त्यामुळें जिव्हाळ्याचें **नातें उत्पन्न होत नाहीं.** एका ठिकाणीं राहणें, बसणें, उठणें म्हणजे नातें नव्हे. मग खरें नातें म्हणजे आहे तरी काय चीज ? संवादी सूर एकमेकांत पूर्णतेनें

मिसळून जें सुस्वर संगीत निर्माण होतें, तें संगीत म्हणजे त्या दोन सुरांचें नातें. 'होई एकात्मता नाहीं विसंवाद' झालें आहे तुमचें आणि तुमच्या अर्धांगीचें असें एकरूपत्व? जडला आहे का असा जिव्हाळ्याचा संबंध तुमचा उभयतांचा? तो तसला जिव्हाळा जर नसेल तर देश-प्रेमाच्या गप्पा उगीच का मारतां? अर्धांगस्वरूपी पत्नीवर प्रेम करतां येईना, तिच्याशीं जिव्हाळा उत्पन्न करतां येईना आणि तुम्हीं देश-भक्तीचा वायफळ बकवा करीत सुटतां? स्वतःचा पोकळपणा झांकण्याचें हें ढोंग म्हणजे भीरुत्व व आत्मवंचना होय. प्रत्यक्ष सत्यस्थितीकडे डोळेझांक व बेपर्वा टाळाटाळीच ( escape ) आहे.

रूढ प्रेमकल्पनांपेक्षां विशुद्ध जीवनक्रमांतील प्रेमसंबंध अगदीं भिन्न वाढतील, 'अव्यवहार्य' भासतील. पण तेच परिणामीं हितकारक व सत्य-निष्ठ आहेत.

## ता. १-१०-४८ शुक्रवार सकाळ : भारत सेवक समाज. जीवित-चक्रव्यूहांतून मुक्तता.

असंख्य जन्म, अमरत्व, आत्मा, परमात्मा, देव-देवपूजा, गुरु आणि शिष्यसंप्रदाय, संध्या, जप, तप, ध्यान-इत्यादि परंपरागत चालत आलेल्या या कंटाळवाण्या मार्गाशिवाय सत्य-प्रेमप्रदेशांत शिरण्याची दुसरी वाट नाहीं काय? एखादी जवळची व सरळ वाट असलीच पाहिजे. थांबायला मला वेळ नाहीं. काळाच्या कल्पनेला न कवटाळतां ( timelessness ) अगदीं आजच आणि आतां जुन्या राजमार्गाचा प्रवास मी थांबविणार. एकदम थांबणार आणि नवा मार्ग शोधणार, तरच नवी संस्कृति व नवमानव निर्माण होईल. जुनी घाण जाळून टाकली पाहिजे. घाण्याच्या बैलाप्रमाणें डोळ्यांना ढापणें बांधून गतानुगतिकत्वाच्या चाकोरींतून चकरा मारण्याचें आणि तेंच तें रडगाणें गुणगुणण्याचें मी आज या घडीपासून नाकारीत आहें. व्यक्तीव्यक्तींत

नव्या जीवनलहरी निर्माण करून निराळ्या पिढीचें बीजारोपण मी आज कां करूं नये ? करणारच मी तसें. यंत्राप्रमाणें जीवनक्रम चालला आहे माझा. मन अगदीं सुस्त मुर्दाड बनून गेलें आहे माझें. या माझ्या जड मनाच्या मलूलपणाच्या सबबी जडच व तें जें कांहीं करीत रहातें तेंहि जड–होईजड.

हा केवढा मोठा शोध लागला आहे मला ! नाहीं का ? कीं ये रे माझ्या मागल्या करून, मन मरून गेलें, नवजीवनाची पहांट उगवली. एखाद्या संशोधकाप्रमाणें मी असमाधानी वृत्ति ठेवून रोज नवे नवे शोध सारखे लावीत राहणार, आणि शोधाला शोध आणि माणसाला माणूस मिळवून सत्यत्वाची अखंड सांखळी तयार करीत रहाणार.

देव माणसांत भिंतीप्रमाणें–आडसराप्रमाणें उभे असलेले वाटाडे–पहारेकरी व कल्पना व आचरणाचे वठलेले वटवृक्ष बाजूला सारून कालातीत होऊन नवमूल्यांच्या वाऱ्यावर स्वार होऊन वस्तुस्थितीला वरण्याकरतां स्वतःची वरात माझी मीच काढणार. शाश्वत सत्याला आणि चिरंतन सुखानुभवाला मग पारावार कुठला ?

## ता. २–१०–४८ शनिवार

**वैवाहिक जीवनक्रमाचें रहस्यः**—पतिपत्नी हा वैवाहिक संबंध जरी फायदेशीर असला तरी प्रेमाकर्षणाच्या अभावीं उभयतां केवळ भोगेच्छेनें व हिशेबीवृत्तीनें आयुष्य कंठीत असतात. त्यांत दिव्य आत्मीयतेचा झरा पाझरत नसल्यानें निरपेक्ष दयेचा, सहानुभूतीचा व जातिवंत जिव्हाळ्याचा लवलेशहि नसतो–तें मुळीं नातेंच नसतें. निव्वळ परस्पर करार, व्यवहार व लोकाचार बनतो तो. 'गरज सरो आणि वैद्य मरो' अशा कांटेतोल भावनेनें वर्तन घडतें. नवरा व बायको एकमेकांच्या अपेक्षा–गरजा भागवूं इच्छित नसले अगर असमर्थ झाले तर त्या

व्यक्ती–सुखासाठीं शरिराच्या व मनाच्या समाधानासाठीं इतरत्र निवाऱ्याचें–आसऱ्याचें व करमणुकीचें स्थान शोधतात. ही नाहीं का सामान्य अनुभवाची गोष्ट? ही वस्तुस्थिति हिडिस आहे. ती डोळे भरून पाहिल्याशिवाय व समजून घेतल्याशिवाय हें जवळचें नातें आपण सुधारणार कसें? प्रत्यक्ष घरच्या सहकार्याबद्दल कांहीं एक न करतां तें आहे तसें डळमळीत ठेवून, त्याकडे दुर्लक्ष करून आपण देवाशीं, गुरूशीं व देशाशीं, प्रेमाचें, भक्तीचें, शिष्यत्वाचें नातें जोडावयास धांवतों आहोंत. हा निव्वळ भ्रमिष्टपणा होय. (unbalanced) पुरुषानें अगर स्त्रीनें स्वतःचा ‘मी’पणा सोडून देऊन पतिपत्नी या पवित्र नात्यानें आम्हीं एकरूप झालों आहोंत ही उच्च, विशुद्ध भूमिका स्वीकारली पाहिजे. आम्हीं एकमेकांची ‘मिळकत’ (property) आहोंत, त्या मिळकतीला कुणी हात लावतां उपयोगी नाहीं–चमत्कारिक व अभिलाषपूर्ण नजरेनें न्याहाळतां सुद्धां उपयोगी नाहीं–ही परंपरागत, समाजनीतिनियमांची (social discipline) अरुंद चाकोरी जर सोडून दिली तर काय होईल? आकाश पाताळ एक नाहीं ना होणार? इकडची पृथ्वी तिकडे नाहीं ना जायची! विलक्षण क्रांति मात्र घडेल. नवराबायकोचें विकृत नातें अजिबात बदलून जाईल. मत्सर, अविश्वास, सजीव भोगस्थान म्हणून परस्परांना लेखण्याचा हव्यास इत्यादि कुकल्पना विरून जाऊन नवा मनमोकळेपणा (frankness) निर्माण होईल व प्रसन्न वृत्तीच्या क्षितिजावर नवमूल्यें उदित होऊन भोगनिष्ठ (based on need) संशय पिशाच्चें पळून जातील आणि नवराबायकोचें एकरूपत्व हें असें निर्मळ, प्रेमळ झालें कीं भिन्नत्वामुळें निर्माण झालेले सर्वच प्रश्न सुटून जातील. समाजरचना बदलेल. व्यक्तीव्यक्तीमधील, समाजाच्या गटागटांतील, देशादेशांतील, धर्माधर्मांतील भेदांचे व एकलकोंडेपणाचे (isolation of a group or sect.)

संबंध वितळून जाऊन, एकच देव, एकच मानव आणि एकच वस्तुतत्त्व अवघ्या जगांत फुलून जाईल.

परस्परांची सोय केवळ सवड बघणें, लोकेषणा पाळणें. नुसता भपका करणें हें कांहीं नवराबायकोमधील खरें वैवाहिक नातें नव्हे. कलहोत्सुक दांपत्यावर जुन्या अगर नव्या लग्नविधीनें विवाहाचा आळ आलेला असतो. दैनंदिन जीवनांत परस्परांच्या दरम्यान कलहाचा गाळ सांठून तो वाढतच राहतो. विवाहाचा शुद्ध हेतु सफल होत नाहीं आणि म्हणूनच घटस्फोटासारखे कायदे आपण तयार केले आहेत. अहो, नवा घरोबा केला तरी संवयी जुन्याच आहेत ना? नव्या घरीं तरी काय दुसरें? तोच प्रकार सुरूं होतो.

तेव्हां नवराबायकोचा तो जविनसंबंध नीट समजून घ्यावा, फिरून तपासावा. वृत्तिभेदाचें कारण जो स्वतःचा 'मी'पणा तो उभयतांनीं सोडावा म्हणजे लगेच जी खरी वस्तुस्थिति आहे तिचें यथार्थ आकलन होईल. मनाला दुःख वाटेल त्या तसल्या जाणीवेनें. 'मी स्वतः दुःखी आहे' हें समजणें हाच एक मोठा व महत्त्वाचा मानसिक शोध लागेल. जें समरसत्वाचें नातें नाहीं त्याचें सोंगढोंग कशाला? दोन मानवी हृदयें सद्भावनापूर्ण होऊन, एका रंगानें रंगली, एका चालीनें चालूं लागलीं, एकाच बोलानें बोलूं लागलीं, एका तालावर नाचूं लागलीं, एकाच रागांत गाऊं लागलीं, तर, तर मानवी सौख्याला कुठली सीमा राहील? अमर्याद अनुराग एकमेकांवर उधळणारें जोडपें नवसंस्कृतीचें बाळ आपल्या उदरीं पुन्हां जन्माला घालील. दुर्बल-विकृत प्रजा निर्माण होणार नाहीं. खरें प्रेम नाहीं म्हणून खरें सौंदर्य जन्माला येत नाहीं, हृदयाचा हृदयाशीं मेळ बसत नाहीं, आणि म्हणूनच सिनेमाचे कृत्रिम खेळ त्यांना पहावेसे वाटतात.

## ता. ३-१०-४८ रविवार सायंकाळ

**विधायक जीवनः**—विविध परिस्थितींचे, घटनांचे आव्हान-स्वरूपी अघात होत असतात. जीवनक्रमावर आणि त्या आव्हानांना आपण प्रतिक्रियात्मक उत्तरें देत असतों. प्रश्न-प्रतिप्रश्न यांची रांग लागली आहे आणि त्या रांगेंत उभे राहून आपण प्रत्येकजण पुढें सरकत आहोंत. दगडासारखे मुंभ एका जागीं कांहीं आपण ठाण मांडून बसत नाहीं. डोंगरांच्या प्रचंड शीलाराशींना कांहीं आपण जीवन म्हणत नाहीं. पाण्याच्या प्रवाहाला आपण जीवनप्रवाह म्हणतो. जीवन म्हणजे जलरूपच. पण तें वाहतें, जीवंत, प्रवाही असें पाहिजे. म्हणजेच तें आरोग्यदायक असें होतें. नाहीतर तें एक घाणेरडें तरी राहतें किंवा सांडपाणी म्हणून आपणांस त्याचा निकाल करावा लागतो. मानवी जीवनाचेंहि तसेंच आहे. जोंवर तें एकसारखें संथपणें प्रगति पथावर आहे तोंवरच त्याला मूल्य आहे. स्थगित जिवन तें मुळीं जीवनच नव्हे. जीवनविषयक प्रश्न नेहमींच नविन आणि त्यांचे निर्णय जुन्या पद्धतीनें दिलेले. त्या जुन्या पद्धतींचा ठसा त्या नव्या घटनांवर पडून त्यांचें स्वरूप बिघडतें, गढूळ होतें, सर्वस्वी अभिनव असें रहात नाहीं. अशी जुन्या विचारसंचयाची व अभिनव जीवनाची सारखी ओढाताण चालल्यानें जीवनांत गोंधळ व अशांतता माजून राहिली आहे.

तेव्हां मन निर्मळ करून, पूर्वसंस्कार पुसून टाकून, विचारचक्र थांबवून, ज्या वेळीं तें स्तब्ध होतें त्या वेळीं तें अत्यंत अनिश्चित अशा अवस्थेंत असतें व तेथूनच माणसाला धाडस करावें लागतें. अनेक विचार मनांत घुसतात. त्यापैकीं कोणाच्याहि आहारीं न जातां तारतम्यानें वर्गीकरण न करतां अत्यंत जागरूकपणें ज्या क्षणीं व्यक्ति वस्तुस्थितीची संपूर्ण जाणीव करून घेत असते, तो क्षण म्हणजे विधायक जीवनाचा क्षण होय. दोन विचारांमधल्या अवकाशांत, निमिषांत चमकणारे क्षण-

अनेक क्षण गोळा करूनच विधायक निर्मिती होत असते. चित्रकार, कवि असल्याच क्षणांत कला प्रगट करीत असतात व सत्यत्वाचा अनुभव घेतात. प्रत्येक व्यक्तीला हा अनुभव घेतां येण्यासारखा आहे. क्षणाक्षणाला जुनें बदलतें आहे व नवें येत आहे. विशुद्ध मनानें वर्तमान क्षणाक्षणांतून जागरूकपणें व्यवहार करणें म्हणजेच विधायक जीवन व्यतीत करणें होय.

निर्विकार व प्रशान्त मनामध्येंच सत्याचा साक्षात्कार होत असतो-होत राहतो.

**प्रश्न** :—( १ ) अपूर्ण अनुभव हीच स्मृति आहे काय ?

( २ ) अज्ञानाची जाणीव वरच्या दर्जाची म्हणून तिचा ठसा ज्ञात जाणिवेवर पडतो काय ?

( ३ ) गुरुशिवाय कसें भागणार ? गुरु नको असें सांगणारे तुम्ही सुद्धां गुरूच होत नाहीं कां ?

( ४ ) एका जन्मांत साऱ्या आशा-आकांक्षा पुऱ्या होत नाहींत; त्याकरतां अनेक जन्म नकोत कां ? व्यक्तीचा पूर्ण विकास कसा होणार ? आत्मा अमर नाहीं का? अमरत्वाची कल्पना खोटी काय म्हणून मानतां?

**उत्तरें** :—( १ ) जसजसा काळ लोटेल तशी आपली आठवण बुजत जाते, अंधुक होते. कांहीं घडलेल्या गोष्टी तर आपण अजिबात विसरतों, त्यांची स्मृती नष्ट होते. मनानें आठवण करायची असते. किंबहुना मानवी मन म्हणजे स्मृति-संचय, आठवणींचा सांठा होय. मन जाग्यावर नसेल तर आठवण नाहीं. शान्त मनानेंच आठवण करायची असते; भटक्या मनानें नव्हे. आपला अनुभव बरा-वाईट, सुख देणारा अथवा दुःख देणारा अशा स्वरूपाचा असतो. तो अनुभव जर पुरा झालेला असला तर त्याचा अवशेष स्मृतीवर रहात नाहीं. अर्धवट अनुभवच मनांत शल्यासारखे टोंचत रहातात. पूर्णानुभव म्हणजेच

पूर्णविस्मृति. मनाचा व्यापार अर्थात् त्याबाबीपुरता बंद असतो. पूर्णतेमध्येंच गौरव आहे. अपूर्ण मानव पूर्णतेकडेच जात आहे ना? आणि पूर्णता लाधली, सत्यसाक्षात्कार झाला, मग कोण कशाची आठवण करणार? आठवावयाचें तरी काय? पूर्ण भरलेल्या कुंभांत घड्यांत पाण्याचा एक थेंबहि घालतां येत नाहीं. अवकाशच नसतो तसें करायला. पूर्ण चंद्राला कला नसतात, संपूर्ण आत्मविकसित मानवाला आठवणी नसतात.

( २ ) जाणीव एकाच प्रकारचा पदार्थ आहे. त्यांत श्रेष्ठ—कनिष्ठ भाव कांहीं एक असूं शकत नाहीं. वरवरची जाणीव हा जागेपणचा अनुभव. झोपेंतली भानरहित जाणीव ज्ञात जाणिवेवर उमटते. त्याखालचा थर जगण्याच्या इच्छेचा व तळाचा थर म्हणजे अनिश्चितपणाचा सागर ( the nescience ) यांतूनच सर्व कांहीं उत्पन्न होत आहे. अनिश्चितपणा हा एक जात व सलग असा वाण आहे, त्यांतून जगण्याची इच्छा, त्यावर भानरहित निद्रा व शेवटची व्यक्तीच्या जागृतीमधली वरवरची जाणिव. मनाचे हे चार थर म्हणजेच संपूर्ण जाणीवता. (total consciousness )

( ३ ) रिकाम्या हृदयालाच गुरुप्राप्तीची उठाठेव करावीशी वाटते. गुरूची भर घालून व्यक्ति आपल्या जीवनाचा भकासपणा भरून काढण्याचा वृथा प्रयत्न करीत असते. मी हें गुरुबाजीबद्दल सांगत आहें. व्यावहारिक व तंत्रशिक्षकांबद्दल नव्हे. देवाची भेट करून देतों असें सांगणारे निव्वळ दलाल होत, व्यापारी होत. व्यापारी स्वतःच्या मिळकतींत भर घालतील, तुमच्या आमच्या नव्हे. गुरूचा नाद सोडल्याविना सत्यसाक्षात्कार नाहीं. परावलंबी जीवन हें कधींहि पूर्ण जीवन नव्हे. संपूर्णतेचा अनुभव ज्याचा त्यानेंच घेतला पाहिजे. स्वानंद—निजानंद ही का कोणी कोणास देण्या-घेण्याची बाब आहे? आणि देऊन

देणार काय गुरू ? केवळ शब्दच ना ! शब्दांत भरलेला अर्थ—त्याचें काय ? तो अर्थ तुमचा तुम्हीच ज्या वेळीं ग्रहण करतां, प्रत्यक्ष अनुभव घेत असतां (while experiencing) त्या अवस्थेंत मुळीं स्मृतीच नसते, मनाला व्यापार नसतो, विचारचक्र थांबतें. मग अशा स्वानंद साम्राज्यांत कोण कोणाचा गुरू आणि कोण कोणाचा शिष्य ?

(४) पुनर्जन्म, पूर्णतेकरतां, मानवी विकासाकरतां, देवप्राप्ती-करतां नको कां ? जन्मापूर्वींची स्मृति नाहीं, मरणानंतरच्या अज्ञात दशेचा उगीच कशाला विचार हवा ? काय लाभ आहे त्यांत ? मूर्खांची ही व्यर्थ खटपट होय. आहे तसेंच पुढें चालू ठेवण्याचा हा हव्यास आहे. जीवन समजत नाहीं, मग मरण कसें समजेल ? जीवन हें एक टोंक व मरण हें दुसरें. एकाच काठीचीं हीं दोन टोंकें आहेत. काठी एकच. जीवन म्हणजेच मरण. जगायचें कसें हें ज्याला कळलें त्याला मरणाचें भय नाहीं. मरण ही नवजीवनाची सुरुवात. जीवनाची पूर्णता हेंच मरण. क्षणोक्षणीं जीवन-मरणाचा चाळा सुरू आहे. जुना, वापरलेला देह जीर्ण होऊन विरणें म्हणजेच मृत्यु. आणि जें जीवनांत साधलें नाहीं तें मरणानें मिळणें शक्य नाहीं. आत्मा हीच मुळीं मानवी मनाची मोडकीतोडकी कल्पना, तिला सत्यत्व, वस्तुता कोठून येणार ? तेव्हां आत्मा, अमरत्व, पुनर्जन्म या साऱ्या कल्पना शब्दांपलीकडे कांहीं नाहीं. आणि जें मुळीं नाहींच तें आहे असें मानून नव्या जन्माची आशा करण्यासारखें दुसरें अज्ञान नाहीं.

## ता. ४-१०-४८ सकाळीं ८ वाजतां : भारत सेवक समाज

**वस्तुतत्त्वाची जाणीव** :—व्यक्तीचें मन जड झालें आहे हें आपण समजून घेतलें. असल्या मनानें केलेलें निराकरण व सांगितलेल्या सबबींहि पण जडच (dull) असणार असल्या मनाचा सारा व्यापार चेतनाशून्य व यांत्रिक बनलेला असा रहातो. ती तीच गोष्ट पुन्हां केल्यानें मनाचें हत्यार बोथट व दिवसानुदिवस दुर्बल होत जातें.

हा मनाचा जडपणा समजून घ्यायला हवा. त्याच्यापासून दूर पळून जातां उपयोगी नाहीं. तो जडपणा टाळणें हा मनाचा एक नवा उद्योग असतो.

कुठें तरी विश्वास ठेवावयाचा, कशाचा तरी आधार घ्यावयाचा म्हणून आपण देव, धर्म व गुरू यांच्या नादीं लागत आलों आहोंत. राजकीय पक्ष आपण स्थापितों व पुढारी निवडतों. पण मनाला समाधान देण्यास हे सर्व प्रकार आजपावेतों निरुपयोगी ठरले आहेत. मग तेच गिरवून तुम्हांला व मला काय लाभ होणार ?

हा सर्व धिंगाणा फोल आहे. चुकीचा आहे हें प्रथम समजलें पाहिजे. नंतर या मार्गानें जाण्याचें आपण बंद केलें पाहिजे परंपरागत मार्गानें आपली नजरबंदी केली आहे. तें बंधन तोडून आपण मोकळें झालों कीं नवी दृष्टी आपोआप येईल. अनिश्चितपणाच आपल्याला पुढील मार्ग दाखवील. आजवर आपण निश्चितीची आशा केली, तोच आपला कोंडमारा होता. ती कांहीं निवाऱ्याची जागा नव्हती.

जाड्य हा मनाचा विकार आहे. मनाचा व्यापार थांबला कीं, मन शांत झालें. या विकाराला नांव दिलें नाहीं कीं, जडपणाचा रोग नाहींसा व्हायला लागतो. आणि मग काय ? विकार मावळला, विचार थांबला कीं, मनाच्या त्या प्रशान्त अवस्थेंत जें कांहीं आहे त्याचा वास्तवतेचा, 'तत्त्वमसि'चा साक्षात्कार होतो. तो अनुभवीत असतांना 'मी' पणा

नसतो. अनुभवणें थांबलें की, अनुभव-स्मृति सुरू होते. अनिश्चित-पणाचा धक्का बसतो. काय करावयाचें याची निवड नसते. त्या क्रिया-विहीन जाणीवेंत सत्याची व आपली भेट नवोनव क्षणाला होत असते. त्या क्षणाचें जीवन हें नवजीवन होय. सत्याची क्षणिक भेट आणि ताटातूट म्हणजेच मानवी जीवनप्रवाह होय.

विचारचक्र थांबवून प्रशान्त मनानें क्रियाविहीन व निर्णयशून्य जाणिवेंत सत्याचा अपरोक्ष (direct) अनुभव घेत रहाणें हा तात्कालिक (immediate) साधा (simple) व सरळ असा मार्ग आहे. परंपरेच्या लांबच लांब पाऊलवाटेनें जाऊन शरीर झिजवून मनाला शिस्त लावून अनेक जन्म वाट पहाण्यापेक्षां याच जन्मीं चालू घडीला प्रयोग करून पहा. प्रयोगासाठीं तरी जुनी चाकोरी सोडाल कीं नाहीं !

अज्ञात देवाचा शोध कालकक्षेंत राहून केव्हांहि लागणार नाहीं. विकाराला नांव दिलें नाहीं कीं, त्या क्षणींच नवविधा (New facet) भावाची तीव्र जाणीव व्यक्तीच्या प्रशान्त मनांत उदित होते. तो सहज-सिद्ध (spontaneous) अनुभवणें या अवस्थेचा भाग्याचा क्षण शब्दानें व्यक्त होणारा नाहीं. शब्दातीत आहे.

## ता. ५-१०-४८ मंगळवार सायंकाळ

**संसार आणि मुलेंबाळें** :—होतात झालें मुलेंबाळें ! तीं कां होतात तें कांहीं आपल्याला ठाऊक नाहीं. कशीं होतात हें आहे ठाऊक ? आपलें व मुलाबाळांचें योग्य प्रकारचें नातें काय आहे याचा तुम्हीं आम्हीं क्वचितच विचार करतों. या मुलाबाळांशीं असलेलें आपलें नातें म्हणजे उद्यांच्या नागरिकांशीं असलेलें नातें होय. त्यावर शिक्षण, सैन्य, लढाया व शान्तता-यांसारखे महत्त्वाचे प्रश्न अवलंबून आहेत. तेव्हां तुम्हीं व मीं मिळून या प्रश्नांचीं उत्तरें आजच शोधलीं पाहिजेत; आहेत तीं मूल्यें तपासलीं पाहिजेत व नवमूल्यें निर्माण केलीं पाहिजेत.

तरच नवसमाज व नवसंस्कृति क्षणोक्षणीं तयार होत राहील. नुसती प्रजावृद्धि करून काय होणार! जागतिक संहाराकरतां नवें सैन्य कां उगीच बनवतां व स्वतःला फसवितां?

नातें हें परस्पर अपेक्षा आणि स्वाथ्य यावर जोंवर अवलंबून असतें तोंवर तें मुळीं वास्तविक नातेंच नाहीं. परस्पर समाधान व एकलकोंड स्वार्थ यापलीकडे नवराबायकोच्या नात्यांत कांहीं नाहीं. धर्मपरंपरा व लोकव्यवहार यांच्या जाळ्यांत नवरा व बायको असे दोघेहि सांपडले आहेत.

स्वतःच्या बायकोबरोबर मानसिक संगम घडवून आणून, नवरेपणाचा तुसडा कांठ सोडून देऊन समजुतीच्या पाण्यावर उठणाऱ्या बुद्धिवैभवाच्या लहरीलहरींवरून जर आपण समरसतेनें, पोहावयास लागलों, जुन्या आचार–विचारांचें मरण स्वतः डोळ्यांनीं पाहून मरणाच्या महाद्वाराकडे म्हणजेच नवसंस्कृतीच्या जन्मक्षणाकडे जर तुम्ही व मीं जाऊन थडकलों, तर जें कांहीं आहे तें चिरंतन शाश्वत सत्य आपणांस कडेवर घेईल, आपणही त्याला स्वतःच्या कटिखांद्यावर घेऊन निजानंदानें नाचूं लागूं! स्वानंदाचा हा लग्नसोहळा म्हणजेच नवमानवतेचा सुंदर, दिव्य व भव्य असा पाळणा होय.

मुलाबाळांशीं तुमचें काय नातें आहे हें पहायचें असेल तर अगोदर नव्या नजरेनें मुलाबाळांकडे पहा, मुक्या मनानें त्यांच्या आवडीनिवडी तपासा, भरलेल्या वत्सलतेनें त्यांच्या नवप्रवृत्तींना खुली वाट करून द्या. मुलाबाळांबरोबर नातें जोडावयास केवळ हीच वाट होय.

## ता. ६-१०-४८ बुधवार सकाळीं ८-१० : भारत सेवक समाज महत्त्वाचें प्रवचन

### ( प्रगति आणि उत्क्रांति )

हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. दिवसेंदिवस आपली प्रगति होत आहे, आपण सुधारत आहोंत, आपल्या सुखसोयी वाढवीत आहोंत. सृष्टीच्या तत्त्वावर मानव जणूं ताबा मिळवीत आहे. पक्षांप्रमाणें पंख लावून आपण विमानांतून आकाशांत प्रत्यहीं हजारों मैलांचा प्रवास करीत आहोंत. जगांतील अंतर द्रुतगतीनें तोडून आपण जग जवळ आणलें आहे. तीच गोष्ट यंत्रांच्या सहाय्यानें अल्पकालांत उरकून आपण मानवांनीं कालावरहि एक प्रकारची मात केली आहे. मानवी बुद्धिमत्तेच्या या व्यावहारिक ( practical ) प्रत्यक्ष विलासाला प्रगति. हें नांव आपण दिलें. एकोणिसाव्या शतकांत प्रोग्रेस ( progress ) हा शब्द इंग्रजी भाषेंत यांत्रिक युग सुरूं झाल्यावर रूढ झाला. नवीन मोटार गाड्या, नवीं घरें, नवे रेफ्रिजिरेटर्स या नाविन्यांत एकसारखी भरच पडूं लागली.

पण या प्रगतीमुळें मानवांचीं मनें जवळ आलीं का ? बंधुभाव वाढला कीं द्वेष? जगभर शांतता नांदते आहे कीं संहार सुरूं आहे? उत्तर का द्यावयास पाहिजे काय वस्तुस्थिति आहे त्याचें ?

बैलगाडीपासून विमानापर्यंत—तासीं पंधराशें मैल धांवणाऱ्या जेट-प्लेनपर्यंत आपण प्रगतीचा पल्ला गांठला. कदाचित् आणखीहि आकाश-यानांचा वेग वाढेल. पण बैलगाडीचें विमान झालें का ? विमान हें कांहीं बैलगाडीचें उत्क्रान्त स्वरूप नव्हे; स्वतंत्र वस्तु आहे. राइटबंधूं-पासून सुरुवात होऊन विमानविद्येची ही प्रगति एका शतकांतीलच आहे. गति ही एकच वस्तु गाडी व विमान यांत समान आहे. गति उत्क्रान्ति नव्हे. बीजाचा वृक्ष बनतो ही त्याची पूर्ण वाढ होय; उत्क्रांति

नव्हे. बीजांतच वृक्ष व पुढें वृक्षापासून बीज. स्वरूपान्तर नव्हे, आणि उत्क्रान्तीहि नव्हे. माकडापासून मनुष्य झाला असें उत्क्रान्तिवादाप्रमाणें मानलें तरी माकड म्हणजे मनुष्य नव्हे. उत्क्रान्त स्वरूप व मूळ स्वरूप ही एक नाहींत याला आपण उत्क्रान्ति म्हणतों—वाद म्हणत नाहीं. गुलाबाचें फूल गुलाबच राहिलें, दुसरें कांहीं झालें नाहीं. सिंह हा प्राणी सिंहच राहिला, दुसरा कोणताहि प्राणी तो 'बनला' नाहीं. तेव्हां वाढ अगर प्रगति म्हणजे उत्क्रान्ति नव्हे.

उत्क्रान्ति ही दशा मानवी जीवनांतच शक्य आहे. मानव प्राणी दिवसानुदिवस उन्नत, उत्क्रान्त व परिपूर्ण होत चालला आहे व या क्रियेला (process) उत्क्रान्ति हें नांव आहे.

मानवाच्या मानसिक उत्क्रान्तीबद्दल आपणांस विचार करावयाचा (psychological evolution) आहे—शारीरिक नव्हे. मानवी शरिराचा आकार आहे तोच आपण गृहीत धरून पुढें जाऊं या. मानवी मन हें अजब यंत्र आहे. अनेक व अगणित अशा विकार-विचारांचें तें गाठोडें आहे. (it is a bundle of thoughts and feelings.) प्रत्येक व्यक्ति अशक्त, (weak) अशान्त, किंकर्तव्यमूढ (confused) आणि अपूर्ण (imperfect) अशी आहे. आपल्याला समर्थ, शान्त व संपूर्ण व्हावयाचें आहे. बुद्ध व्हावयाचें आहे. तेव्हांच आपल्याला चिरंतन सौख्य लाभेल व आपलें दुःख-विमोचन होईल, तोंवर नाहीं. याच प्रक्रियेला उत्क्रांति असें आपण म्हणतों व ती साधावयास एक जन्म अपुरा असून अनेक जन्मांच्या अखेर पुण्यसंचयानें, अनेक साधनांच्या, अनुष्ठानांच्या द्वारें आपणांस शान्तता लाभेल व सौख्य प्राप्त होईल. काय वाटेल तें केलें तरी आजच्या आज नव्हे, पायरी पायरीनेंच वर चढत गेलें पाहिजे व निर्वाणपद गांठलें पाहिजे! हप्तेबंदीची ही क्रममुक्ति (Instal-

mental system of liberation) एवढीच काय ती आपल्याला शास्त्रानें, धर्मानें, परंपरेनें शिकविली आहे. तेव्हां सारी पूर्वीची कल्पना व परंपरा बाजूला सारून केवळ बुद्धीच्या सहाय्यानें पूर्णता गांठायला दुसरा कांहीं मार्ग आहे का हें आपण–तुम्ही व मी मिळून शोधूं या.

मी अपूर्ण आहें. मला बुद्धासारखें पूर्ण व्हावयाचें आहे. एका शिखराच्या टोंकावर बुद्ध व पायथ्याशीं मी अशी नुसती तुलना करून काम भागणार नाहीं. तुलना करून समजूत निर्माण होत नाहीं. (no understanding by a process of comparison.) कारण दुसरें टोंक बुद्धाची अवस्था, मला स्वतःला, व्यक्तीला माहीत नसते. नुसती त्याची कल्पना (idea) उपयोगी पडत नाहीं. मला जें प्रत्यक्ष ठाऊक आहे तें इतकेंच कीं मी दुःखी आहें, अपूर्ण आहें. मला सुखी व्हावयाची इच्छा आहे. मला आजच्या आज सुखी व्हावयाचें आहे. परंपरेच्या वाटेला लागून अनेक जन्म थांबायला मी तयार नाहीं. परंपरेच्या मार्गानें जाणें म्हणजे एका विशिष्ट साधनेंत – तंत्रांत तज्ज्ञ (specialist) होणें होय. साधावयाची आहे पूर्णता आणि स्वतःला बनवावयाचें मात्र एकांगी – ही विपरीत पद्धति होय. तज्ज्ञ होणें म्हणजे संकुचित होणें, एकाच विभागाला वाहून घेणें, दुसरें सारें ज्ञान दूर लोटणें, – तरच तज्ञ होता येतें. हा पूर्णतेचा मृत्यु होय. तेव्हां केवळ भजन करीत सुटणें, पूजा तर पूजा, यज्ञयाग, योगाचें अवडंबर गुरुंच्या नादीं लागणें, त्यांच्या वचनावर विश्वास ठेवून आंधळ्यासारखा मार्ग क्रमीत जाणें – हा सारा परंपरागत पसारा झुगारून दिला तरच आपल्याला-स्वतःला–प्रत्येक व्यक्तीला उत्क्रान्तीचा, पूर्णतेचा, शांतिसौख्याचा अभिनव मार्ग सांपडेल.

तेव्हां व्यक्तीनेंच कृति केली पाहिजे. तुलना सोडून पूर्णतेचें टोंक निश्चित न करतां सुखी होण्याचा विचार ठरविला कीं, व्यक्तीनें पहिलें

पाऊल टाकलें पाहिजे. विचारी व त्याचा विचार हे दोन नाहींत, एकच आहेत. (Thinker and his thought are the same.) विचार नाहीं तर विचार करणाराहि पण संभवत नाहीं. विचार हा मनाचा एक व्यापार आहे. तसेंच ध्येयनिश्चिति ही बाब कालनिष्ठ आहे. बुद्धाची संपूर्णता व शांति जी मला पाहिजे आहे, ज्याकरतां मी अनेक जन्म धडपड करणार आहें, ती स्थिति अनंत, अपार व कालातीत अशी आहे. पण कोणच्याहि कालस्पृष्ट साधनांनीं कालातीत वस्तु मला सांपडणार नाहीं, मिळणार नाहीं, मला त्या अवस्थेचा अनुभव येणार नाहीं. तेव्हां मनाचा सारा व्यापार बंद पडला पाहिजे. याचा अर्थ पहिलें पाऊल टाकणारा 'मी' याचा लोप झाला पाहिजे म्हणजे स्वतःच्या पुढें ठेवलेलें सोडून दिलें पाहिजे, त्याच्यामागें धांवता उपयोगी नाहीं. तेव्हां "मी" पण गेलें, ध्येय नाहींसें झालें कीं मग काय उरलें? केवळ घडणारें सहजशुद्ध आचरण (action) आणि तेंच चिरंतन सौख्य, परिपूर्णतेचा तो क्षण, बुद्ध देवांची ती शांति, सत्यवस्तूचा, जें कांहीं आहे त्याचा, वास्तवतेचा तो सहज साक्षात्कार होय! प्रत्येक व्यक्तीला तो अनुभवितां येईल, त्याला अनेक जन्मांची उत्क्रांतीची जरूरी नाहीं. उद्यां देखील थांबावयास नको. आजच या क्षणीं, क्षणाक्षणाला हा नवोनव अनुभव प्रत्येक प्राणिमात्राला साधतां येईल.

अशारीतीनें उत्क्रांतीच्या पल्लेदार मार्गाखेरीज संपूर्णता साधायला जवळचा एक रस्ता आहे हें बुद्धीच्या सहाय्यानें आपण आकलन करूं शकलों आहोंत.

मनाचा खरा व्यापार थांबल्यावर, विचारचक्र नष्ट झाल्यावर मन कोणत्या स्थितींत असतें याचा आपण पुढें विचार करूं.

## ७-१०-४८ शुक्रवार सायंकाळ : आपल्या संततीशीं नातेसंबंध

जुन्या ओंडक्याच्या एखाद्या ढलपीचाहि (chip of the old block) संबंध मुळाशीं असतो. सारखेंच तें. खाण तशी माती. बाप तसा बेटा. अगदीं लहानपणीं मातापित्यांना मूल हें जणूं कचकड्याच्या खेळण्यासारखें असतें. जसेंजसें तें वाढत जातें तसें तसें तें त्यांच्यापासून प्रथम खोडकरपणा नंतर खेळण्यासारखें सवंगडी जमविणें, शिक्षण वगैरे प्रकारांनीं दूर दूर जात असतें. मुलांशीं संबंध कमीच होतो आपला. तें आपल्या नादांत व आईबाप आपल्या काळजींत व व्यवसायांत गढून गेलेले असतात. जुनी परंपरा, जात, धर्म, व्यवहार, आर्थिक अडचणी संसारांतील सुखदुःखें वगैरे अनेक तऱ्हांनीं आपलीं मनें गांजलेलीं, भरलेलीं-भारावलेलीं असतात. जाणत्या मुलामुलींचीं मनें समजून घ्यायला असतो कुणाला वेळ ? आपण त्यांना आपल्या ऐपतीप्रमाणें शिक्षण देतों हें खरें; पण तें शिक्षण योग्य प्रकारचें आहे कीं नाहीं याचा आपण कोठें विचार करतों ? हे विचार करण्याची पात्रताच नसते बहुतेकांना! किंबहुना इच्छा व सवड नसते. असें आंधळें गारुड चाललें आहे. संकुचित, स्वार्थी, आपमतलबी, मत्सरी व फुटीर तुटकवृत्ति वाढविणारें शिक्षण—जें कांहीं जसें मिळेल तें—मुलांमुलींना मिळतें व तींहि समाजयंत्रांतील नवीं चक्रें बनतात. हिंसा व संहाराची गाडी हींच मुलें व मुली प्रौढवयांत पुढें ओढीत असतात.

तेव्हां मुलांशीं आपलें योग्य नातेंच नसतें. आपण त्यांचे पालक स्वतःला समजतों; पण मिळकतीची, पैशा-अडक्याची आपण जितकी काळजी घेतों, तितकी कांहीं वाढत्या मुलामुलींच्या वाढत्या मनाची घेत नाहीं. योग्य शिक्षण देणाऱ्या शाळा काढणें हें तुमचें व माझें काम नाहीं का ?

**स्वतःचें स्वतःलाच कळत नाहीं, स्वतःचें मन मोकळें (free)**

नाहीं, मग सत्य त्यांना समजणार कसें ? पेला रिकामा असेल तर त्यांत पाणी ओततां येईल, भरलेल्यांत नव्हे. संस्कारांचें घाणेरडें पाणी ओतून देऊन मन रितें-रिकामें केलें पाहिजे. तरच त्या रिकाम्या मनांत नवजीवन भरतां येईल. मुलांना योग्य शिक्षण देण्यापूर्वीं अगोदर स्वतःला योग्य शिक्षण द्या. स्वतःचीं मनें निर्मळ करा, तरच मुलांचीं मनें समजून त्यांना उद्यांचे उत्तम नागरिक बनवितां येईल. तुम्हांला कांहींच लक्ष द्यावयास नको. 'मागील अंकावरून पुढें चालू' असा तुमचा खाक्या चालला आहे. लोकसंख्या सारखी वाढते आहे. उपासमार व बेकारी आ पसरून उभीं आहेत, करतां का याचा विचार ? या मुलांशीं असणाऱ्या तुमच्या संबंधांत समाज, देश व देव यांच्यांशीं असणारी सर्व नातीं गोंवलीं गेलीं आहेत. तुमच्या मुलांशीं जर तुमचें योग्य प्रकारचें सूत जमलें तर मिळकत जशी डोळ्यांत तेल घालून जपतां त्याप्रमाणें मुलांचें शिक्षण व मनें तुम्हीं तयार करूं शकाल. तरच तुम्ही त्यांना लष्करी शिक्षण, धर्मवेड, जातिभेद, पैसा-अडका, बाह्य श्रीमंती, पोकळ मिजास व बडेजाव जन्मजात, उच्चनीचता व व्यक्तिनिष्ठ स्वार्थान्धता इत्यादि व्यक्तिमत्वांतील खांचखळग्यांपासून दूर दूर ठेवाल. या रोगराईचा वारा देखील आपल्या मुलाबाळांना तुम्ही लागूं देणार नाहीं. स्वतःचे नांव पुढें चालविणारीं शुष्क यंत्रें तुम्ही त्यांना बनविणार नाहीं. लांड्यालबाड्या करून मिळवलेली धनदौलत, आयत्या बिळांतील नागोबाप्रमाणें उपभोगावयाची तुम्ही त्यांना संधि देणार नाहीं, व त्यांच्याहि जीविताचें वाटोळें होणार नाहीं. पण श्रीमंतांना सत्य कसें भेटेल बरें ? बँकांतील भरमसाट शिलका आणि उपास्याचें भजन, देवाचा चाळा-पुरे करा ना हा वेडेपणा. सुईच्या अग्रांतून उंट जाईल एक वेळ पण परमेश्वरी राज्यांत श्रीमंत शिरणार नाहीं कधीं ! धनदौलतीचा संमोह सोडा (leave all to gain all) म्हणजे सर्वेश्वर भेटेल. एरव्हीं कसा भेटणार तो ? हृदयाचा रांजण मोकळा करा म्हणजे त्यांत सत्यजीवन भरतां येईल तुम्हांला. अहंभावानें

कंगाल होऊन (be poor in spirit) मनानें श्रीमंत व्हा. मग तुमच्या वैभवानंदाला त्रिभुवनांत तोड उरणार नाहीं.

## ८-१०-४८ शुक्रवार सकाळीं : ८-१० भारत सेवक समाज.

**भक्ति आणि प्रेमः**—आपल्या मनांत एकसारखे विचार येत असतात. विचारांचा हलकल्लोळ उडून राहिला आहे. विकार, वासना वगैरेची त्यांत भर पडलेली. मग आपलें आचरण विवेकशून्य (thoughtless) झालें तर त्यांत काय नवल आहे?

विचार आणि विकार एकच कां? परस्परावर ते अवलंबून आहेत कां? विचाराशिवाय विकार येईल कां मनांत? मनांत विचार कशानें उद्भवतो?

वस्तुदर्शन अथवा स्पर्श झाल्यावर मनावर आघात (impact) आश्चर्य (shock) प्रतिक्रिया (response) विकार आणि विचार अनुक्रमें, नव्हे एकदमच (simultaneously) उत्पन्न होतात. विकाराला नांव दिलें तरच तो विचार बनतो, नाहींतर बनत नाहीं. विकाराच्या आसनाशिवाय विचार बसूं शकत नाहीं. या सर्व प्रक्रियेला जाणीव ही संज्ञा आहे. विचार आणि विकार इंद्रियांच्या स्पंदनापासूनच ( from sensation) उद्भवतात. तेव्हां विकार-विचारांचें मूळ एकच-इंद्रियस्पंदन (sensation).

प्रेम हा विकार आहे का विचार आहे? नांव न दिलें तर नाहींशा होणाऱ्या विकाराप्रमाणें प्रेम हें नामबद्ध नाहीं आणि विनाशीहि नाहीं. प्रेमाला विचार म्हणायला गेलें तर तो मनाचा व्यापार होऊन बसेल. दोन हृदयांचा संगम, जातिवंत अनुभविणें, परस्परांची संपूर्ण जाणीव ही ती अवस्था. त्याला आपण प्रेम हें नांव देतों. पण नांव म्हणजे प्रेमवस्तु अगर अवस्था नव्हे.

भक्ति म्हणजे परमेश्वरावरचें नितांत प्रेम ना? मूर्तिपूजा करून देवावरील आपण प्रेमच करतों प्रगट ना? भिकाऱ्याला दिडकी फेंकून दाखवलेली दया प्रेम होईल का? प्रेम हा काहीं मानवी हृदयाचा विकार नव्हे खास. भक्ति म्हणजे देवाचा बेताल हव्यास ( inordinate greed ) होय. ती नुसत्या कल्पनेची—शब्दाची पूजा होय.

दगडी मूर्तीपुढे अथवा कागदी चित्रापुढें रडणें, प्रार्थना करणें, नाचणें आणि वाद्य वाजविणें, आरत्या, धुपारत्या ओंवाळणें, भजनांत रंगणें, भोजनांत दंग होणें—हचि ना तुमची भक्ति? हा मुक्तीचा ( liberation ) मार्ग का भुक्तीचा मार्ग? हा वेडगळपणा सोडणार तरी केव्हां? लाखों रुपयांचीं मंदिरें उभारतां आणि लाखांनीं मोजतां येतील इतके लोक रोज उपाशीं—अर्धपोटीं राहतात—ही का भूतदया तुमची?

निर्दय हृदयांना देव कसा भेटणार? शेजारधर्म ज्यांना पाळतां येत नाहीं त्यांनीं देवधर्माचीं थोतांडें उभारायचीं! चाललें आहे ना हें असें? प्रेमानेंच देव सांपडेल जर तो कोठें एका जागीं स्थिर असेल तर. प्रेम करण्याकरतां वस्तु पाहिजे. प्रेम वस्तूमध्यें पाहिलें पाहिजे, ती वस्तु समजून घेतली पाहिजे. तिच्याशीं हृदयाचें नातें जोडलें पाहिजे, मन निर्मळ व शुद्ध केलें पाहिजे. तें मोकळें निर्विकार केलें पाहिजे, रिकामें ठेवलें पाहिजे आणि प्रिय वस्तूला सर्वस्व अर्पण करून तन-मन धनानें तिच्याशीं पूर्णपणें एकरूप बनून त्या प्रशांत अवस्थेंत स्वागताची तयारी पुरी झाली कीं, क्षणोक्षणीं सत्यतेची तुमची भेट होईल व हा सत्य आणि व्यक्तीच्या भेटीचा अखंड सोहळा व समारंभ जीवनांत फुलता ठेवणें प्रत्येकाला शक्य आहे. हा प्रत्यक्ष प्रयोग केला नाहीं तर हा निजानंदाचा बोग येणार तरी कधीं?

भावनामय विचाराच्या क्रियेला ( to think, feel) जाणीव हें

नांव आपण देतों. मनाच्या **जागरूक** चपलतेमध्येंच जाणीव (consciousness) उदय पावते व स्वानंदाचा व सौंदर्याचा अभिनव अनुभव देत राहते.

नातें जोडायला दुसरें टोंक नको कां? ती **सत्यवस्तु पाहिजे** (factual.) शब्द (Word) चिन्ह (symbol) वचन (promise) व केवळ विश्वास (belief) काय उपयोगी? सुखासाठीं सारें करावयाचें, जगात सुख पाहिजे म्हणून पैसा, सत्ता, बायको, संपत्ति वगैरेंचा हव्यास व संचय करावयाचा, परलोकाची कल्पना बांधून व त्याकरतां धर्मशास्त्र, वचन, गुरु व परंपरा यांच्या आहारीं जाऊन शाश्वत सुख (eternal happiness) मिळविण्याकरतां देवताळपणा करीत सुटायचें उतारवयांत, आयुष्याची गाडी घाट उतरायला लागली म्हणजे! होय ना! विडी, बाई, बाटली वगैरे व्यसनांत झिंगणारा मानव प्राणी सुखाच्या शोधासाटीं देवाधर्माच्या व्यसनांत सांपडतो! भक्ति म्हणजे देवाचें व्यसन होय, प्रेम नव्हे. **बालिश विश्वासाच्या** (foolish belief) खातेऱ्यांत तें लोळणें होय. विशिष्ट धर्माची (a particular religion) भिंत उभारून, संप्रदायाच्या गटांतील आपल्यासारख्या अननुभवी (ignorant) गुरूचा हात आंधळ्याप्रमाणें धरून निवाऱ्याची जागा धरून बसणें म्हणजे का तुमची भक्ति? पूर्णतेचा भाव अनुभविणें (experiencing the fullness) हीच नितांत भक्ति आणि तेंच चिरंतन प्रेम. तीच विद्युल्लतेची चमक, पण वेड्यासारखी ती कुठें आणि कशी सांठवणार आहांत? आंधळे, अज्ञानी (blind and ignorant) गुरु आणि त्यांचे लंगडे (lame) लचक भरलेले लुळे (crippled) शिष्य–या जोडीचा प्रवास परमार्थाकडे का होणार आहे? त्यांना चिरंतन शांत सुखाची गोडी का कधीं चाखायला मिळणार आहे? भजनाच्या चोयट्या चघळणारे केवळ चार पाय नसलेले हे मानव प्राणी! चौपाईवरचे पशुप्रेम काय तें त्यांना ठाऊक!!

## ९–१०–४८ शनिवार सायंकाळ : टिळक स्मारक मंदीर

नीट लक्ष देऊन कसें ऐकावयाचें ( art of listening ) हें तुम्हांला माहीतच नाहीं. त्याला उत्तम बुद्धि लागते. नुसते कान उघडे ठेऊन भागत नाहीं. मन दुसरीकडे भटकत असेल तर डोळ्यापुढची वस्तु दिसत नाहीं, कानाला ऐकूं येत नाहीं. तनमनानें–सावधानतेनें एखादी गोष्ट करावी तेव्हां ती साधते व तिचा उमज पडतो. साऱ्या अवयवांचे डोळे अथवा कान करावे तेव्हांच दिसतें आणि ऐकूंहि पण येतें. ( you must be all eyes and ears ! ) याला म्हणतात नीट, सरळ व संपूर्ण लक्ष व मग वस्तुदर्शन घडतें. भिकाऱ्याची भुकेची किंकाळी ऐकूं येते का ? पक्ष्यांची किलबिल, झाडपानांची सळसळ, ओढ्याची खळखळ, रात्रींची शून्यता, रातकिड्यांचा किरकिराट ही सारी कशी ऐकायची हें तुम्हांला ठाऊक आहे का ? असतो कोठें तुम्हांला वेळ, तुमच्या धांवपळीच्या आणि गोंधळ्या जीवनांत ? प्रिय-जनांच्या आगमनाची संगमसुखाची मुक्या मनानें, मिटल्या डोळ्यानें व धडधडत्या छातीनें वाट पहात असतांना, मंद पावलाची चाहुल एकदम कान टवकारून ऐकलीत का कधीं ? त्या तसल्या चपल जागरुकतेनें ऐकावें लागतें ! तें खरें श्रवण. ऐक्यभाव झाल्याशिवाय ऐकणेंच संभवत नाहीं आणि हें असें ऐकल्याशिवाय उमज उदय पावत नाहीं. ( understanding does not arise .)

**संपत्तीशीं आपलें नातें** :—कल्पना व जवळच्या व्यक्ती-बायका-मुलें यांच्याशीं असलेले आपले नातेसंबंध आपण तपासून पाहिले व ते गरज व हाव ( need and greed ) यावर आधारले असल्याचें आपल्याला कळलें. तो खरा अनुबंधच नव्हे. मुला-माणसांवर आपलें तें निर्व्याज प्रेम नाहीं.

आतां संपत्तीशीं वास्तविक संबंध किती याची मीमांसा करूं या. जें

ध्येयकल्पनेशीं, मुलाबाळांशीं तेंच आपलें संपत्तीशीं नातें; दुसरें काय आहे ? मूलबाळ आणि कल्पना यांना आपण मिळकत समजतों व तसेंच त्यांच्याशीं वागतों—मालकी गाजवतों. माझी बायको, माझा मुलगा, माझा धर्म, माझा देश—हा सारा माझेपणाचा **माज** (arrogance) म्हणजेच मालकी मिरवणें होय. ही माजोरी सूज (swelling) उतरल्याखेरीज खरें नातें काय आहे तें समजणार नाहीं.

गरज आणि हाव—लाभ आणि लोभ यावर समाजाची रचना आहे. पण समाजाचा घटक व्यक्तीच होय. संपत्ती-वैभव म्हणजे जमीनजुमला, घरेंदारें, पैसाअडका, दागदागिने, सोनेंनाणें, इतकेंच तर नव्हे सत्ता, साधनसामुग्री, शासन संस्था (state) व स्वतंत्र देश (country), प्राथमिक गरजा भागविण्याइतकी अन्न, वस्त्र व निवारा, साऱ्या मानव जातीला पुरवण्याइतकी —साधन सामुग्री जगांत उपलब्ध आहे असें आधुनिक शास्त्रज्ञ ठामपणें सांगत आहेत. मग समाजांत व देशा-देशांत विषमता का ? श्रीमंतींत व आळसांत लोळणारे अल्पसंख्य व उपासमारीत व हालअपेष्टांत काळ कंठणारे बहुसंख्य अशी दशा कशानें झाली ? कोण आहे बरें कारणीभूत या मानवतेच्या अवदशेला ? लाखों रुपयांचीं चर्चेस, मंदिरें, मशिदी बांधावयाच्या आणि कोपऱ्यावर अन्नावांचून तळमळणाऱ्या दीन दुबळ्या बांधवांकडे लक्षदेखील जावयाचें नाहीं ! झकपक पोशाख करून मंदिरांत प्रार्थनेला जावयाचें हेंच नां तुमच्या धर्मनिष्ठेचें लक्षण ? धिःकार असो या असल्या हृदयशून्य धर्माकर्माला !

हाव, हव्यास हेंच त्या विषम विभागणीचें कारण. स्वास्थ्य पाहिजे म्हणून संचय करावयाचा. संचय हा चढाओढ व कलह करूनच होतो. संचय टिकविण्यासाठीं पोलीस, सैन्य व शासनसंस्था लागते. सत्तेच्या जोरावर हें सारें करावें लागतें व या घटनेंत लबाड, लुच्चे,

हुशार पण निर्दय अशांचीच पोळी पिकते. इतरेजन धूळ खात पडतात, हालअपेष्टा भोगतात, मरून जातात. एकस्याच्या प्रतिष्ठेसाठीं, नांवासाठीं प्रत्यहीं लाखों लोकांचे बळी पडतात. (thousands fall to deck a single name.)

वास्तविक व्यक्तीच्या प्राथमिक गरजा अगदीं थोड्या असतात— अन्न, वस्त्र, आच्छादन. पण त्या ठरवावयाच्या कोणीं ? गरज आणि हाव यांतली सीमा कोणची ? ती सीमा ओलांडली कीं हाव सुरू झाली. कांहीं नसलेल्यांना सुद्धां हाव असते. गरिबांना श्रीमंत होऊन त्यांच्या-सारखी चैन करावीशी वाटते. **तेव्हां संपत्तीच्या सम वांटणीपेक्षां आंतली मनाची हाव प्रत्येक व्यक्तींत आहे, तेंच आपलें संपत्तीशीं नातें होय. बाहेरच्या व्यावहारिक अडचणींपेक्षां आंतली मनांतली ही हव्यासाची अडचणच साऱ्या मानवी संकटांचें बीज आहे.**

मनानें जर हाव सोडली तर आपणांस किती शुद्ध आनंद होतो ? आपण गरीब कीं श्रीमंत याची आनंदाच्या वेळीं होते कां आटवण कोणाला ? ही मनाची श्रीमंती असेल तर रस्त्यावरचा भिकारी सुखसमा-धानांत लोळतो, पण तिच्या अभावीं प्रासादतुल्य घरांत राहून श्रीमंतींत लोळणारे प्राणी तळमळत असतात ! करमत नाहीं, सुचत नाहीं, रुचत नाहीं कांहीं त्यांना. जिभेला चव नाहीं, हृदयांत भाव नाहीं, केवळ शेअर्सचा भाव काय तो त्यांना माहीत असतो ! !

तेव्हां मुळांत जो रोग आहे तो हव्यास—(greed)—पळून जाऊन काय होणार या निदानापासून ? समजून घ्यायला नको कां याचें स्वरूप ? हाव कां उत्पन्न झाली याबद्दल सबबी, समर्थनें कशाला ? कशाला शब्दावडंबर (verbalization) ? हांव ही एक तळाला भोंक पड-लेली सागरांतील हेलकावणारी नाव (boat) आहे, रसातळाला नेल्या

शिवाय ती कशी बरें राहील ? हे आडपडदे फाडून टाका आणि जें सत्य आहे तें – म्हणजे–व्यक्तीला हांव सुटली आहे, हव्यासाचा कॅन्सर झाला आहे हें निदान (diagnosis) निर्मळ मनानें समजून घ्या. कबूल करा हें हावरेपणाचें मिळकतीशीं असलेलें तुमचें नातें तरच तें दूर करण्याचा मार्ग सांपडेल. योग्य नातें निर्माण करतां येईल. हव्यासाबद्दल बुद्ध, शंकराचार्य काय म्हणतात हें पाहून काय करायचें ? त्यांचा अनुभव आपणांस कसा उपयोगी पडणार ? तोहि आडपडदाच होय. सत्य व व्यक्ति यांत मध्यें कांहींहि येतां उपयोगी नाहीं.

## १०-१०-४८ रविवार सायंकाळ : टिळक स्मारक मंदिर

( The knowledge of 'I'–'me' )

**आत्मज्ञान** :— आत्मज्ञान करून घेतल्याशिवाय आपल्याला कोणतेहि प्रश्न सोडवतां येणार नाहींत. व्यक्तीनें आत्मज्ञान करून घ्यायचें व त्याला मन हें एकच साधन आहे. विविध इच्छांचें मेंडोळें म्हणजेच मानवी मन होय. या इच्छा परस्परविरोधी असतात, आणि मन भांबावून जातें. कांहीं इच्छा–वासना चांगल्या तर कांहीं वाईट. मलाच चांगली इच्छा होते व मलाच वाईट इच्छा होते. तेव्हां इच्छा होणारा हा " मी " कोण ? म्हणजे मनाचा कांहीं भाग तेजोमय आहे व कांहीं भाग काळा आहे. या तेजोमय भागाला आपण आत्मा, परमात्मा असें म्हणतों. एकदम तेजोमय होता येत नाहीं. पूर्वसंचय व पाप आडवें येतें असें म्हणून आपण अनेक जन्मांची कल्पना बांधली व कालांतरानें आत्मज्ञान होईल अशी स्वतःची समजूत केली. आपली तांत्रिक, यांत्रिक प्रगति फार मोठी झाली आहे. बैलगाडीपासून आपण विमानापर्यंत गेलों. पण आपली मानसिक प्रगति मात्र त्या मानानें कांहींच झाली नाहीं. त्या बाबतींत आपण फारच खुजे राहिलों आहोत. पशूप्रमाणें आपण अद्याप कलह करतों–लढाया करून संहार करतों, शांततेनें

सुखासमाधानानें आपल्याला राहतां येत नाहीं. बीजाचा वृक्ष, त्याला फुलें, फळे लटकण्यास वेळ लागतो ही वाढ होय. व्यक्तीला उत्क्रान्त व्हावयाचें आहे व त्याला अनेक जन्म पाहिजेत, कालमर्यादा पाहिजे. तें एकदम करतां येणार नाहीं असें शास्त्रें व परंपरा सांगत आलीं आहेत.

एखादी गोष्ट उत्कृष्ट करण्याकरतां तज्ज्ञ व्हावें लागतें. शाखानिष्णात ( specialist ) बनावें लागतें तेव्हांच तें साधतें. पण या संकुचित वाढीनें व्यापकता नष्ट होते. चैतन्य पूर्ण व्हावयाचें, तेजोमय बनावयाचें म्हणजे व्यापक, अमर्याद व कालातीत असें व्हावयाचें. त्याकरतां जर पूजा, भक्ति, उपासना, मंत्र म्हणणें वगैरे संकुचित व आकुंचित प्रकार आपण करीत राहिलों तर व्यापकपणा व सत्य व चैतन्य आपल्याला कधींहि मिळणार नाहीं व आत्मज्ञान होणार नाहीं. विशाल होण्याकरतां मनहि पण विशाल केलें पाहिजे. जें आज तुम्हीं करीत नाहीं तें केव्हांच लाभणार नाहीं. उन्नति ही क्षणाक्षणाला साधावयाची असते. प्रखर बुद्धिमत्ता पाहिजे. जड मनानें केलेली प्रत्येक गोष्ट जडच होते. जड मनाचा देवहि पण जडच. तीच तीच गोष्ट केल्यानें मन जड होतें. तेव्हां हा संकुचितपणा सोडून एकाच शाखेचे तज्ज्ञ न होतां, त्या मार्गे न धावतां, अनेक जन्मांची वाट न पाहतां हरएक इच्छा मनांत जसजशी संभवेल, तशी तशी ती नीट निरखून पहा, काळजीपूर्वक तपासा— आणि तिचें समर्थन करूं नका—टाळूं नका—नामबद्ध करूं नका म्हणजे ती इच्छाच विरून जाईल. मनाचा व्यापार थांबेल. मन शांत, जागरूक व चपल होईल व त्या तसल्या स्थितीचा अनुभव घेत असतांना ( while experiencing ) तुम्ही कालातीत होऊन तुम्हांस सत्याचा साक्षात्कार होईल, व क्षणाक्षणाला नित्य नवा असा आनंद होत राहील. त्याला कशाला युगानुयुगें वाट पहात रहावयाचें! आजच

या क्षणीं अगर आत्मज्ञान मग केव्हांहि नाहीं. हा स्वानुभव, याला, गुरूचा उपयोग नाहीं. तेव्हां हा अनुभव प्रत्यक्ष घेणें म्हणजेच आत्मज्ञान होणें होय. आणि आत्मज्ञान झालें कीं सारे प्रश्न आपले आपण सोडवूं शकतों. अहो, आपला उद्धार दुसरे कोण बरें करूं शकेल? आत्मज्ञान व आत्मोद्धार ही एकच वस्तु आहे. एकाच नाण्याच्या त्या दोन बाजू आहेत. तेव्हां हें स्वतःचें नाणें खणखणीत वाजवून घेतलें पाहिजे. व तोच व्यक्तीचा आंतला आवाज अंतर्मनालाच उमजतो— मन प्रशांत असेल तरच समजतो.

प्रश्न—( १ ) पूर्ण लक्ष देणें म्हणजे काय व कसें?

( २ ) विचार तडीला पोंचविणें म्हणजे काय?

( ३ ) आपण आश्रम कां नाहीं काढीत?

( ४ ) आधुनिक मानव त्याची कां बरें ही दशा?

( ५ ) ध्यान म्हणजे काय? नाक धरून बसणें कां?

उत्तरें:—( १ ) लक्ष देऊन उपयोगी नाहीं, लक्ष लागलें पाहिजे. असें मन डांबून ठेवून कां कुठें लक्ष लागत असतें? मन जिंकावें तेव्हां लक्ष लागतें. मनाच्या साऱ्या इच्छा समजून घेतल्या तरच मन स्वाधीन होतें. अनेक इच्छांपैकीं एकाच इच्छेकडे लक्ष द्यायला गेलें तर राहिलेल्या इच्छा मन आपल्याकडे ओढून घेतात, व मनाची ओढाताण होते; व मन लक्ष्यापासून च्युत होतें—भ्रमतें, घोटाळ्यांत पडतें; लक्ष लागत नाहीं. तें असतें त्याचेपुढें असलेल्या गोष्टींकडे. इतर व्यावृत्तींची वाट लावली, समजुत घालून त्या परत लावल्या, त्यांची बोळवण केली कीं मग जें कांहीं राहतें तें संपूर्ण लक्षच. आणि असें झालें तरच बोध होतो, शोध लागतो.

( २ ) विचार तडीला पोंचविणें म्हणजे काय करणें? त्याच्यापासून पळून न जाणें, त्याची टाळाटाळ न करणें, त्याचा ना स्वीकार, ना

धि:कार, पण पूर्ण तपासणी. त्या विशिष्ट विकाराच्या अथवा विचाराच्या प्रतिस्पर्धी म्हणून समजल्या जाणाऱ्या एखाद्या ध्येयाचा आश्रय न करणें. कारण ध्येयें हीं नेहमींच काल्पनिक असतात. त्यांना वास्तवता (reality) नसते. तुमच्याजवळ हिंसा असेल तर अहिंसेकडे न धांवणें. आणि उद्भवलेल्या विकाराला थारा न देतां, मनाच्या व्यापारांत त्याला न लोटतां त्या विकार–विचारांचा जीवनांत भांडवल म्हणून उपयोग न करतां, त्याचा संचय न करतां, जर व्यक्ति शांत–स्थिर राहिली तर विकार–विचार विरघळून जातात. त्यांचा मागमूस रहात नाहीं मागें !

( ३ ) आश्रम का नाहीं काढीत? सत्यशोधनाचे कष्ट, मला तुम्हांला प्रत्येकाला करावयास लावावयाचे आहेत म्हणून आणि मला कुणाचे गुरु बनायचें नाहीं म्हणून. मी कुणाचा गुरु नाहीं, माझा कुणी चेला नाहीं. आश्रमाचे जुने ढंग रंगवण्याची माझी इच्छा नाहीं. अनुयायीच हीं गुरूंचीं खुळें तयार करीत असतात. हा खुळखुळा वाजविला म्हणून कांहीं सत्याचें संगीत कानीं पडणार नाहीं तुमच्या ! सत्याची रागदारी स्वमुखानें बाहेर काढावी लागते तेव्हांच गायनाचा निर्मळ आनंद मिळतो. अहो, लोकांचीं, गुरूंचीं, वस्तादांचीं गाणीं ऐकून आणखी किती दिवस जगणार ?

( ४ ) आधुनिक मानव आपल्या हृदयापासून विभक्त झाला आहे. ज्या वेळीं तो स्वतःशीं एकरूप होईल, आत्मज्ञान मिळवील तेव्हांच त्याला शांतता लाभेल. विमानाच्या प्रवासानें नव्हे, तर मनाच्या मोठे-पणानें हें घडेल.

( ५ ) ध्यान म्हणजे एकाग्रता नव्हे. मनाची निर्मळ व सहज अवस्था त्याला आपण ध्यान असें म्हणतों. त्याला ' धी '–प्रखर बुद्धी–लागते. अंध विश्वास ध्यानाला मारक आहे. रित्या मनाला ध्यान घडतें. भरलेल्या

घड्यांत नवजीवन ओततां येत नाहीं. प्रार्थना म्हणजे ध्यान कसें हो म्हणतां? ती निव्वळ भीक! 'धांवा, पावा' काय आहे तें? देवापुढें बसून, डोळे मिटून, डोळ्याला पाणी आणून, अगदीं सोंवळ्यानें मागितली तरी याचना ती याचनाच. प्रार्थना ही भिकेची हुंडी होय; ती केव्हांही शिगेला जात नाहीं. "धी" चें यान—श्रेष्ठ बुद्धीमत्तेचा पूर्ण आविष्कार म्हणजे ध्यान; तें गमन आहे. बैठक नव्हे. नाक धरून बसून प्राणायाम करून—ध्यानाचा आव आणून, उगीच कशाला स्वतःला ठकवावयाचें? असल्या ध्यानानें का देव सांपडणार आहे तुम्हांला? पण तुमच्या या ध्यान, देव, पूजा, गुरू वगैरेंच्या वेडावर उतारा नाहीं इतकेंच खरें, आणि म्हणून इतकीं सोंगें ढोंगें करूनहि तुम्हांला पैलपार होतां येत नाहीं!

## ता. ११-१०-४८ सोमवार सकाळीं ८ ते १० : भारत सेवक समाज

**प्रेमः**—प्रेम हें काय आहे? नातें आहे पण ना तें वाहे. हेंहि नाहीं आणि तेंहि पण नाहीं. विकार म्हणजे प्रेम नव्हे. आणि विचार म्हणजेहि पण प्रेम नव्हे. प्रेम काय आहे हें ठरविण्यापेक्षां प्रेम काय नाहीं तें आपण पाहूं या. रचनाविहीन पद्धतीनें (passive approach) आपण गेलों तर जें कांहीं उरेल तें प्रेम. त्याला नांव दिलें नाहीं तरी कांहीं बिघडत नाहीं. कारण तें आहेच. सत्य वस्तु आहे. विकाराला नांव दिलें तरच सारें कांहीं बिघडतें, मग तो मनाचा व्यापार होतो. नामकरण कालकक्षेतील आहे आणि प्रेम हें चिरंतन, व्यापक व कालातीत असें सत्य आहे.

विकार आणि विचार (feeling and thought) यांचें मूळ एकच म्हणजे इंद्रियस्पंदन (sensation). विकारावांचून विचार नसतो. नुसता विकार असूं शकेल; पण त्याला स्मृतीच्या साह्यानें

जर विचारक्षेत्रांत थारा दिला नाहीं तर तो विकार मावळतो, विचार-क्रिया (process of thought) बंद पडते. मनाचा सारा व्यापार स्थगित होतो.

ज्याला आपण प्रेम म्हणतों तें प्रेम कसें नाहीं तें आपण पाहूं या. नवराबायकोंत मुळीं खरें नातेंच नसतें–गरज आणि हव्यास (need and greed) यांच्या थैमानानें नामधारी नवराबायको बेजार झालेले असतात, संसार–यात्रेला कंटाळलेले असतात. तें दांपत्य बेचैन असतें, सुखी नसतें. अशा अवस्थेंत कसें येणार प्रेम ? तीच स्थिति मुलाबाळांची–त्याचें आपलेंहि नातें शुद्ध नाहीं हें आपण पूर्वीं समजून घेतलें. तेव्हां तिथेंहि प्रेम नाहीं. भिकाऱ्याला दाखविलेल्या सहानुभूतीला (sympathy) आपण प्रेम समजत नाहीं. तें एक स्वतःचें मानसिक समाधान होय.

भक्ति ही एक वेडगळ आसक्ति आहे. कुत्र्यावर असलेल्या आसक्तीपलीकडे त्याला अधिक अर्थ नाहीं. कसलें आलें आहे दगडी मूर्तिवर, चित्रावर वा कल्पनेवर प्रेम ?

गुरूची सांवली केवळ स्वास्थ्यासाठीं हवी. स्वतः कष्ट करावयास नकोत, पण बिन कष्टानें गुरूवर अवलंबून सत्य भेटत नसतें. गुरूजवळ कांहीं मुक्तीचें गांठोडें नाहीं! एखाद्याला क्षमा ( forgiveness ) करणें म्हणजे कांहीं प्रेम करणें नव्हे. लोकांनीं केलेला अपमान विसरावयाचा आणि त्याला क्षमा म्हणायचें. हा विसरभोळेपणा प्रेम नव्हे! अपमान न करण्याइतके तुम्हीं मनाचे श्रीमंत नसतां, आणि अपमान झाल्यावर त्याची आठवण जतन करण्याची तुम्हांला बुद्धि ( intelligence ) नसते, म्हणून तुम्हांला क्षमाशीलत्वाचा मोठेपणा मिरवावासा वाटतो–तेव्हां क्षमा, दया, औदार्य–सारे सद्गुण जरी मिळवले तरी 'प्रेमा' सारखें सर्वांगसुंदर व संपूर्ण समाधान देणारें तत्त्व प्राप्त होत नसतें.

मग प्रेमाचा बनाव होतो कुठें ? कुठल्या भट्टींत, कुठल्या कारखान्यांत ?'

विचारविहीन मन शांत झालें, निष्क्रियतेला ( passivity ) पोंचलें, जागरूकतेनें सावध राहिलें कीं, त्या तसल्या कालातीत अवस्थेंत ( timelessness ) व्यक्ति क्षणोक्षणीं आनंदाचा अनुभव घेत असते. ( experiencing ) आणि त्या संपूर्ण जाणिवेलाच प्रेम, सत्य-साक्षात्कार असें म्हणतात.

दोन जीव, दोन सुराप्रमाणें विसंवादित्व टाकून, दुजाभाव सोडून ज्या क्षणीं समरस होतात तोच नितांत प्रेमाचा क्षण ! उभ्या आयुष्यांत असला एक क्षण अनुभवितां आला तरी पुरे.

प्रशान्त मन अनिश्चित (uncertain) असतें. त्यावर कुठल्याहि बाजूनें आघात होऊं शकतो. त्या अनिश्चयाच्या लाटेवर हेलकावे खात असतांनाच सत्याचा वारा सुटतो व त्याचा स्पर्श होतांच प्रेमाची भावना उदय पावत असते. आणि या प्रेमचंद्राचा उदय झाला कीं कोणच्या मानवी हृदयाला भरतें येणार नाहीं ? कोणाचें सर्वांग सुखानें थरारणार नाहीं ?

## ता. १२-१०-४८ मंगळवार सायंकाळ
## विजयादशमी—दसरा

**स्थित्यंतर** :—आपला जविनक्रम आपण बदलीत कां नाहीं याची कारणें शोधूं या. जीवनक्रम म्हणजे इतरांशीं येणारा आपला संबंध. आपण दुःखी आहोंत. सगळीकडे दुःख पसरलें आहे, मग आपण सुखी कसे ? या परिस्थितीशीं आपण कां झगडत नाहीं ? मनाच्या संवयी मोडल्या पाहिजेत. संवय (habit) हेंच साऱ्या गोष्टींचें कारण आहे. सिनेमा पाहण्याची संवय कां लागते ? अनुकरण, कांहीं काळ करमणूक, रिकामपणा घालविण्याचें एक साधन, स्वतःचें दुःख विसरण्याचा एक मार्ग—म्हणून आपण अनेक संवयी लावून घेतों. त्यांपैकींच

सिनेमाला जाण्याची संवय होय. माणूस एक वेळ इन्कम टॅक्स चुकवील— पण सिनेमाचें नवें चित्र नाहीं चुकविणार! साऱ्या संवयींचें हें असेंच आहे. देवपूजा, मंत्र, समाजसेवा, राजकीय पक्ष स्थापणें, क्लबांत जाणें, नित्य नेमानें पत्ते कुटणें, विड्या ओढणें, आणि अपेय पानांत दंग होणें या साऱ्या संवयी आपणच जडवून घेतल्या आहेत. व या सर्वांचें कारण आपण 'स्वतः'पासून पराङ्मुख (escape) होणेंच. त्याच त्याच गोष्टी करून आपलीं मनें आपण भारावून टाकलीं आहेत. तीं जड, सुस्त झालीं आहेत. बुद्धीच काम करीनाशी झाली आहे. मानसिक कष्ट, स्वतंत्र विचारच आपण करीत नाहीं. लोकांच्या विचारावरच आपण जगत असतों. माणसें यंत्रें झालीं आहेत. केवळ दुसऱ्यांच्या उसन्या विचारांचें पेट्रोल भरून आपल्या आयुष्याची मोटारगाडी संवयी संवयीच्या रस्त्यानें धुमधडक चालली आहे आणि म्हणूनच या गर्दीच्या रस्त्यावर एकसारखे प्रत्यहीं अपघात होत आहेत!!

तेव्हां संवय जर मोडावयाची असेल तर तिचें कारण आपलें आपण शोधिलें पाहिजे. एक रोग दूर करण्याकरतां तोडगा म्हणून आपण संवयीचा नवा रोग जडवीत असतों. देव देव करीत सुटणें, पोथ्यापुराणें वाचणें, यात्रा करणें याहि परंपरागत संवयी आहेत. या सर्वांचें कारण आपलीं हृदयें रिकामीं आहेत व रिकामा घडा आपण अनेक प्रकारच्या संवयींनीं व नसते उद्योग स्वतःच्या मागें लावून घेऊन भरीत असतों. पण तो कधींच भरत नाहीं. समाधान कधीं मिळत नाहीं. संवयींचें रहाटगाडगें सारखें सुरूच रहातें व तीच तीच गोष्ट आपण करतों. आपण दुःख भोगतों. तेव्हां भय टाकून, स्वतःपासून च्युत न होतां संवयी सोडण्याचा जबर प्रयत्न न करतां मोकळ्या मनानें जर आपण विचार करूं लागलों तर आपल्या हृदयांतच प्रत्येक संवयीचा उगम आपल्याला सांपडेल. या उगमाकडे जायला निघणें म्हणजे संवय

सुटण्याची सुरुवात होय. आपण नुसते शब्दाशब्दावर भर देऊन वागत असतों. स्वतःच्या कृतीचा अर्थ—अनर्थच तो-आपण कधीं नीट लावीत नाहीं. खाणें, पिणें, चैन करणें—बस हाच आपला कार्यक्रम. एखाद्याची ही चैन बौद्धिक असेल इतकेंच. हा नादीपणाच आपणांस भोंवतों आहे. कुणाला राजकारणाचा नाद, तर कुणाला दारूचा नाद, तर कुणाला भजनाचा! एवंच काय? सारा नादीपणा व नादानपणा भरला आहे. स्वतःमध्यें आणि स्वतःभोंवतीं आणि आपले सारे नाद राखून—धन संचयाचा देखील—आपण अनादि परमेश्वराला शोधायला निघालों आहोंत! कोण हा अडाणीपणा! तेव्हां खराखुरा सुजाणपणा उत्पन्न करण्यासाठीं पहिलें पाऊल आपलें आपणच टाकलें पाहिजे. मन शांत करून, आहे त्या वस्तुस्थितीकडे आपण नीट निरखून पाहिलें पाहिजे. ती वस्तुस्थिति तपासली पाहिजे व हें करीत असतांनाच आपाआप जुन्या संवयीला खंड पडतो व संवयीचें कारण आपलें आपल्याला सांपडल्याबरोबर ती संवय सोडण्याकरतां निराळें कांहीं करावें लागत नाहीं—तो नाद आपोआप गळून पडतो. प्रत्येक विचाराची अशी परीक्षा करून आपण त्यांना वाटेला लावलें तर ते आपोआप जातात; मनाची ओढाताण करायला ते परत येत नाहींत. दडपले तरच ते उठाव घेतात, नाहीं तर नाहीं. तेव्हां मोकळ्या मनानें विकार—विचार थांबल्यावर जी प्रशांत व अनिश्चयात्मक—सहज अवस्था उद्भवते त्या स्थितींत विलक्षण जागरूकतेनें जाणीव उदयाला येते, व या संपूर्ण जाणीवेंतच सत्याचा नवोनव साक्षात्कार भरलेला प्रत्ययास येतो. शुद्ध आचार अशाच अवस्थेंत संभवतो. हा सहजाचार होय व यांतूनच खऱ्या आनंदाचे पाझर फुटतात, हृदयाला दयेची पालवी फुटते, जीवन फलद्रुप होतें.

## ता १३-१०-४८ बुधवार सकाळीं ८-३० ते १०
## भारत सेवक समाज.

जी वस्तुस्थिति आहे त्याप्रमाणें बोलणें, चालणें व वागणें हा सज्जनांचा सरळ मार्ग होय, व त्यालाच सच्चेपणा, सचोटी, प्रामाणिकपणा असें आपण म्हणतों. रचनाविहीन मार्गानें जाऊन प्रामाणिकपणा काय नाहीं तें आपण पाहूं. आपण स्वतःशीं तरी प्रामाणिक असतों का? नसल्यास कां बरें नसतों? लोकांना फसवायचें हें समजतें, कारण त्यांत आत्महिताची दृष्टि असते; पण ही आत्मवंचना (self deception) मनुष्य कां करतो?

आपण या आत्मवंचनेचें परीक्षण करूं या. जीवन म्हणजे कृती—आचार. निष्क्रियता हेंच मरण; कारण मग कसलीच हालचाल नाहीं. प्रथम कार्याची आतुरता—त्वरित कार्य साधण्याची इच्छा उत्पन्न होते. आपल्याला अगदीं घाई झालेली असते. इच्छा झाली कीं, ती पुरी करून घ्यावयास मनुष्य उत्सुक झालेला असतो-उतावळा होतो, कारण त्याला उत्कर्षानें सुख हवें असतें. उत्कट सुखलालसा असते. दुःख कुणाला पाहिजे?

या आतुरतेच्या तुरुतदानाच्या पोटीं कसोशीनें मेहनत करण्याची क्रिया अमलांत येते. कोणत्याहि क्लेशाकडे माणूस पहात नाहीं. जिवाचें रान करून, प्रयत्नांची कोशिस करून, कर्तव्याची कमाल करून प्रत्येकजण आपली आकांक्षा पूर्ण करण्याची धडपड करीत असतो व असल्या नेकीनें काम करणाऱ्यांना (sincere people) आपण सच्चे अगर प्रामाणिक हें नांव.देतों. पण बरोबर आहे का तें? मूर्ख मनुष्यसुद्धां कोशीस करतो. तेव्हां केवळ कसोशीनें काम करणें म्हणजे प्रामाणिकपणा नव्हे. ढोर मेहनतींत कसलें आलें आहे मान अगर प्रमाण

श्रद्धेच्या जाळ्यांत अडकलेली व्यक्ति ध्येयांच्या मागें धांवते, कोणत्या तरी पद्धतीला ( pattern of action ), नियमाला ( norm ) परंपरेला (tradition) तिचें मन जखडलेलें असतें. स्वतःचें सुखसमाधान ( self gratification ) साधण्याकरतां आपण ध्येयें ( ideas ), वस्तु ( things ) व माणसें ( persons ) यांच्याशीं नातें जोडतों व त्यांचा उपयोग करतों. इतरांची पिळवणूक ( exploitation ) स्वार्थासाठीं होते. देवभक्ति काय किंवा श्वानप्रीति काय दोन्ही प्रकार सारखेच मूर्खपणाचे आहेत ( God and dog ). कांहींतरी साधावयचें हीच गोष्ट मुळीं गौण—त्याज्य. व्यक्ति मूढपणानें नादी लागून मनोवांञ्छित सफलतेसाठीं हवे ते उपाय योजते. तेव्हां कुठल्यातरी कल्पनेमागें धांवणें आणि नियमांत स्वतःला बांधून घेणें हें कांहीं मानवी बुद्धिमत्तेचें द्योतक नव्हे—स्वतंत्रतेचें तर नाहींच नाहीं. हें अज्ञात बाह्यध्येयाचें, अंधानुकरणाचें, वेड्या विश्वासाचें आणि सुस्त, जड व मंदावलेल्या श्रद्धेचें प्रदर्शन होय. या खटाटोपांत वस्तुदर्शन नाहीं. सत्याचा बोध होत नाहीं—वास्तवतेची वा सौख्याची प्राप्ति होत नाहीं. जीवाची सारखी ओढाताण चाललेली असते. ध्येय गांठतां आलें नाहीं तर निराशा आणि वैफल्य पदरीं पडतें.

तेव्हां ही महत्त्वाकांक्षा सोडली, स्वास्थ बाजूला केलें, इतरांचा स्वतःच्या सुखासाठीं उपयोग केला नाहीं (use or exploitation), त्यांना युक्तिप्रयुक्तीनें चिरडलें नाहीं, श्रद्धा अगर शब्द यांना बांधलेले, आचार-विचारांचे दोरखंड तोडून टाकले तर मग केवळ आतुरता उरेल. (Bettering of the mind is a cult) मनापुढें जर ध्येय नाहीं, धडपड नाहीं, अंधश्रद्धा नाहीं तर मग फक्त शुद्धाचरणच होणार. सारें रण संपलें, मनाचा व्यापार नष्ट झाला, आणि उत्सुकता अथवा आतुरता

तेवढी राहिली कीं, आत्मवंचना संपली आणि या सर्व क्रियांची—म्हणजे आतुरता, कसोशी, श्रद्धा व साध्य यांची संपूर्ण जाणीव मनाला झाली व हीं सर्व फोल आहेत हें समजलें कीं, तोच प्रामाणिकपणा आणि तीच बुद्धिमत्ता. प्रामाणिकपणा म्हणजेच बुद्धिमत्ता. दुसरें तिसरें कांहीं एक नाहीं. व्यक्ति मूर्ख, मंद व जड असते म्हणून अंधश्रद्धेच्या आहारीं जाऊन अनिवार क्लेश भोगून, ध्येयामागें धावपळ करून, आत्मवंचना करीत असते. हें सारें सुटलें कीं, सहजाचरण जाईजुईच्या सुवासाप्रमाणें बाहेर पडत असतें. जाणारा–येणारांना त्याचा सुवास लुटता येतो. त्या फुलाला काय त्याची पर्वा अगर काळजी ? वाऱ्यावर वाहत जाणाऱ्या सुवासावर फुलें मालकी का सांगत बसतात ! या मालमत्तेच्या कल्पनेंत व हव्यासांतच दुनियेचे सारे हाल भरून राहिले आहेत. धंद्यांतील कसब म्हणजे कांहीं बुद्धिमत्ता नव्हे. पैशाचा मुलामा लबाडीवर चढविला म्हणून काय बुद्धिवैभवाची चमक कां त्यांत दिसणार आहे ? निर्मळ मनाचें आचरण तोच सच्चेपणा. त्यालाच प्रखर बुद्धिमत्ता लागते. सहजाचरणाच्या मधुर आम्रफलाचे प्रामाणिकपणा आणि बुद्धिमत्ता हे जणूं एकमेकांत मिसळलेले केशरी आणि लाल रंग आहेत ! या सहजतेनें, आतुरतेनें जीव रंगून निघाला कीं, मग कुठला आपपरभाव ! मग विश्वबंधुत्वाच्या पुरस्कारासाठीं संस्था काढाव्या लागत नाहींत. बंधुभावनेची आस्था तुमच्या रोमरोमांतून गळत असते. पक्व फळांतून रस गळायला लागला कीं, तो चाखायला पक्ष्यांना आमंत्रण कां द्यावें लागतें ! ते आपोआप गोळा होतात. जें आपोआप घडतें त्यांतच नाहीं का पूर्णता ? आणि पूर्णतेंतच परमेश्वर भरला आहे. ती पूर्णता प्रत्येक व्यक्तीच्या हृदयांत आहे. कुणाच्याहि कसल्याहि शब्दांत नाहीं. शब्दाशिवाय नाहीं कां विचार करतां येणार ? आणि विचार तरी कशाला हवा ? निर्विकार निर्विचार झाल्याशिवाय सुख तरी कसें येर मिळेल ?

इरसाल मूर्खपणांतच ( in supreme stupidity ) आत्मवंचना भरून राहिली आहे. उलटपक्षीं निर्भेळ आतुरतेंत भोंवऱ्याची गरगर, गोलत्व ( roundity ) व जलधारांची त्वरा आहे. तेथें ध्येय साधनें तिची धडपड व मार्गाची निश्चिति नाहीं. विश्वास, वचनांची व आप्तवाक्यांची गळचेपी नाहीं, आंधळ्या श्रद्धेचा आधार नाहीं, स्वतः-च्या सुखासमाधानाकरतां कुणाचीहि पिळणूक नाहीं, घाण्याला जुंपलेल्या व डोळ्यांना ढापणें बांधलेल्या बैलांची कोशीस व क्लेश भोगणें नाहीं—मग आहे तरी काय त्या उत्सुकतेंत? कां कांहींच नाहीं? असें कसें होईल बरें! आतुरता म्हणजेच कृति, सहज आचरण, चरण—चाल. जलपूर्ण मेघांचाच जणूं तो वर्षाव—पृथ्वीतलावर गारवा, गारीगार व शांततेचें साम्राज्य, सौख्याची समृद्धि, सौंदर्याची खैरात, मुक्तीचें माहेरघर. मन असल्या चपल व जागरूक अवस्थेंत गेलें कीं रचनात्मक जाणीव ( creative understanding ) उदयाला येतें. तीच प्रामाणिकपणाची, सौजन्याची, बुद्धिवैभवाच्या पूर्णचंद्राची मनोमय नभोमंडलांतील उगवत होय. या उगवत—मावळतीचा खेळ रोज चालला आहे. डोळ्यांचे कान करून ती चाहूल ऐका. कानांचे डोळे करून या नवसत्याचें नवदर्शन क्षणोक्षणीं घेत रहा. तरच जिवाचा पांग फिटेल आणि तो तुमचा " देव " भेटेल. सत्य, वास्तवता, वस्तुजात जें कांहीं आहे तें—यालाच ना तुम्ही देव म्हणतां ?

## ता. १४-१०-४८ गुरुवार सांयकाळ ६ ते ८

## टिळक स्मारक मंदिर

## संवय सोडणें व समूळ स्थित्यंतर

संवयी मोडतां येतात व तें तावडतोब घडतें हें आपण पाहिलें. विडीच्या व्यसनाचें मूळ कारण शोधलें तर तें तात्काळ सुटतें. तोच प्रकार रागाचा. राग तातडीनें मावळतो. मनालाच साऱ्या संवयी लागलेल्या असतात. व्यक्तिचा बहुतेक व्यवहार, शारीरिक व मानसिक हालचाली हा संवयींचाच परिणाम आहे. संवय म्हणजे विचार न करतां घडणारी गोष्ट, विचारांचा अभाव. आणि म्हणूनच जाणूनबुजून अविचारी कृत्यें आपल्या हातून घडतात. स्वतःचा नाइलाज होतो. तेव्हां या संवयींच्या गुलामगिरींतून सुटून आपल्याला पायाशुद्ध आचरण करावयाचें आहे, तेव्हांच आपल्याला सुख मिळेल. म्हणून संवयी मोडल्या पाहिजेत. आणि संवयी नाहींशा झाल्या कीं, सहजगतीनें आपणां स्वतः-मध्यें समूळ स्थित्यंतर घडवून आणतां येईल. आणि या नव्या जगांत, नव्या जीवनांत अभिनव संस्कृति निर्माण होईल. शांतता प्रस्थापनेचा हाच मार्ग होय. कलह, लढे, वर्ग व वर्णद्वेष, अर्थशोषण इत्यादि धगधगीत अंगारानें मानवी जीविताची, वित्ताची व मालमत्तेची आपण अविचारानेंच राखरांगोळी करावला उद्युक्त झालों आहोंत.

राष्ट्रीयत्व, संकुचितपणा म्हणजेच परस्परांचा द्वेष, नंतर त्वेष. सेनासंभार आणि मग संहार. हाच प्रकार समाजांत चालला आहे. विकृत संवयींमुळेंच सारीं दुःखें निर्माण होत आहेत.

ब्राह्मण म्हणवून घेण्याची संवय आपण कां सोडीत नाहीं? आहांत कां आपण ब्राह्मण? खरे ब्राह्मण इतरांच्या डोळ्यांत खुपणार नाहींत. सगळ्याप्रमाणें जर आपण पैशाच्या मागें व सुखाच्या मागें लागलों आहोंत तर आपण वेगळे कसें? केवळ ज्ञानसंपादन, ज्ञानदान, अधि-

कार निःस्पृह राहून व संतोषी बनून करणारे वर्णगुरू आज क्वचित्च दिसतात. तेवढेच काय ते ब्राह्मण. इतर केवळ नांवाचे! तेव्हां बहुतेकांनीं ही ब्राह्मण्याची समाजाच्या डोळ्यांत सलणारी खूण आपण होऊन काढून टाकावी. त्यांतच शहाणपणा आहे. परिस्थितीनें तसें करावयास लावल्यावर आपल्या खोट्या ब्राह्मणत्वाला-अहंकाराला प्राण सोडण्याची पाळी आली—तर आपले हाल कुत्रा खाणार नाहीं. जातिभेद सोडायला थोडीशी बुद्धि वापरली तरी पण वेड्यासारखे—मूर्खासारखे वागून जर सत्यानाशच करून घ्यायचा असेल तर या संवयीनें आपल्याला गिळलेलें आहेच.

सर्वांना सौख्य—समाधान देणारी कृति ती संस्कृति. इतर सारें आचरण दांभिकपणाचें होय. ब्राह्मण्याच्या नांवावर आजवर कांहीं सामाजिक व आर्थिक फायदे आपणांस मिळाले व या आपमतलबी-पणाच्या विषारी संवयीनें आपण इतरांना तुच्छ लेखून त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेतला ही गोष्ट सत्य नाहीं का? ही असली हिडिस घटना तावडतोब मोडा, स्वतःचा संभ्रमित मोठेपणा विसरा, प्रेमानें इतरांशीं मिळूनमिसळून वागत जा. वाडवडिलांचीं श्राद्धें करून त्यांना तिलांजली देण्याऐवजीं या जातिभेदाच्या संवयीचे श्राद्ध उरकून तिला अखेरची तिलांजली द्या! आणि मग बघा काय चमत्कार घडतो तो. अहो, प्रेम केलें तर पशूदेखील वश होतात; मग जिवंत भावनांनीं रसरसलेली माणसें प्रेमाच्या किमयेनें जवळ नाहीं कां येणार तुमच्या?

तेव्हां विचार केला तर ही गोष्ट सहज घडवून आणतां येईल. त्याला रक्तरंजित क्रान्ति नको कारण त्यांतूनच सत्तापिपासूंची जात निर्माण होते आणि तेहि पुन्हां उच्चनीचतेचा आत्मघातकी खेळ पुन्हां चालू ठेवतात.

ही मनाची संवय मोडण्याकरतां ती नीट निरखून पाहिली पाहिजे व तेवढ्याकरितां—

मन निर्मळ पूर्वग्रहवर्जित ( unconditioned ) झालें कीं सुस्त-पणा जाईल. आणि संवय कां लागली याचा शोध लागेल. त्या संवयीचा संचय करण्याचें टाळलें, स्वीकार अथवा धिःकार केला नाहीं, ती संवय दडपली नाहीं, त्याच्या विरोधी कल्पनेकडे गेलें नाहीं, नामबद्ध केलें नाहीं कीं ती संवय तावडतोब गळून पडेल! आणि मग समाजा-समाजांतील व्यक्तिप्रेमानें एकमेकांच्या गळ्यांत गळे घालतील, परस्पराचे गळे कापणार नाहींत!! भेदभावांच्या भिंती कोसळून पडतील, आर्थिक विषमता नाहींशी होईल व सर्वांनाच प्राथमिक जीवनसाधनांची वाण पडणार नाहीं. इतरांना पिळण्याची मदांध वणिग्वृत्ति वत्ती लागून खाक होऊन जाईल आणि असें समूळ स्थित्यंतर ( radical transfor-mation ) संवय मोडल्यानें तावडतोब घडून येईल.

उदार, रिकाम्या आणि निर्मळ मनांतच नवसंस्कृतीचा सुधारस ओततां येईल. संवयीनें भरलेल्या, भारावलेल्या आणि मंदावलेल्या मनांत नव्हे.

## ता. १५-१०-४८ शुक्रवार सकाळ ८ ते १० : भारत सेवक समाज

## कालाचा प्रश्न :—अनुक्रमक व मानसिक काल.

आपण कशाला काल म्हणतों? काल-आज-उद्यां ही त्याची प्रमुख कल्पना. भूत–वर्तमान–भविष्य हे त्याचे भेद, अभाव, भाव व न-भाव, जन्म, मरण. आधीं कांहीं ज्ञात नाहीं आणि नंतरचेंहि पण ज्ञान नाहीं. मव्हतें, झालें आणि पुन्हां नाहींसें झालें. हें वस्तुमात्राच्या मागें लागलेलें रहाटगाडग्याचें चक्र याचा माग आपण काढूं या व या कालबंधनाच्या पलीकडे जातां येण्यासारखें आहे कां याचा विचार करूं. कारण कालाच्या पलीकडे जाणें म्हणजे मरणावर मात करणें, मानवी दुःखाचा अंत करणें, अंतःकरण संपूर्ण शांततेप्रत नेणें व चिरंतन सौख्य भोगणें होय. यालाच मानव मुक्ति, निर्वाण, अढळपद, चिरंतनत्व अशीं नांवें देत असतो.

तास, दिवस, महिने, वर्षें, शतकें, युगें—असे सोयीसाठीं व व्यवहार चालूं ठेवण्यासाठीं, संस्कृतीची जोपासना करण्यासाठीं, आत्मोद्धार साधण्यासाठीं व तसेंच परोपकाराचे पर्वत उभारण्यासाठीं आपण कालाचे विभाग पाडीत असतों. याला अनुक्रमक काल (chronological time) म्हणतात. तो उघड आणि जरूर आहे. बीजाचा वृक्ष, मुलाचा माणूस, फुलाचें फळ तयार होण्याकरतां हा अनुक्रमक काल आवश्यक आहे. त्यावाचून कुणालाच गती नाहीं. सारी तांत्रिक सुधारणा या गतीनेंच होत आहे. बैलगाडीपासून विमानाचा टप्पा कालमर्यादेंत अथवा मर्यादित कालांतच झाला. चित्रकार, गवई, डॉक्टर वगैरे स्पेशॅलिस्ट होण्यास काल लागतोच.

पण या अनुक्रमक कालापलीकडे वेगळा असा काल आहे का? असल्यास तो कोणता? त्याबद्दल काय आहे आपली कल्पना? तो मानवी मनानें निर्माण केलेला काल होय. अपूर्ण मानवांना पूर्णतेकडे नेणारा तो एकच एक रस्ता आहे. शुद्ध द्वितीयेपासून पौर्णिमेपर्यंतच्या त्या चंद्राच्या कला आहेत. द्वितीयेला पूर्ण चंद्र उगवूं शकत नाहीं. मी अज्ञानी आहें आणि मला पूर्ण प्रज्ञ व्हावयाचें आहे, गरीब आहें व श्रीमंत व्हावयाचें आहे, अशक्त आहे, समर्थ व्हावयाचें आहे, दुःखी आहें व पूर्ण सुखी व्हायचें आहे तेव्हां हें असणें आणि होणें यालाच आपण मानसिक काल (psychological time) म्हणत असतों. एका जन्मांत साधणार नाहीं म्हणून आपण अनेक जन्म मानतों. मानवी सद्गुणांच्या विकासाला जो अवधि लागतो तोच मानसिक काल होय परंपरेनें, शास्त्र पुराणानें, बुद्ध, शंकरांनीं देखील या होण्याला (becoming) मानसिक कालगणना म्हटल्यानें त्याची पकड व्यक्तीच्या मनावर विलक्षण व बळकट आहे. पण करूं या आपण खोल निरीक्षण आणि काय तथ्य आहे त्यांत तें पाहूं या. कालचा दिवस हें आजच्या दिवसाचें

कारण व हें कारण उद्यांच्या दिवसाचें कारण, म्हणजे कारण तें कार्य व कार्य तें कारण एकच नाहींत का? फरक होतो पण स्वरूप बदलत नाहीं. मी होतों, आज आहें व उद्यां होणार आहें — हा मी कायमच राहतो. नवीन वस्तु तयार होत नाहीं. मी चा अपूर्णांक या काल-आज उद्यांच्या फेऱ्यांत पूर्णांक होत नाहीं. कार्यकारणांची ही सांखळी कितीहि लांबवली तरी "मी" या तत्त्वाचा "बदललेला मी" होतो. मुरड घातलेल्या (modified) वस्तूचें हें सातत्य राहतें (continuity). यांत्रिक, मामुली रस्ता कोठेंच पोहोंचवीत नाहीं.

तेव्हां तोच तो प्रकार करून साधायचें तें साधणार कसें? साध्या-करतां या मानसिक कालसाधनेचा उपयोग नाहीं. तेव्हां हें होणें (Becoming) होण्याचा हव्यास ( crave for becoming something, hankering after perfection in time ) हें सोडून दिलें तर काय होईल? या होण्यांत पुढें कांहीं तरी होणें, अथवा मागच्यासारखें कांहीं तरी बनणें ( शंकर, बुद्ध, शिवाजी, नेपोलियन, राम, कृष्ण इत्यादि ) याचा अन्तर्भाव झालेला असतो. हें होणें सोडलें तर? साध्य गेलें. कांहीं एक होण्याची महत्त्वाकांक्षा नाहींशी झाली, मागचें तर गेलेंच आहे अगोदर. मग काय राहिलें हातीं? फक्त वर्तमान, आज, चालू घडी, चालू क्षण या पलीकडे कांहीं नाहीं. ही मनाची कोणती अवस्था? छातीठोकपणें पाहिलें तर वस्तुस्थितीची, जें कांहीं आहे त्याची समक्ष भेट नाहीं का? पण भीतीमुळें आहे त्याकडे पहाण्याची आपण टाळाटाळ करतों.

आपण क्रूर, निर्दय, स्वार्थी, दांभिक आहोंत. म्हणून आपण स्वतः-पासून दूर पळून जाऊन इतर व्यापांत स्वतःला गुंतवीत असतों. ही शुद्ध आत्मवंचना होय (self deception). तेव्हां तें होणें (becoming) सोडलें तर इच्छा नाहीं, साध्य नाहीं, विचारचक्र नाहीं. फक्त आहे

ती वस्तुस्थिति, उद्यांची नाहीं, आजचीच, उद्यांचें होणेंच नाहीं. मग उद्यां–उदईक–उन्नति वगैरेंचे लटांबर आपोआपच नाहींसें होतें. इच्छा नसल्यानें बंध नाहीं, कालगणना नाहीं. हीच स्वतंत्रता. कालविहित क्षण यालाच कालातीत होण्याची अवस्था म्हणतात, ही आजच या क्षणीं पाहिजे, उद्यां नाहीं. क्षणाक्षणाला ही पूर्णता आहे. अवकाशविहीन ही मनाची अवस्था. तेव्हां मानसिक काल (psychological time) नाहींसा करणें शक्य आहे आणि पूर्णता साधण्याकरितां व्यक्तीच्या गौरवाकरितां विकासवादाची कास धरण्याचे कारण नाहीं. हा अहंभावी "होण्याचा" रोग कापून काढला कीं, व्यक्तीचें मन निर्मल होऊन इच्छा नष्ट होते. कोठेंही जावयाचें नसतें पोंचावयाचें नसतें, धडपड नाहीं, व्याप नाहीं, कलह नाहीं.

आत्मवास तोच हा प्रवास. हीच चिरंतनता. कालातीत होणें तें हेंच. होणें नाहीं तेव्हां साध्याशीं नातें पण नाहीं. दुसरी वस्तूच नाहीं, आपले आपणच फक्त. मनाची अशा क्षणीं काय अवस्था असते ! तें रिकामें असतें पण अत्यंत जागृत असतें. त्याला क्षणाचाही विसांवा खपत नाहीं. या रिकाम्या भांड्यांतच नवजीवन ओततां येतें.

तेव्हां मन मोकळें केलें तरच सत्य, सौख्य व शांतता यांच्या नव-संसाराला जागा करून देतां येईल. पण तेवढ्याकरतां निदान "जागें" तरी व्हावयास हवें !

## ता १६-१०-४८ शनिवार सायंकाळ : टिळक-स्मारक-मंदिर
## नवा मार्ग ( A new approach ).

आपली आजची स्थिति ही जुन्या चाकोरींतून फिरण्याचा परिणाम आहे हें आपणांस समजून आलें. जुना मार्ग चुकीचा आहे हेंही समजलें. याचाच अर्थ आपलें पहिलें पाऊल नवमार्गावर पडलें असा होतो. पण असें मुंगीच्या पावलानें चालून आपल्यासारख्यांचें कसें भागेल ? विमानानें प्रवास करून, मनाच्याही गतीला मागें टाकून, क्रममुक्तीची कंटाळवाणी वाट सोडून, सद्योमुक्तीच्या संततधारेला आपल्याला लागावयाचें आहे. आणि तें साधलें तर आजच – उद्यां नाहीं. मग स्वतःमध्यें आपण एकदम बदल कां घडवून आणीत नाहीं ? व्यक्ति म्हणजेच जग. व्यक्तीचा प्रश्न तोच जगाचा. आपलें व्यक्तीशीं नातें तेंच जगाशीं नातें. एका नात्यांत जर प्रेम नाहीं तर दुसऱ्या नात्यांत कोठून येईल ? हृदयाचा आपला आड जर मोकळा आहे; त्यांत प्रेमाचें पाणीच नाहीं, तर त्यांत नात्याचा पोहरा कितीहि बुडवला तरी कांठावरचा घडा भरणार कसा ? अगोदर हृदयें प्रेमानें पूर्ण भरूं देत मग आपल्या सौख्याला काय हो सीमा ? सौख्य हें प्रेमरूपच आहे. प्रेमानें नटलेल्या जीवाला वहात्या पाण्यांत ग्रंथ, पत्थरांत प्रवचनें व साऱ्या ठिकाणीं सौजन्यच सौजन्य दिसत असतें ना ? जसें आपण तसेंच आपल्या भोंवतालचें जग आपल्याला दिसतें. व्यक्ति बेचैन असेल तर करमणुकीच्या साधनांतही मन रमत नाहीं हा प्रत्यक्ष अनुभव आहे. मनावर होणारे आघात आणि त्याचें पदोपदीं आपण देत असलेलें शाब्दिक आणि सक्रिय उत्तर हेंच आपलें नातें असतें. हातानें आणि मनानें केलेल्या वस्तूशीं आपलें नातें हव्यासाचें, विभक्तीचें आहे. आणि म्हणून कलह सारखा थैमान घालीत आहे. व्यक्तीशीं आपलें मुळीं नातेंच नाहीं. परंपरेच्या

जात्यांत आपण एकमेकांना भरडून काढीत आहोंत. हृदयस्थ कोमल भावाचें पीठ झालें आहे आपल्या! आणि नवीं नवीं विद्यापीठें स्थापन करावयास निघालों आहोंत आपण! जुन्या विद्यापीठांनीं खऱ्या खुऱ्या विद्येचें अद्याप पुरेसें पीठ केलें नाहीं अशी अजून कां आपली समजूत आहे? आणि आपली विद्या म्हणजे तरी काय आहे वस्तु? लोकांच्या गांठलेल्या आणि शब्दांच्या गांठोड्यांत बांधलेली शिदोरीच ना? ग्रंथ म्हणजेच बाजार, आणि आपल्या स्मृतीचा व्यापार हेंच आपलें ज्ञान. तांत्रिक ज्ञानाचा या विवेचनांत अंतर्भाव केलेला नाहीं. तो स्वयंसिद्ध आहे. त्याचा आपण स्वार्थापायीं दुरुपयोग करतों आहोंत. स्वयंपाकापेक्षां घरादारांना आगी लावण्याकरतांच जर अग्नीचा उपयोग होऊं लागला तर त्या अग्नीला "नारायण" म्हणून करील का कोणी नमस्कार?

प्रत्येक व्यक्तींत विरोध भरला आहे तो कसा दूर करावयाचा हा आपल्यापुढें प्रश्न आहे. हवें-नको, चांगलें–वाईट, भलें–बुरें, वगैरे वासना सारख्या उत्पन्न होत आहेत, त्यांचा मेळ कसा बसवावयाचा! या विसंगतीमुळें, विरोधामुळें आपण वेड्यासारखें वागतों, बोलतों आणि करतों दुसरेंच! आपली आसक्ति सारखी वाढतच जाते; आणि ती टाळण्या-करितां आपण अनासक्तीच्या मागें धांवतों. या धांवपळीमुळें आपला जीव रंजीस येऊन गेला आहे. त्याला खरें समाधान नाहीं, सुख नाहीं. भोग नको म्हणून त्याग करावला जायचें आणि नवी आसक्ति जोडा-वयाची. आपली आहे ती स्थिति आपण समजूनच घेत नाहीं. उत्पन्न झालेल्या इच्छेचें समर्थन अगर धिःकार न करतां, तिच्यापासून दूर पळून न जातां–ती न टाळतां – तिला बरें वाईट न म्हणतां, म्हणजे तिला कसलेंही नामरूप न देतां जर आपण क्षणभर स्तब्ध राहिलों तर मन विकाररहित होऊन झालेली इच्छा मावळून जाईल व मनाला या संपूर्ण क्रियेची जाणीव झाली कीं, 'जें कांहीं आहे' त्याचें सम्यक् ज्ञान होऊन

सत्याचा साक्षात्कार होत राहील. हेंच अपरोक्ष ज्ञान (direct experience) ज्ञान म्हणजे स्वतःचा अनुभव—स्मृती नव्हे. तर "अनुभवणें" हें आत्मज्ञान झालें तर सुखप्राप्ति होते. ही असली निजानंदाची विहीर हृदयांत भरली असतांना विद्वत्तेच्या घमेंडीचा लहान घडा नेऊन काय होणार आपलें समाधान ? घडा आणि विहिर – असे आपण दोन्ही बनलों तर ! पाण्यांत घडा बुडविला आणि सोडून दिला कीं विहीर आणि घडा एकच. तो बाहेर काढला तरच वेगळेपणा येईल, नाहीं तर बुडलेल्या घड्यांतील पाणी आणि विहिरींतील पाणी या काय दोन जिनसा आहेत ! तेव्हां शब्दांचें समर्थन न करतां, सबबी न सांगतां अर्थ न लावतां, अनुभव घ्या, प्रयोग करा, समजून घ्या, जें कांहीं आहे तें नीट निरखून पहा, त्याला दडपूं नका, नांव देऊं नका, समजूत घेण्याकरतां ती सत्यवस्तु प्रेमळपणें हाताळली कीं, मग पहा काय चमत्कार घडतो तो. एकदम क्रांति घडून येईल तुमच्यांत, विसंगती नाहींशी होईल, बेतालपणा सुटेल, सर्वांगिण समजूत पटेल आणि तुमच्या आचरणाचा प्रत्येक कण आणि प्रत्येक क्षण प्रेमाचे पर्वत ठिकठिकाणीं उभारील ! नवसंस्कृतीच्या नौबतदुंदुभी जगभर झडूं लागतील. स्वतःची मिरवणूक काढणार ना मग तुम्ही ? ( मिरवणुकीला दोन देखील माणसें पुरतात. मुंबई हायकोर्टाचे माजी न्यायमूर्ती लोकूर यांचा तसा निवाडा आहे. कृष्णजींनीं देखील नवसमाजरचनेसाठीं "व्यक्तीच" निवडली आहे.) समूह व संघ ( labelled groups & system ) यांच्या खडकावर जुनें तारूं आपटून फुटलें आहे, निकामी झालें आहे. नव्या जहाजांतूनच आतां आपण प्रवास केला पाहिजे हाच तो नवा मार्ग होय.

## ता. १७–१०–४८ रविवार सायंकाळ

क्रमिक काल ( chronological time ) and मानसिक काल ( psychological time ) यांचें थोडक्यांत विवेचन करून कृष्णजींनीं कांहीं महत्त्वाच्या प्रश्नांचीं उत्तरें दिलीं.

( १ ) स्वप्न व त्याचा अर्थ :—स्वप्नाचा योग्य अर्थ लावतां येत नाहीं. त्याला वास्तविक अर्थच नसतो. वरवरच्या जाणीवेंतील अर्धवट विचारांचा गाळ मनाच्या तळाशीं बसलेला असतो व असलेच अर्धे-कच्चे विचार उसळी मारून झोंपेंत वर येत असतात व त्यांचींच स्वप्नें बनतात. स्वप्नें अटळ आहेत हा मानसशास्त्रज्ञांचा भ्रम आहे.

शांत चित्तानें, स्थिर मनानें झोंपायला गेलें तर स्वप्न पडत नाहीं व त्याचा अर्थ लावण्याचा प्रसंग गुदरत नाहीं आणि स्वप्नावर आधार-लेल्या जागृतावस्थेंतील आचारविचारांचे अनर्थ टळतात.

( २ ) सैन्य, पोलीस, वकिली व सरकारी अधिकारी होणें हीं उदरनिर्वाहाचीं अयोग्य साधनें होत. हींच कलहाला मूलत: कारणी-भूत आहेत. साऱ्या अनर्थांची परंपरा याच चार भावंडांपासून उगम पावते. हा ओंगळ उगम गोठल्या शिवाय समाजांत नवसंस्कृतीचे ठसे उठणार नाहींत.

( ३ ) सृष्टी, धरित्री, भूमाता आपलें तिच्यावर प्रेमच नसतें. पहिला पाऊस पडल्याबरोबर मातीचा सुगंध घेतला आहे कां ? हजारों-प्रकारचीं अत्तरें फिकीं आहेत त्यापुढें. आपण मातीपासून झालों आणि मातींत जावयाचें. मग प्रौढपणीं मातींत हात भरवावयाचें कां बरें टाळतो ? कपडे आणि कांतडें यांची भिंत आपली धरित्री आई व आपण यांच्या दरम्यान कां बरं उभारीत असतों ? गवताच्या सुंदर गालिच्यावर अनवाणी धांवावेसें वाटतें कां तुम्हांला ? नसल्यास कां बरें नाहीं ? लहान मुलें प्रेमानें मातींत खेळतात, तुम्हीं “ घाण ”

म्हणतां त्यांना आणि दूर ओढतां स्वच्छतेसाठीं. त्यांच्या निर्मल मनावर तुमच्या कोरड्या ठणठणीत स्वच्छतेच्या नसत्या कल्पना निर्माण करतां. स्वार्थानें बरबटलेले तुम्ही, स्वच्छ आणि आपपरभाव नसलेलीं मातींत खेळणारीं मुलें गलिच्छ काय ? मानवी मनाची ही विकृति आपण आतां कोणत्या थराला नेत आहोंत याचा करांना जरा विचार ? तारकांशीं हितगुज, चांदण्याचें अमृतपान, छाया–पडछायेशीं लपंडाव, खेळतां का कधीं ? का नुसतेच टेनिस, क्रिकेट आणि ब्रिज खेळतां ? झाडपानांचें सळसळणें कान देऊन ऐकलें का कधीं ? फक्त कुठल्यातरी बाईचीं गाणीं ऐकत असतां ? सृष्टिसतीचीं आपण लेकरें– उपयोग हवा आहे फक्त तिचा; तिच्या पोटांतून बाहेर येणारें धान्य आणि पाणी यांवर जीव जगवून चैन करायला हवी. सृष्टिसौंदर्य चाखल्याशिवाय जगावर प्रेमच करतां येणार नाहीं.

( ४ ) तांत्रिक कला आणि अभिजात कला यांतील फरक समजतो ना ? नळांतून पडणाऱ्या पाण्याची धार आणि सागरावर उठणाऱ्या लहरींचा विलास यांतील फरक जर तुम्हांला समजला तर तांत्रिक कला आणि अभिजात कला यांतला भेद तुम्हांला समजेल; नाहीं तर नाहीं. यंत्र आणि सौंदर्य यांतला फरक तोच या दोहोंमधील फरक होय.

( ५ ) प्रेम कसें उत्पन्न होतें ? कोठल्याही कारखान्यांत अगर भट्टींत नव्हे. मनाच्या भट्टींत तर नाहींच नाहीं. हृदयाच्या कुंजांत चोरपावलांनीं जा आणि राधादेवीसारखे होऊन नवऱ्याला विसरून श्रीकृष्णाशीं तनमनधनानें एकरूप होऊन जा. मग "कसें" प्रेम उत्पन्न करावयाचें हा प्रश्नच उरावयाचा नाहीं. तुम्ही – तेंच प्रेम.

## ता. १८-१०-४८ सोमवार सकाळ : भारत सेवक समाज.

**इच्छेचा प्रश्न :**—इच्छा म्हणजेच जगणें. कसलीच इच्छा नसेल तर मग माणसानें जगावयाचें कशाकरतां ? जगण्याची इच्छा तरी प्रत्ये-काला असते ना !

ऐतिहासिक अथवा अनुक्रमात्मक काल आणि मानसिक काल असे दोन भेद आहेत. पहिला – क्रॉनॉलॉजिकल टाईम, काल, आज, उद्यां हा अगदींच उघड (obvious) आहे. मानसिक कालाचा आपल्याला विचार करावयाचा आहे. कारण व कार्य एकस्वरूप आहेत. कारणांतून कार्य व तें कार्यच पुन्हां कारण अशी ही सांगड बसलेली आहे. मानवी इच्छेमुळेंच काल उत्पन्न होत असतो. अनेक इच्छांची प्रगति म्हणजेच काल होय. माझ्या मनांत इच्छाच नसेल, तर मग मला आज काय नि उद्यां काय दोन्ही सारखेच. कालच नाहीं मला. जेव्हां इच्छा निर्माण होत नसते तेव्हां मन शांत असतें.

आघात आणि प्रत्याघात यापासून इच्छेचा उद्भव होतो. दर्शन व स्पर्श, आंतलें व बाहेरचें (internal and external) यामुळें मना-वर आघात (challenge) होत असतो. इच्छा उत्पन्न झाल्यावर तिला नांव दिलें, ती नोंदली, तिचा संचय केला कीं या साऱ्या क्रियेचा " अनुभव " बनतो. हा सारा मनाचा व्यापार होय, व या व्यापाराची साऱ्या पातळीवर (on all levels) संपूर्ण जाणीव झाली (total awareness ) कीं अनुभव नाहींसा होत जातो आणि मनाचें नुसतें अनुभवणें ( experiencing ) असतें. ' जें कांहीं आहे ' तें सत्यत्व या अनुभवण्यांतच भरलेलें असतें. मन अगदीं शांत आणि कोरें करकरीत असतें अशा वेळीं आणि म्हणूनच त्यावर चिरंतन सत्याचा अभिनव ठसा उमटत राहतो.

अर्ध्या सेकंदाचें का होईना, पण शांत मनांत येणाऱ्या दोन विचा-

रांत सूक्ष्म बिंदूमात्र असें अंतर असतें. तो अंतराचा क्षण अनुभवणें म्हणजेच कालातीत होणें. दोन विचारांमधील बिंदुमात्र म्हणजे काल-प्रवाहाची बंदी व चिन्मयराघवाची क्षणमात्र अशी धुंदी होय! या धुंदीचा छंद मानवी मनानें घेतला कीं तो चिरंतन सत्यमार्गाचा कापडी झाला असें खुशाल समजावें.

विचार टोंक १ — विचार टोंक २

← अंतर →

खालच्या बाजूनें तळाला हीं दोन शांत मनांतल्या विचारांचीं टोंकें जोडलेलीं आहेत. वर दिसणारें अंतर—तेंच तें कालातीत (timeless) हें मध्यंतर म्हणजेच संपूर्ण निष्कामतेचा क्षण (moment of desirelessness) याचा अनुभव क्षणभर कां होईना पण घेतां येतो. हीच सत्यतेची क्षणिक भेट व मुहूर्तमात्र साक्षात्कार.

या मध्यंतरांत कार्यकारणांचें अविभाज्य गांठोडें बनलेला “ मी ” पणा नसतो. आणि मीपणा संपला कीं देव भेटला, जन्माचा पांग फिटला, मरणाचा मोहोळा सुटला. अशा क्षणीं भीतीचा वारा कुठून सुटणार ? तो क्षण, तें मध्यन्तर प्रीतीची पहांट होय ! इच्छेचा शेवट आणि इच्छा म्हणजे काल असल्यानें तेथें त्या क्षणाला मन प्रशांत असेल तोंवर कालाचा अंत होऊन कालातीत अनंताचा सहज साक्षात्कार होतो — होत रहातो.

कराना मग प्रयोग. इच्छा म्हणजेच बंध. आणि बंध तुटला कीं मुक्ततेचे वारे वाहूं लागतात. अंगांत नवचैतन्याचें वारें भरतें आणि वाऱ्यावर स्वार होऊन व्यक्तीची स्वारी नंतर विश्वकल्याणाच्या मिरवणुकीसाठीं बाहेर पडते !

## ता. २०-१०-४८ बुधवार सकाळीं ८ ते १० : भारत-सेवक-समाज

## अत्यंत वेगानें धांवणाऱ्या मनाचा गुणधर्म

## ( Quality of a rapidly moving mind )

गेल्या प्रवचनांत आपण असें पाहिलें कीं प्रशांत मनांत पहिला विचार आणि तावडतोब निमिषार्धात येणारा दुसरा विचार यांच्यामध्यें केवळ बिंदुमात्र काल असतो व तोच कालातीत क्षण होय (timeless). चपळगतीनें धांवणारें मन कोठेंतरी जात असतें; कोठें तें कांहीं आपल्याला कळत नाहीं. आकाशांत उडणारा पक्षी कोठें बरें जात असतो ? पाण्याचा प्रवाह कोठें जातो हें त्यापैकीं एखाद्या जलबिंदूला असतें का ठाऊक ? तसेंच मानवी मन क्षणाक्षणाला वाऱ्यासारखें वहात असतें; उसंत मिळत नसते त्याला. हा नाहीं तो विचार असतोच मनांत. हें मन कोणत्या जातीचें, त्याचा गुणधर्म कोणता हें आपल्याला शोधून काढलें पाहिजे.

मनाचा हा प्रवाह म्हणजेच कालाचा हा प्रवाह. कालाचा हा नकाशा होय ( map of time ). मन म्हणजेच काल ( time ) आणि मनांतल्या दोन विचारांमधील अभ्यंतर (inbetween-ness) म्हणजेच कालशून्यता (timelessness ).

विचार तरी कसले येतात आपल्या मनांत ? कालचे किंवा उद्यांचे. ते फक्त आजच्या दारांतून जातात. 'आज' काय आहे हें पहावयास आपणांस मुळीं सवडच नसते. वर्तमानकाल हा गतकाल आणि भविष्य-काल यांना जोडणारा केवळ मार्ग आहे (mere passage). गतकाल हें वर्तमानाचें कारण व वर्तमान हें भविष्याचें—उद्यांचें कारण. तेव्हां भूत व भविष्य हे वस्तुतः एकच. नवीन कांहीं नाहीं. ये रे माझ्या मागल्या यांत पूर्णता नाहीं. गतकाल म्हणजे स्मरण केलेल्या गोष्टींचें,

घटनांचें व वस्तूंचें स्मरण. आणि भविष्यकाल म्हणजे तेंच स्मरण. तेव्हां ज्याला आपण देहाचें जगणें म्हणतों तें जिवंत मरणच होय! स्मृतीवर जोंवर आपण जगतों व तीच स्मृति सारखी चालू ठेवतों तोंवर खरेंखुरें जगणेंच संभवत नाहीं. आणि 'स्मृति' ही इतकी व्यापक आहे कीं त्यांत धर्म, संप्रदाय, मिळकत, समाजरचना, शासनसंस्था वगैरे वगैरे सर्वांचा अंतर्भाव झालेला आहे. या स्मृतीचा ( memory ) प्रत्येक व्यापार मंद, निस्तेज, निर्बुद्ध, चैतन्यशून्य असा असतो. तेव्हां गतकालाची ही स्मृति जर आपण नष्ट करूं शकलों तर, कालातीत कसें व्हावयाचें (how to transcend time ) आणि पूर्णतेचें शिखर कसें गांठावयाचें याचा शोध आपणांस लागल्याशिवाय राहणार नाहीं.

गतकाल जिवंत नाहीं हें माहीत असून आज आपल्या सुखदुःखाकरितां त्याचें स्मरण करणें म्हणजे त्याला थडग्यांतून उकरून काढणेंच होय. वर्तमानकालांत, आज आपण गतगोष्टींना जिवंत करीत असतों. मेलेल्या मुडद्यांना साजश्रृंगार चढविण्यासारखें हें होतें. कसलाहि जिवंतपणा अशा प्रयोगांत उत्पन्न होऊं शकत नाहीं. भाजलेल्या बीं—बियाणापासून नवीन पीक निर्माण होऊं शकत नाहीं. गतकाल हा भाजलेल्या बियाणासारखा आहे. त्याच्या आधारानें नवसमाज, नवसंस्कृति कशी निर्माण होईल? नवीन मूल्यें निर्माण केलीं पाहिजेत त्यासाठीं.

आपण स्वतःला एवढें महत्त्व कां बरें देतों? गतकालाला आपण चिकटून बसतो म्हणून. पैसा, मिळकत, घरेंदारें, मानमरातब, आपली थोडीबहुत विद्वत्ता आपण असतों का सोडायला तयार? कधींच नाहीं. तो तर आपल्या जीवनाचा आधार बनला आहे. तो काढून घेतला तर मग काय होणार आहे आपलें! मग आपलें महत्त्व तें काय उरलें! या भीतीमुळें आपण या साऱ्या गोष्टी, ही आपली सारी साधनसंपत्ति

घट्ट आवळून धरीत असतों. वास्तविक या संपत्तीनेंच आपणांस पूर्णपणें पछाडलें आहे. (The estate possesses us, we are in its complete grip.) तसेंच मरणोत्तर स्वर्गसुख पाहिजे म्हणून, देव भेटावा म्हणून आपण धर्माची आणि गुरूची कांस धरतों आणि स्वतःचा नाश करून घेतों. कारण मेल्यानंतर तो " उदईक–उद्यांचा–भविष्याचा " काल म्हणजे गतकालाचा वर्तमान कालानें रंगविलेला निव्वळ मुडदा. देव हो कसा भेटायचा या मार्गानें ? स्मरणाचें प्रेत उभें करून मरणाच्या सोहळ्यांत आपण किती दिवस गुंतवून ठेवणार स्वतःला ? पूर्णतेचा परमेश्वर पावला पावलालाच भेटतो. काल नाहीं व उद्यांहि नव्हे; भेटला तर आजच, नाहीं तर केव्हांहि नाहीं. सद्योमुक्तीचें हें गमक ऊर्फ तंत्र आहे. शिकवीत आहें मी तें तुम्हांला एखाद्या शिक्षकाप्रमाणें. हा कांहीं या कृष्णगुरूचा मंत्र नाहीं. ( मीं नाहीं कुणाचा गुरू आणि माझा नाहीं कुणी शिष्य, असें कृष्णजी घसा कोरडा करून बजावीत असत श्रोत्यांना. )

गतकालाचा संबंध सुटला, विचारचक्र थांबलें कीं मनाची जी प्रथम अवस्था होते ती अनिश्चितपणाची असते. आणि हाच वेगवान् मनाचा गुणधर्म होय.

आपल्या गेल्या जन्माचें बरें वाईट कर्म हें आपल्या हल्लींच्या, चालू विद्यमान स्थितीचें कारण आहे असें आपण मानतों–मनानें मानतों. ईश्वराची शिक्षा किंवा प्रसाद समजतों आपण त्याला. आपण आज पुण्य केलें तर पुढच्या जन्मीं चांगले दिवस भोगूं–सुख मिळेल आपल्याला. या नाहींतर नाहीं पण पुढें केव्हां तरी, कुठल्यातरी जन्मांत आपल्याला देवाघरीं न्याय मिळेल, आपला पांग फिटेल, अशा भोळ्या भावनांच्या आहारीं जाऊन आपण धर्माची कांस धरतों, देवपूजा करतों, गुरू करतों. पण उद्यांची ही आशा केवळ गतकालाची निशा असल्यानें

काय बरें निष्पन्न होणार आहे त्यांतून ? कर्मांचा हा सारा उभारलेला पसारा मुळीं मृत आहे, निर्जीव आहे–वर्तमानकाळीं भोळ्या भावनांची फुंकर घालून गतकालाला भावी आशा–आकांक्षांचा मनोहर शिडकावा देऊन आजच्या घडीला हृदयाचें समाधान कसें बरें व्हावयाचें ? ही गतकर्मांची व भविष्याची कल्पनाच मुळीं खोटी व त्यावर आधारलेली उद्यांची सुखाची रचनाहि तितकीच खोटी, पुन्हां खोटी, त्रिवार खोटी !

हें समजलें तरच काय आहे तें खरें उमजेल व त्या उमजाकरतां वस्तुस्थितीचें निरीक्षण करावयास हवें. त्याकरतां कृति करायला पाहिजे. आणि कृति करणें म्हणजे वस्तुमात्राशीं नातें जोडणें होय. आणि या नात्याचा गतगोष्टींशीं अगर भावी कालाशीं कसलाहि संबंध असतां उपयोगी नाहीं. कृति म्हणजेच नातें. आचरणाच्या आरशांत स्वत:चें ज्ञान होतें. मेल्या-गेल्या गतकालाशीं जर आपण नातेंसंबंध तोडून टाकला, स्मरणावर आधारून कोणतेंहि कृत्य केलें नाहीं, तर मनाचे संपूर्ण पूर्वग्रह ( all conditioning ) नाहींसे होऊन मन निर्मळ व विशुद्ध आणि प्रशांत होईल, आणि मग आपण जें जें कृत्य करूं तें अभिनव व सुंदर आणि म्हणून सत्यनिष्ठ असेंच घडत राहील. आपल्या स्वत:मध्यें आमूलाग्र फरक होईल. ( Radical transformation ) गतकाल नाहींसा केला कीं भविष्यकालाची हांव उरणार नाहीं. फक्त आजचा चालू घडीचा, वर्तमान कालाचा निदिध्यास आपल्याला लागेल. काय होईल याचा परिणाम ? मागची शिदोरी कांहीं नाहीं, उद्यांची आशा नाहीं, वर्तमानाचा भरंवसा ऊर्फ निश्चिति नाहीं. अशा अनिश्चयाच्या अवस्थेंत ( complete uncertainty ) ज्या वेळीं आपण स्वत:ला लोटून देण्याकरतां सज्ज होऊं, कांठावर येऊं, टोंकावर जाऊं ( brink or edge ) त्याच क्षणाला जी कांहीं सत्यवस्तुस्थिति आहे, तिचें साक्षात् दर्शन आपल्याला घडल्याशिवाय राहणार नाहीं.

पण स्वतः मरून गेल्याशिवाय – म्हणजे मलीन चित्त आणि वित्त टाकल्याशिवाय या सत्यक्षणाचा जन्म होत नाहीं, कोणासहि तेथें जातां येत नाहीं. – पण साऱ्यांना तेथें जातां येण्यासारखें आहे. मनानें मरून, सत्यत्वानें सजून पुन्हां जन्माला या! अनुभवा ना हा जन्ममरणाचा सोहळा! यालाच स्वतःचें मरण देखत्या डोळ्यांनीं, जिवंत देहानें पहाणें म्हणतात. नुसता लोकांचा अभंग काय पोपटासारखा म्हणतां कीं,

आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां। तो झाला सोहळा अनुपम ॥

तिन्ही त्रिभुवनाचा आनंद हवा ना? मग एकात्मकतेचा भोग नको का घ्यावयाला? त्याशिवाय कसें बरें हें घडायचें!

## ता. २२–१०–४८ शुक्रवार सकाळीं ८–१०

( भारत सेवक समाज : कृष्णजींचा पुण्यांतील शेवटचा संवाद )

**उदासीनतेचा प्रश्नः**–(The problem of lonliness.)

उदासीनतेचा अनुभव साऱ्यांनाच येतो. माणसानें गजबजलेल्या रस्त्यावरदेखील " भकास, उदास " असें वाटतें तें कां? कांहींतरी नाहींसें झालेलें असतें; प्रिय जनाचें मरण म्हणा किंवा आशेचा बीं-मोड म्हणा. कांहीं नकोसें वाटतें. मन अगदीं " उजाड " होऊन जातें. चुकल्या चुकल्यासारखें वाटतें. आतां हेंच पहा ना, आजच माझें शेवटचें प्रवचन, कांहींना तरी कांहीं दिवस चुकल्या चुकल्यासारखें वाटेल. सकाळची कॉफी चुकावी अगर संध्याकाळचें पेय चुकावें असें त्याला वाटेल आणि मग ही बेचैन अवस्था दूर ठेवण्याकारितां सहल, खेळ, क्लब, कथा वगैरेंचा आश्रय व्यक्ती घेतील. यालाच पळवाट (escape) म्हणतात व त्यामुळें " बेचैनीचा, उदासपणाचा " प्रश्न सुटणार नाहीं. विकार अनुभविणें हीच सर्वांत महत्त्वाची अवस्था. ती समजून जर आपण घेतली तर त्यांत साऱ्याच प्रश्नांचीं उत्तरें सोडविण्याची शक्ति

आहे. उदासपणाचा प्रश्न त्यामुळेंच सुटेल. स्वानुभव हीच ती आत्मशक्ति होय व तिच्याच जोरावर व्यक्तीला सत्यज्ञान होतें. स्वतःच्या दुःख–संकटांची सर्वांगिण जाणीव उत्पन्न होते व त्या तसल्या जाणिवेमधूनच चिरंतन सुखाचा आविष्कार होत राहतो. पण ही जाणीव होणें किती कठीण गोष्ट आहे !

शब्दाशिवाय व्यक्तीला विचारच करतां येत नाहीं आणि शब्द विसरून त्याच्या अर्थाकडे पाहिल्याशिवाय सत्य अनुभवतां येत नाहीं. तेव्हां शब्दांना महत्त्व न देतां आपण भाववाचक, अमूर्त, विनाशब्द, शब्दांपासून दूर असें चिंतन करावयास पाहिजे.

भकास वाटावयास लागलें कीं करमेनासें होतें. सुचत नाहीं, रुचत नाहीं – कांहीं मनाला. मग आपण कांहींतरी वेड्यासारखें करतों, कुठेंतरी भटकतों, बेसुमार बोलतों, बेताल वागतों, दुःखी असतों आपण. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे दुःखापासून दूर दूर जातों. ( कांहींतरी हरवल्याशिवाय हुरहूर वाटत नसते. ) मग ती हरवलेली वस्तु मनुष्य असो, ध्येय असो, नाहीं तर संपत्ति असो; पण हें असें दूर जाऊन मनाचा रितेपणा आपणाला भरून काढतां येत नाहीं. अधिकच भयाणपणा वाढतो. भीति वाटते कशाची तरी. भीति नेहमीं सापेक्षच ( relative ) नुसती केव्हांही नसते. भीतिला दुसरी वस्तु पाहिजे.

आणखी एका महत्त्वाच्या विकाराचा आपण विचार करूं. मत्सराचा तो रोग. बहुतेकांना–किंबहुना सर्वांना तो झालेला आहे. त्यापासून बाहेर पडल्याशिवाय, – त्याला अखेरचा रामराम ठोकल्याशिवाय मनाला आराम मिळणार नाहीं, जीवनांत सौख्य भेटणार नाहीं. कां वाटतो मत्सर ? माझ्यासारखा – बरोबरीचा – महत्त्वाचा दुसरा कोणी होण्याचा किंचित्‌देखील उपक्रम केला कीं मत्सराचें भूत जागें होऊन

थैमान घालावयास लागतें ! राग नाकावर आणि मत्सर, हेवादावा, असूया हा विकार मानवी मनाच्या मानगुटीवर सदैव स्वार होऊन बसला आहे. ही मालकीची कल्पना भोंवते आहे बरें — हें स्वतःच्या महत्त्वाचें मोजमाप होय. माझी बायको, माझा नवरा, दुसरा तिच्याकडे आणि ती त्याच्याकडे पहाणार ! आणि तसें झालें तर आलाच मत्सर. हत्यारबंद शिपाई तो. झालीच कलहाला सुरवात. तेव्हां मत्सर म्हणजेच संहाराचा, कलहाचा, कटकटीचा पिता. अस्मादिक तेवढे मोठें आणि इतर कःपदार्थ (a mere worm). असल्या तुलनेपोटीं मत्सर उगवत असतो. याला कांहीं मनाचा मोठेपणा, विशालपणा, व्यापकता असें म्हणतां येणार नाहीं. या संकुचित स्वार्थपरायण, कोत्या वृत्तीमुळें व्यक्तीव्यक्तींत बेदिली उत्पन्न होऊन राहिली आहे व त्यामुळेंच सारी अस्वस्थता, भीति, भकासपणा निर्माण होत आहेत. मी, माझी मिळकत, माझीं बायकामुलें, माझी जात, माझा हिंदु अगर इतर धर्म, माझा देव, माझा गुरू, माझा राजकीय पक्ष व देश—साऱ्या मानवजातीला जडलेला हा " मी " पणाचा क्षयरोग नीट समजावून घेऊन सुबुद्ध व प्रौढ व्यक्तींनीं तो दूर केला नाहीं, स्वतःचें मत व्यापक व विशाल बनवलें नाहीं, सौजन्यानें व प्रेमानें हृदय भरलें नाहीं तर सर्वांचा सर्व संहार झाल्याविना राहणार नाहीं. हा मत्सर सारें जग जाळून टाकील. संपत्ति आणि स्वतःचें महत्त्व यांची हांव बाळगली कीं मत्सर उत्पन्न होतो. ही परकेपणाची, आपपरभावाची, इतरांना स्वतः-च्या मिळकतीच्या ताब्यापासून दूर ठेवण्याची प्रवृत्ति म्हणजेच मत्सर. या साधनसंपत्तींत पैसा, घरेंदारें, धंदे, कल्पना, स्वतःचें महत्त्व, देश, देव, गुरू, सांप्रदाय, समाज वगैरे सर्व जागतिक गोष्टींचा व नातें-संबंधांचा अंतर्भाव झालेला आहे. इतरांशीं — व्यक्तिमात्राशीं आपण जर

योग्य नातें निर्माण केलें तर मग कोण कुणाचा मत्सर करील ? एखाद्या वस्तूची, व्यक्तीची अगर घटनेची (event, incident) म्हणजे एखाद्या विशिष्ट प्रसंगीं घडणाऱ्या गोष्टीची जर आपण समजूतच करून घेतली नाहीं, ( full comprehension ) तावडतोब निर्भर्त्सना करून जर आपण संतापलों तर काय होतें ? मत्सर, असूया, जळफळणें – असलाच ना प्रकार होतो ! काय मिळतें मनाला त्यामुळें ? त्रासच ना ! त्यापेक्षां शांत चित्तानें, तोल न जाऊं देतां, मत्सर अगर दुसऱ्या कोणत्याहि विकाराला जर आपण नांव दिलें नाहीं तर आपलें मन कोणत्या स्थितीला जाईल ! नांव आपण कां देतों एखाद्या विकाराला ? त्याचें वर्गीकरण करून मर्यादा घालण्याकरितां व एखाद्या विशिष्ट कप्प्यांत ठेवण्याकरतां. म्हणजे पुढें स्मरण करून त्याचा उपयोग करण्यासाठीं आपण विकारांना नांवें देत असतों.

मत्सरासारखा विकार उत्पन्न झाला कीं व्यक्तीच्या शांत मनाला झटका (shock) बसतो. काय करावें तें प्रथम एकदम सुचत नाहीं. अशा वेळीं त्या विकाराला नांव न देतां तो समजून घेण्याच्या मार्गाला लागावें. मला 'मत्सर' वाटला तो कां बरें ? हें स्वतःला विचारावें. कोण मी असा मोठा ? दुसऱ्यावर रागावून मी काय बरें मिळवणार ? अशा रीतीनें जर आपण स्वतःशीं विचार करूं लागलों तर " मी " म्हणजेच माझा " विकार ", स्वतःचाच तो आविष्कार अशी समजूत पटून, मीपणा सुटला कीं विकार अजिबात मावळून गेला असें समजावें. मी म्हणजेच विकार, " मी " पणा नाहीं तर विकार नाहीं, मत्सर नाहीं, राग लोभ नाहींत, मग काय हो सुखाला कमी ? विकार मावळला कीं सूड घेण्याचा विचारहि मावळतो आणि रागाची कृतीहि होत नाहीं. विचारचक्र थांबल्यानें मन निर्मल होतें, पण चपळच राहतें. मनाचा हा अचपळपणा ( alertness ) अनिश्चयाच्या अवस्थेत आपल्याला

नेऊन सोडतो, मन अभिनव होतें. मोकळें (frank) बनतें. आणि त्या मोकळ्या मनानें, निर्विकार बुद्धीनें, संपूर्ण समजुतीनें पावला पावलाला, क्षणोक्षणीं जी क्रिया घडते तेंच अनुभाविणें (experiencing) होय. तें सहज सिद्ध राहतें. **ही अवस्था प्रयत्नसाध्य नाहीं.** आणि या प्रशांत व निर्वात, विकाररहित, विचारविहीन दशेंत सत्यसाक्षात्कार होत राहतो. मग मत्सराला आहे कुठें जागा? अहो, हृदय जागें झालें तरच जगतां येतें. नाहीं तर मत्सरासारख्या रोगानें मरावें लागतें! आणि हें अनुभविणें म्हणजेच मुक्त होणें होय; तेंच चिरंतन प्रेम; नाम म्हणजे प्रेम नव्हे. या अनामिकाचा संसार करणार ना तुम्ही ?

भेटूं का आपण पुन्हां ? (I hope, we will meet again but when and where?)

Always : : all ways! lead to peace.